सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे - ४११००१**

# मार्गदीपिका

## कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५

### भाग २

# न्यायदंडाधिकाऱ्यांची भूमिका

कौटुंबिक हिंसा पीडित महिलेला न्याय मिळवून देताना......




लेखक : डॉ. जया सागडे
स्त्री अभ्यास केंद्र,
आयएलएस विधी महाविद्यालय,
पुणे

महाराष्ट्र शासन

महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे - ४११००१

# मार्गदीपिका

## कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५

भाग २

# न्यायदंडाधिकाऱ्यांची भूमिका

कौटुंबिक हिंसा पीडित महिलेला न्याय मिळवून देताना......




लेखक : डॉ. जया सागडे

स्त्री अभ्यास केंद्र,

आय्एल्एस् विधी महाविद्यालय,

पुणे

‘कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५’

ह्या कायद्याखाली नेमलेल्या

अधिकारी आणि सेवा पुरविणाऱ्यांसाठी मार्गदीपिकांचे ७ भाग

| | | |
|---|---|---|
| भाग १ | लिंगभाव आणि कौटुंबिक हिंसा | - मिलिंद चव्हाण |
| भाग २ | न्यायदंडाधिकाऱ्यांची भूमिका | - जया सागडे |
| भाग ३ | संरक्षण अधिकाऱ्यांची भूमिका | - प्रसन्ना इनवल्ली |
| भाग ४ | वकिलांची भूमिका | - रमा सरोदे |
| भाग ५ | वैद्यकीय सेवा देणाऱ्यांची भूमिका | - संगीता रेगे<br>- पद्मा देवस्थळी<br>- सुजाता आयार्कर |
| भाग ६ | पोलिसांची भूमिका | - मेधा देव<br>- तृप्ती पांचाल |
| भाग ७ | सेवादायी संस्थांची भूमिका | - प्रसन्ना इनवल्ली |

© स्वीसएड, सर्व लेखक; आयएलएस् विधी महाविद्यालय आणि महिला व बाल विकास बिभाग, महाराष्ट्र राज्य.

प्रकाशक : मा. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११००१

२३.१२.२०१९

CHIEF JUSTICE
HIGH COURT AT BOMBAY
सत्यमेव जयते

# संदेश

कौटूंबिक हिंसेपासून स्त्रियांच्या संरक्षणाचा कायदा, २००५ हा दिवाणी स्वरुपाचा महत्वाचा कायदा आहे. हया कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी होण्यासाठी अनेक घटकांवर जबाबदारी टाकलेली आहे. त्यातील न्यायाधिश आणि न्याययंत्रणा हा एक महत्वाचा घटक आहे.

कौटूंबिक हिंसेची समस्या गंभीर, गुंतागुंतीची आहे. पुरुषप्रधान आणि पितृसत्ताक समाजरचनेत, लिंगभावाधीष्ठीत होणारी हिंसा (शारीरिक, मानसिक, लैंगिक, आर्थिक, शाब्दिक) स्त्री–पुरुषामध्ये भेदभाव निर्माण करते. ही हिंसा स्त्रीच्या मानवी हक्कांचे आणि राज्यघटनेने दिलेल्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन करते. हया पार्श्वभूमीवर कौटुंबिक हिंसेपासून स्त्रियांच्या संरक्षणाच्या कायद्याखालील येणाऱ्या प्रकरणांमध्ये न्यायालयांचा दृष्टीकोन अधिक संवेदनशिल असणे अपेक्षित आहे असे माननिय सर्वोच्च न्यायालयाने *कृष्णा भटाचारजी वि. सारथी चौधरी* (क्रिमिनल अपिल नंबर.१५४५/२०१५ निर्णय दिनांक २० नोव्हेंबर, २०१५) या न्यायनिर्णयात नमूद केलेले आहे.

कौटूंबिक हिंसेपासून स्त्रियांच्या संरक्षणाचा कायदा, २००५ हा कायदा स्त्रियांच्या हितासाठी केलेला आहे. त्यामुळे कायद्यातील तरतुदीचा अन्वयार्थ लावताना एकापेक्षा जास्त अर्थ निघत असतील तर कायद्यांच्या उद्दिष्टाला पूरक असा अर्थ निवडला पाहिजे. स्त्रियांना तो त्यांना जास्तीत जास्त न्याय्य कसा ठरेल हयाचा विचार व्हायला हवा.

आयएलस विधी महाविद्यालयाच्या स्त्री अभ्यास केंद्राने पुढाकार घेउन दंडाधिकाऱ्यांच्यासह संरक्षण अधिकारी, पोलीस, वैद्यकीय अधिकारी, सेवा देणाऱ्या संस्था आणि वकील हयांच्यासाठी तयार केलेल्या मार्गदीपिकांचे मी स्वागत करतो. या सर्व मार्गदीपिका कौटूंबिक हिंसेपासून स्त्रियांच्या संरक्षणाचा कायदा, २००५ मधील तरतुदींबाबत सर्वसमावेशक आहेत. विशेष म्हणजे 'लिंगभाव आणि कौटूंबिक हिंसा' ह्याविषयावरील स्वतंत्र मार्गदीपिका सर्व संबधित घटकांना उपयुक्त ठरेल असा मला विश्वास वाटतो.

सर्व हितसंबधाना माझ्या शुभेच्छा !

१६ ऑक्टोबर २०१८

(न्यायमुर्ती नरेश ह. पाटील)

# ऋणनिर्देश

“पीडब्ल्यूडीव्हीए कादयाखालील सर्व हितसंबंधियांसाठी मार्गदीपिका तयार करणे” ह्या प्रकल्पाला दिलेल्या अर्थसाहाय्यासाठी आणि संकल्पनात्मक रचनेसाठी आम्ही ‘स्विसएड इंडियाचे’ ऋणी आहोत.

मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश माननीय न्यायमूर्ती श्री. नरेश पाटील ह्यांनी दिलेल्या संदेशाबद्दल आम्ही त्यांचे विशेष ऋणी आहोत.

अनेक सहकार्यांच्या सहभागामुळेच हा प्रकल्प पूर्ण होऊ शकला.  या सर्वांचेही आम्ही ऋणी आहोत. त्यांचा नामनिर्देश पुढीलप्रमाणे:

**लेखक**

- मार्गदीपिका - वकिलांची भूमिका - रमा सरोदे, आणि त्यांचे सहकारी असीम सरोदे ‘सहयोग’, पुणे, आणि इतर वकील
- मार्गदीपिका - वैद्यकीय सुविधा देणाऱ्यांची भूमिका - संगीता रेगे, पद्मा देवस्थळी, आरथी चंद्रशेखर, सुजाता आयार्कर  - सेहत (CEHAT), मुंबई, आणि ‘दिलासा’ केंद्राचे सहकार - चित्रा जोशी, मृदुला सावंत, संजना चिक्लेकर
- मार्गदीपिका - पोलिसांची भूमिका - मेधा देव, तृप्ती पांचाल - टाटा सामाजिक विज्ञान संस्थेच्या, RCI-VAW आणि या विभागातील सहकारी - नंदकिशोर डहाळे, शीतल देवस्थळी, सुनिता पवार - मुंबई
- मार्गदीपिका - लिंगभाव आणि कौटुंबिक हिंसा - मिलिंद चव्हाण, लिंगभाव प्रशिक्षक, पुणे
- संरक्षण अधिकाऱ्यांची भूमिका लिहिताना प्रसन्ना इनवल्ली यांना महाराष्ट्र महिला-बाल विकास आयुक्तालय, आणि शहरी व ग्रामीण भागातील काही संरक्षण अधिकाऱ्यानी दिलेल्या माहितीबद्दल तसेच मार्गदीपिकेच्या कच्च्या मसुद्यावर प्रतिक्रया दिल्या बाबत आम्ही त्यांचे आभारी आहोत.

**अनुवाद साहाय्य**

सुषमा देशपांडे

**इतर साहाय्य**

आय्एल्एस् विधी महाविद्यालयचे - अशोक माळवदे, योगेश सोनावणे, शुभांगी पुराणिक, प्रमोद राणे, हरिभाऊ दोडके, चंद्रकांत घुमे, वैंकट घतकार

**छपाई**

जलाराम कॉपियर्स, पुणे

**सर्वांना पुनः एकदा मनापासून धन्यवाद!**

## दोन शब्द ...

### सुरवात करताना ...

स्त्रियांवर होणारी कौटुंबिक हिंसा हा भारतातीलच नव्हे तर जगातील एक गंभीर सामाजिक प्रश्न आहे. कौटुंबिक हिंसेचे गंभीर आणि दूरगामी परिणाम केवळ स्त्रियांच्या आयुष्यावरच नाही तर कुटुंब आणि समाजावर होत असतात. २००५ पर्यंत कौटुंबिक हिंसेचे प्रश्न हे फौजदारी कायद्यातून हाताळले गेले होते. मात्र त्यातून पीडित स्त्रीची कुटुंबात राहून हिंसा थांबावी ही इच्छा पुरी होत नव्हती. उलट हिंसा करणाऱ्या सासरच्या लोकांना तुरुंगवासाची शिक्षा होत होती. त्यामुळे, ती कुटुंबापासून तुटत होती. या पार्श्वभूमीवर देश भरातील महिला संघटनांनी/ सामाजिक संघटनांनी एकत्रित आवाज उठवून कौटुंबिक हिंसेसंदर्भात दिवाणी स्वरूपाचा कायदा हवा, अशी मागणी केली. लॉयर्स कलेक्टिवने पुढाकार घेऊन 'कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण कायद्याचे' प्रारूप तयार केले. देशातील वेगवेगळया भागांमध्ये जाऊन संघटनांबरोबर चर्चा करून या प्रारुपात बदल केले गेले आणि ते सरकारला सादर करण्यात आले. संसदेच्या दोन्ही गृहांनी या कायद्याला मान्यता दिली, आणि 'कौटुंबिक हिंसे पासून महिलांचे संरक्षण अधिनियम' *(पीडब्ल्यूडीव्हीए* - Protection Of Women from Domestic Violence Act) २००५ मध्ये अस्तित्वात आला. त्यानंतर या कायद्याखालील नियमांची बांधणी झाल्यावर २६/१०/२००६ रोजी या कायद्याची अंमलबजावणी सुरु झाली.

या कायद्याची अनेक वैशिष्ट्ये आहेत. त्यापैकी एक महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे कायद्याची अंमलबजावणी होण्यासाठी नेमलेली यंत्रणा. ह्या यंत्रणेचे न्यायाधीश, संरक्षण अधिकारी, वकील, वैद्यकीय सेवा देणारे, सेवादायी संस्था आणि पोलीस हे घटक आहेत.

ह्या सर्व घटकांच्या ह्या कायद्याअंतर्गत असलेल्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्ये स्पष्ट करण्यासाठी स्त्री अभ्यास केंद्राने अनेक प्रशिक्षणे 'स्विसएड इंडिया'च्या आर्थिक साहायाने आयोजित केली. प्रत्येक प्रशिक्षणात 'लिंगभाव' या विषयावर  वर स्वतंत्र दीर्घ सत्र घेण्यात आले. अशी प्रशिक्षणे देशभर अनेक संस्था आयोजित करत होत्या. त्यामुळे अनेकांनी सर्व घटकांना उपयोगी होतील अशी मॅन्युअल्स तयार केली होती. मात्र मराठीत अशा प्रकारचे साहित्य उपलब्ध नव्हते. कायद्याच्या अंमलबजावणीसाठी प्रत्येक टप्प्यावर कसे काम करायचे, पिडीतेला न्याय मिळण्याच्या दृष्टीने कोणती पाऊले उचलायला पाहिजेत, काय खबदारी घ्यायची, इत्यादी मुद्द्यांच्या संदर्भात साहित्य निर्माण करण्याची गरज होती. स्त्री अभ्यास केंद्राने या कायद्याखालील नेमलेल्या यंत्रणेतील सर्व हितसंबंधीयांसाठी अशा प्रकारचे मराठीत साहित्य तयार करण्याचा दृष्टीने स्विसएड इंडियाच्या आर्थिक साहाय्याने एक प्रकल्प हाती

घेतला. या प्रकल्पाअंतर्गत १. **न्यायाधीश**, २. **संरक्षण अधिकारी**, ३. **वकील**, ४. **वैद्यकीय सेवा देणारे**, ५. **सेवादायी संस्था** आणि ६. **पोलीस** - ह्या प्रत्येक हितसंबंधियांसाठी स्वतंत्र मार्गदीपिका तयार करण्याचे ठरविले.

*पीडब्ल्यूडीव्हीए* कायद्याची बांधणी स्त्रीवादी भूमिकेतून स्त्रियांचे मुलभूत हक्क आणि मानवी हक्क यांची जपणूक आणि संवर्धन व्हावे या पायावर आधारित आहे. कौटुंबिक हिंसा स्त्रियांचा सन्मानाने जगण्याचा अधिकार काढून घेते आणि स्त्री-पुरुषामध्ये भेदभाव करते. या सर्व मुद्द्यांचा विचार करता स्त्रियांवर होणाऱ्या कौटुंबिक हिंसेकडे लिंगभावाच्या दृष्टिकोनातून बघणे फार आवश्यक आहे. अर्थातच त्यासाठी लिंगभाव म्हणजे काय हेही स्पष्ट असायला हवे. म्हणून वरील सहा मार्गदीपिकांबरोबरच **'लिंगभाव आणि कौटुंबिक हिंसा'** ही स्वतंत्र सातवी मार्गदीपिका तयार करण्याचे ठरविले.

ह्या सातही मार्गदीपिका लिहिण्यासाठी वेगवगळ्या हितसंबंधीयांच्या बरोबर *पीडब्ल्यूडीव्हीए* कायद्याखाली ज्यांनी विशेष काम केले आहे त्यांना लिहिण्याची विनंती करायची असे ठरवले. वकिलांसाठी सहयोग संस्था, पुणे; वैद्यकीय सेवा देणाऱ्यासाठी - सेहत संस्था, मुंबई; पोलिसांसाठी - टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई; यांना विनंती केली. 'लिंगभाव आणि कौटुंबिक हिंसा या मार्गदीपिकेसाठी' - श्री. मिलिंद चव्हाण, लिंगभाव प्रशिक्षक; यांना विनंती केली. सर्वांनीच मार्गदीपिका लिहिण्याचे तत्परतेने मान्य केले. स्त्रीअभ्यास केंद्राने न्यायाधीश, संरक्षणअधिकारी आणि सेवादायी संस्था यांच्यासाठी मार्गदीपिका लिहिण्याची जबाबदारी घेतली.

ह्या सातही मार्गदीपिका आपल्यासमोर सादर करताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. केवळ स्विसएड इंडिया, ह्यांच्या आर्थिक साहाय्यामुळेच हे आम्हाला शक्य झाले.

ह्या मार्गदीपिका **सर्व हितसंबंधियांना आणि प्रशिक्षकांनाही** उपयुक्त ठरतील असा आम्हाला विश्वास वाटतो.

**डॉ जया सागडे** — **प्रसन्ना इनवल्ली**

**मानद संचालिका** — **समन्वयक**

**स्त्री अभ्यास केंद्र,**

**आय्एल्एस् विधी महाविद्यालय, पुणे**

२० ऑक्टोबर २०१८

# महिला व बाल विकास आयुक्तालय

## महाराष्ट्र शासन

सत्यमेव जयते
GOVERNMENT OF MAHARASHTRA

२८, राणीचा बाग, जुन्या सर्किट हाऊस शेजारी, पुणे- ४११००१

फोन : ०२०- २६३३००४० Email : commissionerwcd@ymail.com


क्र. : मबाविआ/ ६२०५ दिनांक : २३/१२/२०१८

## "संदेश"

महाराष्ट्र राज्याने महिलांच्या विविध प्रश्नांवर व त्यांच्यासाठी करण्यात आलेल्या उपायावर अनेक योजनांवर प्रगत पाऊले उचलली आहेत.राज्यपातळीवर कौंटुबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ ची अंमलबजावणी महिला व बाल विकास विभागामार्फत सुरु आहे.या कायदयाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संरक्षण अधिका-यांच्या नियुक्त्या करणे, त्यांचे प्रशिक्षण,त्यांच्या कार्यालयांना सोयी सुविधा पुरविणे, कायदयाच्या सनियंत्रणासाठी मुल्यांकन पध्दती विकसीत करून सांख्यिकी माहिती जिल्हा व तालुकास्तरावर अदयावत ठेवणे इ.अनेक महत्वाची कामे विभागामार्फत पार पाडली जात आहेत.

PWDVA २००५ कायदयाची अंमलबजावणीची जबाबदारी जरी विभागाची असली तरी या कायदयांतर्गत निश्चित केलेले सर्व स्टेकहोल्डर्स / सहभागी यंत्रणा यांची ही तितकीच महत्वाची जबाबदारी आहे. आय एल एस विधी महाविदयालयाच्या स्त्री अभ्यास केंद्राने सर्व सहभागी यंत्रणा / स्टेकहोल्डर्स जसे की, संरक्षण अधिकारी, वकील,पोलीस,वैदयकीय सेवा देणारे,सेवादायी संस्था आणि मा. न्यायदंडाधिकारी यांच्यासाठी तयार केलेल्या मार्गदर्शिका हया अत्यंत उपयुक्त असून त्याचा वापर सर्व स्टेकहोल्डर्सनी स्वतःच्या दैनंदिन कामात करणे आवश्यक आहे.जेणे करून पिडीत महिलेला लवकरात लवकर सर्व सेवा देणे शक्य होईल.

या मार्गदर्शिकेमध्ये दैनंदिन कामातही उदाहरणे देऊन टप्प्या टप्प्याने सर्व स्टेकहोल्डर्सच्या / सहभागी यंत्रणाच्या भूमिका व जबाबदा-या अधिक स्पष्ट करून सांगण्यात आल्या आहेत व त्या प्रत्येकासाठी उपयुक्त आहेत.

याबदल आय एल एस् विधी महाविदयालयाच्या स्त्री अभ्यास केंद्राचे विशेष आभार व PWDVA २००५ या कायदयाच्या अंमलबजावणीसाठी काम करणा-या सर्व सहभागी संस्था / यंत्रणा यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा !

(डॉ.हृषीकेश यशोद )
आयुक्त
महिला व बाल विकास
महाराष्ट्र राज्य,पुणे

मार्गदीपिका

‘कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५’

**न्यायदंडाधिकाऱ्यांची भूमिका**

## अनुक्रमणिका


१.० प्रस्तावना........5

२.० पार्श्वभूमी........5

३.० कौटुंबिक हिंसेपासून स्त्रियांच्या संरक्षणाच्या अधिनियमातील वैशिष्ट्यपूर्ण ठळक तरतुदी:........7

३.१ स्त्रियांच्या मानवी हक्कांशी, मूलभूत हक्कांशी कौटुंबिक हिंसेचा थेट संबंध: (सदर कायद्याची उद्दिष्टे)........8

३.२ कौटुंबिक हिंसेची व्यापक व्याख्या: (कलम 3)........8

३.३ महत्त्वाच्या काही इतर व्याख्या: (कलम 2)........8

३.४ न्यायदंडाधिकाऱ्यांवर टाकलेली विशेष जबाबदारी: (कलम 5)........8

३.५ पीडित महिलेचे विशेष अधिकार........9

३.६ विशेष यंत्रणांची नेमणूक - संरक्षण अधिकाऱ्यांची नेमणूक : कलम 8........9

३.७ विशेष यंत्रणांची नेमणूक -सेवा देणाऱ्या संस्थांची, व्यक्तींची नियुक्ती:कलम 10 .9

३.८ कुटुंबकल्याणाचे काम करणाऱ्या तज्ज्ञांची मदत : कलम 15........10

३.९ अणीबाणीची परिस्थिती हाताळण्यासाठीची तरतूद : कलम 4, नियम 9........10

३.१० कौटुंबिक हिंसेपासून संरक्षण होण्यासाठी वेगवेगळे न्यायालयीन आदेश : कलम 12, 18, 19, 20, 21, 22, 23........10

३.११ न्यायालयाची स्वतःची प्रक्रिया : कलम 28(2)........11

‘कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५’ची अंमलबजावणी........12

४.० न्यायालयीन कारवाईपूर्व टप्पा:........14

४.१ पीडित महिलेला माहिती देणे - कलम 5........14

४.१.१ न्यायदंडाधिकाऱ्यांवर माहिती देण्याची जबाबदारी....................................15

४.१.२ कोणती माहिती द्यायची?......................................................................15

४.१.३ माहिती कशी द्यावी?............................................................................19

४.२ संरक्षण अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या डीआयआरवर योग्य तो आदेश देणे - कलम 4, नियम 4,9 ..............................................................................................21

४.२.१ 'अणीबाणीची परिस्थिती' म्हणजे काय? ..................................................22

४.३ संरक्षण अधिकाऱ्यांनी न्यायालयात डीआयआर पाठवल्यावर न्यायदंडाधिकाऱ्यांनी करावयाची कृती - कलम 9, नियम 5..................................................................24

४.३.१ 'कौटुंबिक घटनेचा अहवाल'- डीआयआर म्हणजे काय? ............................24

५.० न्यायालयीन कारवाई चालू असतानाचा टप्पा ...................................................27

५.१ सदर कायद्याच्या कलम 12 खाली केलेल्या अर्जातील प्रमुख घटक..................27

५.२ अर्ज दाखल करून घेण्याचे कायदेशीर अधिकार कोणत्या न्यायालयास आहेत? ....30

५.३ सदर कायद्याखाली मिळवता येणारे न्यायालयीन आदेश:................................32

५.३.१ अंतरिम आणि एकतर्फी आदेश ...............................................................32

**५.३.२ कौटुंबिक हिंसेच्या प्रत्येक अर्जावर अंतरिम एकतर्फी / अंतिम संरक्षण आदेश देणे महत्त्वाचे आहे - सहा कारणेः** ....................................................................35

५.४ अर्ज 12 निकाली लावण्यासाठीची कालमर्यादा : ...........................................36

५.५ नोटीस बजावणे.........................................................................................36

५.५.१ प्रतिवादीवर बजावल्या जाणाऱ्या नोटीसीत काय असावे?............................37

५.५.२ विविध परिस्थितीत नोटीस कशी बजावावी? ............................................38

५.५.३ नोटीस बजावण्यात अपयश आल्यास त्याचे परिणाम काय होतात?.............41

५.५.४ संरक्षण अधिकाऱ्यांनी वेळेवर नोटीस बजावली नाही तर काय करावे?...........42

५.५.५ नोटिशीला प्रतिवादीचे उत्तर:...................................................................42

५.६ समुपदेशन:................................................................................................42

५.७ 'मध्यस्थी' (मेडीएशन):...............................................................................45

५.८ कुटुंब कल्याण तज्ज्ञ :....................................................................45

५.९ सुरक्षा नियोजन: ....................................................................46

५.१० अर्ज सुनावणीची प्रक्रिया....................................................................49

५.१०.१ प्रक्रिया....................................................................49

५.१०.२ अर्जाची सुनावणी - संरक्षण अधिकाऱ्यांची मदत....................................................................50

५.१०.३ संरक्षण अधिकाऱ्यांच्या मदतीचा जास्तीत जास्त उपयोग....................................................................50

५.११ संरक्षण अधिकाऱ्यांची तपासणी:....................................................................54

५.१२ इतर मुद्दे:....................................................................54

५.१३ न्यायालयास स्वतःची प्रक्रिया राबवण्याचे अधिकार कलम 28 (2):....................................................................55

५.१३.१ कलम 28. प्रक्रिया :....................................................................55

५.१४ गोपनीय (इन कॅमेरा) सुनावणी:....................................................................56

५.१५ पुराव्याची जबाबदारी: ....................................................................57

५.१६. न्यायालयीन आदेश: ....................................................................57

**५.१६.१ सदर कायद्याचे कलम 18 - संरक्षणाचा आदेश**....................................................................58

**५.१६.२ सदर कायद्याचे कलम 19 - निवासाचा आदेश**....................................................................59

**५.१६.३ सदर कायद्याचे कलम 20 - आर्थिक आदेश**....................................................................61

**५.१६.४ सदर कायद्याचे कलम 21 - ताबा आदेश**....................................................................63

**५.१६.५ सदर कायद्याचे कलम 22 - भरपाईचा आदेश**....................................................................64

**५.१६.६ सदर कायद्याचे कलम 23 - अंतरिम आणि एकतर्फी आदेश:** ....................................................................65

६.० न्यायालयाने आदेश दिल्यानंतरचा अंतिम टप्पा....................................................................67

६.१ आदेशांची अंमलबाजावणी ....................................................................67

६.१.१ संरक्षण आदेशाची अंमलबजावणी: ....................................................................68

६.१.२ निवासाच्या आदेशाची अंमलबजावणी:....................................................................68

६.१.३ आर्थिक साहाय्याच्या आणि नुकसान भरपाईच्या आदेशाची अंमलबजावणी: ...69

६.१.४ ताबा आदेशाची अंमलबजावणी:....................................................................70

६.१.५ विशिष्ट परिस्थितीत घ्यायची काळजी: ....................................................70
६.२ संरक्षण आदेशाचा भंग: ..............................................................................71
६.३ आदेशात बदल करणे: ..................................................................................72
६.४ अपील ......................................................................................................72
७.० समारोप ......................................................................................................73
परिशिष्टे ............................................................................................................74

मार्गदीपिका

‘कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५’

# न्यायदंडाधिकाऱ्यांची भूमिका

## १.० प्रस्तावना

‘घर’ ही प्रत्येक व्यक्तीसाठी सर्वात जास्त सुरक्षित जागा आहे असे प्रथम दर्शनी सर्वांनाच वाटते. परंतु राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील अनेक संशोधनातून हे सिद्ध झाले आहे की महिलांसाठी सर्वात जास्त असुरक्षित जागा म्हणजे तिचे राहते घर! कारण घरात राहणाऱ्या लोकांकडून कुटुंबांतर्गत होणाऱ्या महिलांवरील हिंसेचे प्रमाण फार मोठे आहे. भारतही ह्या परिस्थितीला अपवाद नाही.

कौटुंबिक हिंसेला प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने अनेक उपाययोजना सरकारतर्फे तसेच सामाजिक संस्थांतर्फे करण्यात येतात. त्यातील ‘कायदा’ हे माध्यम अर्थातच एक प्रमुख माध्यम आहे. आतापर्यंत दिवाणी आणि फौजदारी स्वरूपाचे अनेक कायदे कौटुंबिक हिंसेसंदर्भात पारित झालेले आहेत. उदा. हुंडा प्रतिबंधक कायदा, भारतीय दंडविधान संहितेतील काही कलमे- 498A, 305B, इत्यादी.

‘कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५’ (यापुढे या अधिनियमाचा सदर कायदा असा उल्लेख केला जाईल) ‘कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण नियम, २००६’ (यापुढे या नियमाचा सदर नियम असा उल्लेख केला जाईल.) ह्या संदर्भात न्यायदंडाधिकाऱ्यांच्या भूमिकेबद्दल आपण ह्यापुढे सविस्तर चर्चा करणार आहोत.

## २.० पार्श्वभूमी

कायद्यातील तरतुदींच्या अनुषंगाने न्यायदंडाधिकाऱ्यांची भूमिका समजावून घेण्याआधी या मार्गदीपिकेच्या पहिल्या भागात लिंगभाव आणि कौटुंबिक हिंसा ह्या संदर्भात सखोल मांडणी केली आहे, ती समजावून घेणे फार आवश्यक आहे. कौटुंबिक हिंसेची समस्या किती गंभीर, गुंतागुंतीची आहे, पुरुषप्रधान आणि पितृसत्ताक समाजरचनेतील सत्तासंबंध, त्यामुळे लिंगभावाधिष्ठित होणारी स्त्रियांवरील कुटुंबांतर्गत शारीरिक, मानसिक, लैंगिक, आर्थिक, शाब्दिक हिंसा, स्त्री-पुरुषांमध्ये भेदभाव निर्माण करणारी कशी आहे, स्त्रीच्या मानवी हक्कांचे, राज्यघटनेने दिलेल्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन करणारी कशी आहे हे संवेदनशील दृष्टिकोनातून

पाहणे फार महत्त्वाचे आहे.[1] घराचा उंबरठा ओलांडून हिंसा पीडित स्त्री आपली व्यथा मांडण्यासाठी त्रयस्थ अशा न्यायसंस्थेपर्यंत पोचते तेव्हा ती कोणकोणत्या संकटांना सामोरी गेली आहे, ह्याची ओळख होण्यासाठी समानुभूतीतून तिच्या प्रश्नांकडे पाहण्यासाठी पहिल्या भागातली मांडणी समजून घेणे अतिशय महत्त्वाचे आहे.

सत्ता किंवा अधिक सत्ता असलेली व्यक्ती आपल्यापेक्षा कमकुवत (शारीरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक दृष्ट्या) व्यक्तीवर नियंत्रण ठेवण्यासाठी हिंसेचा सहज वापर करते. स्वतःची सत्ता ही जणू काही निसर्गदत्तच आहे अशा मनोभूमिकेतून, विचारातून हिंसा होते. त्यामुळेच हिंसा ही एक घटना नसून पुरुषप्रधान प्रजासत्ताक व्यवस्थेतून, मानसिकतेतून ती निर्माण होते. ह्या व्यवस्थेमध्ये शतकानुशतके चालत आलेल्या स्री-पुरुषांच्या साचेबंद प्रतिमांमधून 'आदर्श स्त्री ' कोण, 'आदर्श पुरुष' कोण हे ठरवले जाते. ह्या प्रतिमाच स्त्री पुरुष नात्यामध्ये उतरंड तयार करतात, स्त्रियांना दुय्यम लेखतात. त्यातूनच स्त्रीच्या वागण्याबोलण्यावर, विचारावर नियंत्रण ठेवले जाते. हिंसा करताना स्वतःचे वर्तन गैर आहे ह्याची जाणीवही, विचारही मनामध्ये न आणून देण्याची क्षमता ह्या व्यवस्थेमध्ये दिसते. हिंसा ही व्यक्तीचा शांततेने जगण्याचा मूलभूत हक्क हिरावून घेते, ती नात्यामध्ये भेदभाव निर्माण करते, मानवी हक्कांची पायमल्ली करते आणि म्हणूनच कोणीही कोणावरही केलेल्या हिंसेचे कधीच समर्थन होऊ शकत नाही, हा विचार पहिल्या भागात प्रभावीपणे मांडला आहे. न्यायालयामध्ये कौटुंबिक हिंसेच्या संदर्भात केसेस हाताळताना ही पार्श्वभूमी मनात ठेऊन, लिंगभावाधिष्ठित दृष्टिकोनातून, समानुभूतीच्या भूमिकेतून, संवेदनशीलतेने बघितल्यास, सदर कायद्याची अंमलबजावणी निश्चितच परिणामकारक, न्याय्य पद्धतीने होईल असा विश्वास वाटतो.

सदर कायद्याच्या उद्दिष्टांमध्ये कौटुंबिक हिंसा ही मानवी हक्कांच्या उल्लंघनाचा वादातीत मुद्दा आहे, विकासाला खीळ घालणारा आहे, ती मोठ्या प्रमाणात होते आहे आणि तरीही सार्वजनिक जीवनात तिची फारशी दाखल घेतली जात नाही असे म्हटले आहे. भारतीय दंडविधान संहितेतील कलम 498A जरी कौटुंबिक हिंसा गुन्हा ठरवत असले तरी सर्व समावेशक पद्धतीने कौटुंबिक हिंसेच्या विरोधात दिवाणी कायद्यात तरतूद नाही, आणि म्हणूनच भारतीय राज्यघटनेतील कलम 14, 15, 21 विचारात घेऊन स्त्रियांचे कौटुंबिक हिंसेपासून संरक्षण

---

[1] *Krishna Bhatacharjee* Vs. *Sarathi Choudhury* (2016) 2 SCC 705; *Aniket Tupe* Vs. *Piyusha Tupe* https://indiankanoon.org/doc/26774800/ decided by Bom HC on 22nd March 2018

करण्यासाठी आणि त्यास प्रतिबंध घालण्यासाठी कौटुंबिक हिंसेपासून स्त्रियांच्या संरक्षणाचा अधिनियम हा कायदा तयार करण्यात आला आहे. कायद्याच्या ह्या उद्दिष्टांमध्ये आपल्या राज्यघटनेचा तसेच सिडॉ (Convention on Elimination of all forms of Discrimination Against Women - CEDAW) ह्या मानवी हक्काच्या कराराच्या सर्वसाधारण शिफारशींचा विशेष उल्लेख केलेला आहे. आणि म्हणूनच सदर कायद्याची बांधणी ही भारतीय राज्यघटनेच्या आणि आंतरराष्ट्रीय मानवी हक्कांच्या कराराच्या आधाराने झालेली आहे. ही बाब लक्षात ठेऊनच कायद्याची अंमलबजावणी करण्याची अत्यंत महत्त्वाची जबाबदारी न्यायालयीन यंत्रणेवर आहे. ती कशी समर्थपणे निभावता येईल ह्याची चर्चा आपण या पुढील भागात करू या.

## ३.० कौटुंबिक हिंसेपासून स्त्रियांच्या संरक्षणाच्या अधिनियमातील वैशिष्ट्यपूर्ण ठळक तरतुदी:

- ३.१ स्त्रियांच्या मानवी हक्कांशी, मूलभूत हक्कांशी कौटुंबिक हिंसेचा थेट संबंध (सदर कायद्याचा उद्देश)
- ३.२ कौटुंबिक हिंसेची व्यापक व्याख्या (कलम 3)
- ३.३ काही इतर महत्त्वाच्या व्याख्या (कलम 2)
- ३.४ न्यायदंडाधिकाऱ्यांवर टाकलेली विशेष जबाबदारी (कलम 5)
- ३.५ पीडित महिलेचे विशेष अधिकार
- ३.६ विशेष यंत्रणांची नेमणूक - संरक्षण अधिकाऱ्यांची नेमणूक (कलम 8)
- ३.७ विशेष यंत्रणांची नेमणूक - सेवा देणाऱ्या संस्थांची, व्यक्तींची नियुक्ती (कलम10)
- ३.८ कुटुंबकल्याणाचे काम करणाऱ्या तज्ज्ञांची मदत (कलम 15)
- ३.९ अणीबाणीची परिस्थिती हाताळण्यासाठीची तरतूद (कलम 4, नियम 9)
- ३.१० कौटुंबिक हिंसेपासून संरक्षण होण्यासाठी वेगवेगळे न्यायालयीन आदेश (कलम 12, 18, 19, 20, 21, 22)
- ३.११ न्यायालयाची स्वतःची प्रक्रिया (कलम 28 (2))

वरील सर्व तरतुदी ह्या न्यायालयाचे काम उत्तमरित्या पार पाडण्यासाठी आणि हिंसापीडित स्त्रीला कौटुंबिक हिंसेपासून संरक्षण आणि योग्य तो न्याय मिळण्यासाठी केलेल्या आहेत. त्या तरतुदींचे महत्त्व सुरुवातीलाच थोडक्यात जाणून घेऊ या.

## ३.१ स्त्रियांच्या मानवी हक्कांशी, मूलभूत हक्कांशी कौटुंबिक हिंसेचा थेट संबंध: (सदर कायद्याची उद्दिष्टे)

प्रस्तावनेत लिहिल्याप्रमाणे ह्या कायद्याच्या उद्दिष्टांमध्येच कौटुंबिक हिंसा ही स्त्रियांच्या राज्यघटनाधारित मूलभूत हक्कांना बाधा आणते, तसेच आंतरराष्ट्रीय करारानुसार कौटुंबिक हिंसा ही स्त्रीच्या मानवी हक्कांच्या विरोधात काम करते आणि म्हणून हा कायदा वाचताना त्याचा अन्वयार्थ लावताना, न्याय करताना, निर्णय देताना ही बाब सतत लक्षात ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. कोणत्याही स्वरूपातील छोटी-मोठी, साधी, गंभीर हिंसा ही कायद्याविरोधातीलच आहे. तिचे कोणत्याही प्रकारे प्रचलित असणाऱ्या समजुती-गैरसमजुतीं आधारे समाजमान्य असणाऱ्या हिंसक कृतींचे समर्थन होऊ शकत नाही ह्याची खूणगाठ बांधणे आवश्यक आहे.

## ३.२ कौटुंबिक हिंसेची व्यापक व्याख्या: (कलम 3)

सदर कायदा हा भारतातील पहिलाच कायदा आहे ज्यामध्ये 'कौटुंबिक हिंसेची' अतिशय व्यापक व्याख्या केली आहे. मानवी हक्कांसंदर्भातील आंतरराष्ट्रीय करारांची अंमलबजावणी करण्यासाठी नियुक्त केलेल्या समितीने जी व्याख्या केली आहे, त्या व्याख्येचा आधार घेऊन ही व्याख्या केली आहे. शारीरिक, मानसिक, शाब्दिक, भावनिक, आर्थिक, लैंगिक अशा सर्व प्रकारच्या हिंसेचा समावेश ह्या व्याख्येत केलेला आहे.

## ३.३ महत्त्वाच्या काही इतर व्याख्या: (कलम 2)

कोणत्या हिंसापीडित व्यक्तीला सदर कायद्याखाली केव्हा, कोणाविरुद्ध दाद मागता येईल हे स्पष्ट करण्यासाठी काही इतर महत्त्वाच्या व्याख्याही करण्यात आल्या आहेत. उदाः कौटुंबिक नाते संबंध, सामाईक घर, अर्जदार पीडिता, प्रतिवादी, कौटुंबिक घटनेचा अहवाल - डीआयआर इत्यादी.

## ३.४ न्यायदंडाधिकाऱ्यांवर टाकलेली विशेष जबाबदारी: (कलम 5)

न्यायदंडाधिकाऱ्यांनी हिंसापीडित व्यक्तीला सदर कायद्याच्या अंतर्गत असलेल्या हक्कांची, इतर सेवांची माहिति देण्याबाबत महत्त्वाची वैशिष्ट्यपूर्ण केलेली तरतूद म्हणजे त्यांच्यावर टाकलेली विशेष जबाबदारी! आतापर्यंत कोणत्याही कायद्यांमध्ये दावा न्यायालयात दाखल होण्यापूर्वी न्यायदंडाधिकाऱ्यांवर कोणतीही जबाबदारी टाकलेली नव्हती. प्रथमच सदर कायद्याच्या तरतुदींमध्ये एखादी हिंसापीडित महिला न्यायालयासमोर आल्यास तिला ह्या कायद्यांतर्गत दिलेल्या तिच्या अर्ज करण्याच्या हक्कासंदर्भात संरक्षणाचा आदेश, पोटगीचा

आदेश, घरात राहण्याचा आदेश, नुकसानभरपाईचा आदेश, मुलांचा ताबा मिळण्याविषयीचा आदेश यांची माहिती देणे, तसेच इतर कोणकोणत्या सेवा तिला उपलब्ध होऊ शकतात, संरक्षण अधिकाऱ्यांची सेवा, मोफत कायदेशीर सेवा आणि भारतीय दंड विधानातील कलम 498A ची तरतूद ह्याबाबत माहिती देणे बंधनकारक केले आहे.

पीडित स्त्रीशी न्यायालयीन यंत्रणेचा संवाद निर्माण होण्याच्या दृष्टीने त्रयस्थ अशा न्यायदानाच्या संस्थेकडे कोणत्याही दडपणाशिवाय स्त्रियांनी यावे ह्या दृष्टीने त्यांनी मोकळेपणाने आपली व्यथा सांगून कायद्यातील तरतुदींची सूज्ञ, तज्ज्ञ व्यक्तींकडून माहिती करून घ्यावी ह्या भूमिकेतून ही तरतूद केली असावी, ह्याची जाणीव न्यायाधीशांना असणे हे विशेषत्वाने समजून घेणे गरजेचे आहे.

## ३.५ पीडित महिलेचे विशेष अधिकार

सदर कायदा हिंसा पीडित महिलेचे तीन महत्त्वाचे अधिकार ओळखतो; ते म्हणजे - हिंसामुक्त जीवन जगण्याचा अधिकार - कलम 3, सामाईक घरात राहण्याचा अधिकार - कलम 17, आणि समस्येचे समाधान मिळवण्याचा अधिकार - कलम 12.

## ३.६ विशेष यंत्रणांची नेमणूक - संरक्षण अधिकाऱ्यांची नेमणूक : कलम 8

सदर कायद्यामध्ये हिंसापीडित स्त्रीला सर्वतोपरी साहाय्य करण्यासाठी संरक्षण अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यासाठी तरतूद केली आहे. त्याचबरोबर संरक्षण अधिकारी ही यंत्रणाच न्यायदंडाधिकाऱ्यांना त्यांचे काम सुलभपणे करता येण्याच्या दृष्टीने आणि पर्यायाने पीडितेला न्याय मिळण्याच्या दृष्टीने निर्माण केली आहे. त्यामुळे न्यायदंडाधिकाऱ्यांनी सदर कायद्याखालील न्यायालयीन कामकाजाच्या संदर्भात संरक्षण अधिकाऱ्यांचा जास्तीत जास्त उपयोग करून घ्यायला हवा. दिवाणी न्यायालयात स्त्रियांवरील कौटुंबिक हिंसेच्या संदर्भात अशा प्रकारची औपचारिक यंत्रणा प्रथमच उपलब्ध करून देण्यात आली आहे. तिचा पुरेपूर उपयोग न्यायदंडाधिकाऱ्यांनी करून घेणे महत्त्वाचे आहे.

## ३.७ विशेष यंत्रणांची नेमणूक -सेवा देणाऱ्या संस्थांची, व्यक्तींची नियुक्ती:कलम 10

संरक्षण अधिकाऱ्यांबरोबरच, हिंसापीडित स्त्रीची परिस्थिती लक्षात घेऊन इतरही अनेक सेवांची उदा : आधारगृह, वैद्यकीय सेवा, कायदेविषयक सेवा, समुपदेशनाची सेवा, पोलिस इत्यादी सेवा मिळण्यासाठीची तरतूद ह्या कायद्यामध्ये केली आहे. ही तरतूद ह्या कायद्याचे वेगळेपण दाखवते. तसेच पीडितेच्या समस्यांचा एकत्रितपणे विचार करण्याची भूमिकाही

त्यातून स्पष्ट होते. ह्या सेवा पुरविणाऱ्या यंत्रणांची माहिती करून घेणे आणि जेव्हा वेळ येईल तेव्हा पीडितेसाठी ह्या सेवांचा कसा उपयोग करून घेता येईल हे बघण्याची जबाबदारी न्यायदंडाधिकाऱ्यांवर आहे.

### ३.८ कुटुंबकल्याणाचे काम करणाऱ्या तज्ज्ञांची मदत : कलम 15

सदर कायद्याचे अजून एक वैशिष्ट्य अधोरिखित करायला हवे. सेवादायी संस्थांबरोबरच न्यायदंडाधिकाऱ्यांना योग्य वाटल्यास ते एखाद्या कुटुंबकल्याणाचे काम करणाऱ्या तज्ज्ञ व्यक्तीची मदत न्यायालयीन कामकाज उत्कृष्टपणे पार पाडण्यासाठी घेऊ शकतात. औपचारिकतेच्या पलीकडे जाऊन समाजातील सूज्ञ, तज्ज्ञ, जबाबदार व्यक्तींना न्यायदानात सहभागी करून घेता यावे या हेतूने ही तरतूद असावी. त्याचा योग्य तो उपयोग करून घेण्याची जबादारी अर्थातच न्यायदंडाधिकाऱ्यांवर आहे.

### ३.९ अणीबाणीची परिस्थिती हाताळण्यासाठीची तरतूद : कलम 4, नियम 9

एखाद्या महिलेवर तीव्र स्वरूपातील कौटुंबिक हिंसा झाल्यास अणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली तर ती हाताळण्यासाठी संरक्षण अधिकारी, पोलिस तसेच न्यायालयीन यंत्रणेवर जबाबदारी टाकण्यात आली आहे. संरक्षण अधिकाऱ्यांनी अशी परिस्थिती न्यायालयासमोर आणून योग्य तो आदेश मिळण्यासाठी अर्ज करणे आवश्यक आहे. ह्या परिस्थितीत कदाचित महिला स्वतः अर्ज करण्याच्या स्थितीत नसल्यास प्रसंगाचे गांभीर्य लक्षात घेऊन न्यायदंडाधिकाऱ्यांनी आदेश देणे जरुरीचे आहे, हे समजून घेणे फार महत्त्वाचे आहे.

### ३.१० कौटुंबिक हिंसेपासून संरक्षण होण्यासाठी वेगवेगळे न्यायालयीन आदेश : कलम 12, 18, 19, 20, 21, 22, 23

सदर कायद्यामधील अनेक महत्त्वाच्या वैशिष्ट्यांपैकी ही एक अतिशय ठळक तरतूद आहे. हिंसापीडितेला सर्वार्थाने, सर्वसमावेशक न्याय मिळण्याच्या दृष्टीने, तिच्या समोर उभ्या ठाकलेल्या परिस्थितीला समर्थपणे तोंड देता यावे म्हणून सर्व प्रकारच्या आदेशांची तरतूद केली आहे. योग्य परिस्थितीत योग्य ते आदेश देण्याची अत्यंत महत्त्वाची जबाबदारी न्यायदंडाधिकाऱ्यांवर आहे. संरक्षणाचा आदेश, घरात राहण्याचा आदेश, मुलांच्या ताब्याचा आदेश, पैशाच्या संदर्भातील आदेश, नुकसान भरपाईचा आदेश ह्यांची तरतूद केलेली आहे. हे सर्व आदेश एकतर्फी अंतरिम किंवा अंतरिम मिळण्याचीही तरतूद कलम 23 मध्ये केलेली आहे.

## ३.११ न्यायालयाची स्वतःची प्रक्रिया : कलम 28(2)

सदर कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी पीडितेला योग्य तो आदेश मिळवून देण्यासाठी न्यायदानाच्या तांत्रिक, क्लिष्ट प्रकियेतून बाहेर पडण्यासाठी, पीडितेच्या हिताच्या दृष्टीने केलेल्या कायद्यासाठी एक अत्यंत महत्त्वाची आणि संपूर्णतः वेगळीच तरतूद केलेली आहे. ती म्हणजे प्रत्येक  न्यायदंडाधिकाऱ्यांना अर्ज चालवताना स्वतःची अशी न्यायालयीन प्रक्रिया राबविण्याचे दिलेले स्वातंत्र्य. न्यायालयीन प्रक्रियेसंदर्भातील ही कलम 28(2) मधील सर्वात महत्त्वाची तरतूद आहे. विशेतः लिंगभावाच्या, मानवी हक्कांच्या दृष्टिकोनातून हिंसापीडित स्त्रियांच्या हितासाठी असलेल्या कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी न्यायदंडाधिकाऱ्यांना दिलेली ही मुभा म्हणजे योग्य त्या न्यायदानासाठी निर्माण केलेली पर्वणीच! पुढील पानांमध्ये आपण कुठे कुठे ह्या वैशिष्ट्यपूर्ण तरतुदींचा उपयोग करून घेता येईल हे आवर्जून बघणार आहोत.

थोडक्यात कौटुंबिक हिंसा पीडित महिलेला जास्तीत जास्त संरक्षण देण्याच्या दृष्टीने सदर कायदा अस्तित्वात आला आहे.[2] न्यायसंस्थेला सर्व मदत मिळावी आणि हिंसा थांबावी म्हणून व्यापक स्वरूपाची यंत्रणा निर्माण करण्यात आली आहे. मात्र ह्या कायद्याचे यश हे न्यायदंडाधिकाऱ्यांच्या मानवतावादी कृतीशील भूमिकेवर अवलंबून असणार आहे, कारण त्यांचे योगदान हे कायद्याच्या अंमलबजावणीत कळीचा मुद्दा राहणार आहे![3]

---

[2] *Chandrkant Wagh* Vs. *Manisha Wagh* http://www.thelaws.com/Encyclopedia/Browse/Case?CaseId=313102490200 as seen on 7th Oct 2018

[3] *Krishna Bhatacharjee* Vs. *Sarathi Choudhury* (2016) 2 SCC 705

# ‘कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५’ची अंमलबजावणी

आपल्याला माहीत आहे की २००५ मध्ये पारित झालेला हा कायदा लोकशाही पद्धतीने तयार केला गेला आहे. हा कायदा तयार होण्यापूर्वी कौटुंबिक हिंसा पीडितांशी स्त्रीवादी चळवळीच्या सदस्यांशी, स्त्रियांच्या हक्कांविषयीच्या आणि कौटुंबिक हिंसेच्या समस्यांवर काम करणाऱ्या अनेक संस्थांशी तसेच न्यायाधीश, वकील, कायद्याचे, समाजशास्त्राचे प्राध्यापक, कायद्याचे अभ्यासक ह्या सर्वांबरोबर चर्चा करून ह्या कायद्याची बांधणी करण्यात आली आणि म्हणूनच इतर कायद्यापेक्षा वेगळ्या, वैशिष्ट्यपूर्ण तरतुदी ह्या कायद्यात आल्या आहेत. ह्या तरतुदींची माहिती, विश्लेषण आपण हिंसापीडित स्त्रीला केंद्रस्थानी ठेऊन करून घेऊ या. ह्या कायद्यामध्ये तीन टप्प्यांवर पीडित स्त्रीच्या संदर्भात तरतुदी केलेल्या आहेत.

१. न्यायालयीन कारवाईपूर्व टप्पा.
२. न्यायालयीन कारवाई सुरू असतानाचा टप्पा.
३. न्यायालयाने अंतिम आदेश दिल्यानंतर आदेशाच्या अंमलबजावणीच्या संदर्भातील टप्पा.

ह्या प्रत्येक टप्प्यावर न्यायदंडाधिकाऱ्यांची भूमिका काय, ती पार पडताना कोणती काळजी घ्यावी ह्याची चर्चा आपण करणार आहोत.

**तीन टप्पे**:
कौटुंबिक हिंसेला तोंड देणाऱ्या पीडितेस सदर कायद्याच्या तरतुदींनुसार कायद्याची मदत घ्यायची असेल तर तिला तीन टप्प्यातून जावे लागते




या तिच्या प्रवासात न्यायदंडाधिकाऱ्यांना **जी जबबदारी पार पाडावी** लागते त्याबाबतची मांडणी ह्या भागात केली आहे.
सदर कायद्यामधील (२००५) कलमे आणि सदर नियमांमधील (२००६) नियमांचा संदर्भ घेऊन त्यावर टप्प्या-टप्प्याने चर्चा केली आहे.

**कृपया नोंद घ्यावी:**

**या मार्गदीपिकेत अन्य कुठल्याही कायद्याचा विशिष्ट उल्लेख नसल्यास 'कलम' आणि 'नियम' ह्या संज्ञा अनुक्रमे 'कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण अधिनियम (२००५)' आणि 'कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण नियम (२००६)' मधील तरतुदी असे समजून वाचाव्यात. तसेच 'हा कायदा' किंवा 'सदर कायदा' असे शब्द जिथे वापरले असतील तिथे ते 'कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण अधिनियम (२००५)' या संदर्भात वापरले आहेत हे लक्षात घ्यावे.**

# ४.० न्यायालयीन कारवाईपूर्व टप्पा:

**न्यायालयीन कारवाईपूर्व टप्पा**

४.१ पीडित महिलेला माहिती देणे - कलम 5

४.२ संरक्षण अधिकाऱ्यांनी कौटुंबिक घटना अहवाल (डोमेस्टिक इन्सीडन्स रिपोर्ट - डीआयआर) पाठवल्यास तो ठेऊन घेणे - कलम 4, नियम 4, 9

४.३ डीआयआरवर योग्य तो आदेश देणे - कलम 4, नियम 4 व 9

## ४.१ पीडित महिलेला माहिती देणे - कलम 5

सदर कायदा हा पहिलाच कायदा आहे ज्यामध्ये कलम 5 अन्वये पीडित स्त्रीला कोणते अधिकार दिले आहेत त्याची माहिती देण्याची जबादारी कायद्यात उल्लेख केलेल्या सहभागी व्यक्तींवर - संरक्षण अधिकारी, पोलिस, सेवा पुरवणारे आणि न्यायदंडाधिकारी - यांच्यावर टाकली आहे. बरेचदा महिलांना आपल्या तक्रारीसाठी दाद कुठे मागायची ह्याची माहिती नसते. घरातले प्रश्न बाहेरच्याकडे कसे न्यायचे असे त्यांना वाटत असते. दुखापत झाली तर डॉक्टरकडे जायचे कळते, मारहाण झाली तर पोलिसांकडे जावे हेही समजते. पण पोलिसांकडे गेल्यास घरच्या लोकांना अटक होईल, मारहाण होईल अशी भीतीही वाटत असते. तसे झाले तर हिंसा करणारे आपल्याला अजूनच त्रास देतील ही भीतीही तिच्या मनात असू शकते.

हिंसा झाल्यावर महिला दाद मागायला सरकारी यंत्रणेकडे सहसा लगेच जात नाहीत. तडजोडीचे इतर सर्व मार्ग वापरून झाल्यावरही हिंसा कमी होत नाहीये, कदाचित दिवसेन् दिवस वाढतच चालली आहे हे लक्षात आल्यावर पीडिता हिंसेच्या स्वरूपाप्रमाणे (उदा. गंभीर शारीरिक इजा) एक तर वैद्यकीय मदत घेण्यासाठी बाहेर पडते किंवा पोलिसांकडे जाते. पोलिस किंवा वैद्यकीय सेवा पुरवणाऱ्यांवर आतापर्यंत कायद्याने तक्रार करणाऱ्या व्यक्तीला तिच्या हक्कांची माहिती देण्याची जबाबदारी टाकलेली नव्हती.

प्रथमच ह्या कायद्यातील सर्व सहभागी व्यक्तींवर ज्यांच्याकडे महिलेची तक्रार येईल त्यांनी पीडित महिलेला सदर कायद्याखालील तिच्या हक्कांची माहिती देण्याची जबाबदारी टाकण्यात आली आहे. न्यायदंडाधिकाऱ्यांचाही त्यामध्ये समावेश करण्यात आला आहे ही विशेष उल्लेखनीय बाब आहे.

### ४.१.१ न्यायदंडाधिकाऱ्यांवर माहिती देण्याची जबाबदारी

अन्यायग्रस्त महिलांना योग्य ते मार्गदर्शन व्हावे, न्यायदंडाधिकाऱ्यांच्या ज्ञानाचा फायदा सामान्यांपर्यंत पोचावा, त्यांनाही स्त्रियांचे प्रश्न, त्यांची तीव्रता, गंभीरता समजावी या हेतूने ही तरतूद केली असणार. तसेच महिलांची न्यायालयाबाबतची भीती, दडपण जावे हाही उद्देश त्यामागे असू शकतो. प्रत्यक्षात किती महिला न्यायालयात कौटुंबिक हिंसेची समस्या घेऊन जातात हा प्रश्न आहे. परंतु न्यायदंडाधिकाऱ्यांनी पुढाकार घेऊन ह्या तरतुदीची अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली तर महिलांना त्याचा नक्कीच फायदा होऊ शकेल.

एका न्यायदंडाधिकाऱ्यांनी स्वतःचा अनुभव सांगितला. कोर्ट चालू असताना कोर्टाच्या बाहेर एक महिला फेऱ्या मारत होती. त्यांनी तिला बोलावून घेतले आणि काय अडचण आहे, काही हवे आहे का असे विचारले. तेव्हा त्या महिलेने स्वतःवर कौटुंबिक हिंसा होते आहे आणि यासाठी तिला कायद्याची मदत हवी आहे असे सांगितले. त्यांनी तिला सदर कायद्याची सविस्तर माहिती दिली आणि मोफत कायदा साहाय्य सेवा देणाऱ्यांकडे पाठवले.

दुसऱ्या एका न्यायदंडाधिकाऱ्यांनी आपल्या न्यायालयाच्या बाहेरील नोटीस फलकावर सदर कायद्याची माहिती इथे मिळेल, अशा प्रकारचे पोस्टर लावले होते.

इथे एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी. अर्ज करण्याआधी, म्हणजेच सदर कायद्यानुसार न्यायालयीन प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी, न्यायालयासमोर कौटुंबिक हिंसा झाल्याची **तक्रार** आल्यास कलम 5 प्रमाणे पीडित महिलेला माहिती देणे न्यायदंडाधिकाऱ्यांवर बंधनकारक आहे. कलम 5 मध्ये 'तक्रार' असा शब्द आहे. 'अर्ज' हा शब्द कलम १२ मध्ये आहे.

### ४.१.२ कोणती माहिती द्यायची?

अ. पीडित महिला संरक्षण आदेश, अर्थ साहाय्य, मुलांचा तात्पुरता ताबा मिळवण्यासाठी ताबा आदेश, निवासाचा आदेश, नुकसानभरपाईचा आदेश हे सर्व किंवा ह्यापैकी कोणतेही आदेश मिळवण्यासाठी न्यायालयात अर्ज करू शकते, तो तिचा अधिकार आहे.

ब. सेवा पुरवणाऱ्यांच्या साहाय्याची उपलब्धता.

क. संरक्षण अधिकाऱ्यांच्या सेवेची उपलब्धता.

ड. राज्य विधी सेवा अधिकाऱ्यांकडून कायद्याची निःशुल्क मदत मिळण्याची उपलब्धता.

ई. जिथे योग्य असेल तिथे भारतीय दंड विधानातील कलम 498A खाली तक्रार करण्याचा हक्क.

मात्र आपल्यापुढे आलेल्या महिलेची केस सदर कायद्याखाली बसेल का हे त्याआधी जाणून घेणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी **तीन प्रश्नांची उत्तरे** माहीत करून घेणे जरुरीचे आहे:

१. महिलेवर 'कौटुंबिक हिंसा' होत आहे का किंवा झाली आहे का ज्यामध्ये 'प्रतिवादीच्या' वर्तनाने पीडितेस शारीरिक/ मानसिक/ भावनिक/ लैंगिक /आर्थिक दृष्ट्या अपाय/ इजा/ छळ/ झाला आहे का किंवा धमकी/ धोका आहे का?

२. तिचे प्रतिवादीबरोबर 'कौटुंबिक नाते संबंध' आहेत का / होते का?

३. ती 'सामाईक घरात' राहत आहे का / राहत होती का?

वरील तीनही प्रश्नांची उत्तरे 'होय' असल्यास सदर कायद्याखाली मदत घेण्यास ती पात्र आहे.

सदर कायद्यानुसार 'कौटुंबिक हिंसा' म्हणजे काय याची पहिल्या भागात चर्चा केली आहे. पण एकत्रित माहिती असण्याच्या दृष्टीतून ही व्याख्या तसेच इतरही काही महत्त्वाच्या व्याख्या बघू या.

## सदर कायद्याखालील काही महत्त्वाच्या व्याख्या

### 'कौटुंबिक हिंसा' म्हणजे काय?

कलम 3 प्रमाणे 'कौटुंबिक हिंसा' म्हणजे

- पीडित व्यक्तीस अपाय करणे, इजा पोहोचवणे, किंवा तिच्या आरोग्यास, सुरक्षिततेस, जीवितास किंवा एखाद्या अवयवास, किंवा तिच्या स्वास्थ्यास धोका निर्माण करणे किंवा तशी प्रवृत्ती असणे.
- शारीरिक, लैंगिक, आर्थिक, शाब्दिक, भावनिक छळ करणे
- पीडित व्यक्तीचा किंवा अन्य संबंधित व्यक्तीचा हुंडा किंवा मालमत्ता किंवा मौल्यवान वस्तुंची बेकायदेशीर मागणी करण्यासाठी जबरदस्ती करण्याच्या उद्देशाने छळ करणे, दुखापत करणे, किंवा तिच्या जीवितास धोका निर्माण करणे.
- तिला किंवा तिच्याशी संबंधित नातेवाईकांना धमकावणे

(शारीरिक हिंसा, लैंगिक हिंसा, आर्थिक हिंसा, शाब्दिक हिंसा, भावनिक छळ ह्या सर्व शब्दांचे स्पष्टीकरण कलम 3 मध्ये दिले आहे. तसेच सदर कायद्याच्या नियमाखालील फॉर्म ४ मध्ये प्रत्येक हिंसेच्या प्रकाराची अनेक उदाहरणे दिलेली आहेत, ती बघावी. तसेच मार्गादीपिकेच्या पहिल्या भागामध्येही सर्व प्रकारांच्या हिंसेची उदाहरणे दिलेली आहेत, तीही बघावी.)

**'कौटुंबिक नातेसंबंध' म्हणजे काय?**

कलम 2(f) प्रमाणे 'कौटुंबिक नातेसंबंध' म्हणजे जेव्हा -

- दोन व्यक्ती एकत्रित घरात राहतात किंवा एके काळी राहत असताना
- त्या दोन व्यक्तींमधे रक्ताच्या नात्याने, विवाहाने किंवा विवाहसदृश नातेसंबंधांमुळे किंवा दत्तकविधानामुळे नातेसंबंध आहेत किंवा एकत्र कुटुंबातील सदस्य म्हणून ते एकत्र राहत आहेत.

**विवाहसदृश नातेसंबंध म्हणजे काय?**

विवाहसदृश नातेसंबंध म्हणजे सर्वसाधारण कायद्याप्रमाणे विवाह. तसेच (सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार) विवाहसदृश नातेसंबंध ओळखण्यासाठी न्यायालयीन निर्णयांनी[4] काही अटी दिल्या आहेत. त्यापैकी काही अटी खालीलप्रमाणे आहेतः

- त्यांच्या आजूबाजूचा समाज त्यांना ते जोडीदार असल्याप्रमाणे नवरा- बायको म्हणून ओळखतो.
- बराच काळ ते स्वेच्छेने पती-पत्नी सारख्या नात्याने एकत्र राहिलेले आहेत.
- त्या विवाहयोग्य वयाच्या प्रौढ व्यक्ती आहेत.
- ते कायदेशीर विवाह करण्यास योग्य आहेत.

**'प्रतिवादी' कोण असतो?**

- कलम 2(q) प्रमाणे 'प्रतिवादी' म्हणजे कोणताही प्रौढ पुरुष जो पीडितेबरोबर कौटुंबिक नातेसंबंधात आहे आणि ज्याच्याविरुध्द तिने या कायद्याखाली न्यायालयीन आदेशाची मागणी केलेली आहे.
- तथापि, कलम 2(q) च्या अनिवार्य अटी (प्रोव्हिजो) प्रमाणे, प्रौढ स्त्री सुध्दा प्रतिवादी असू शकते. फक्त ती पीडितेच्या वैवाहिक नातेसंबंधात किंवा विवाहसदृश नातेसंबंधात असली पाहिजे व ती नवऱ्याची किंवा पुरुष जोडीदाराची नातलग असली पाहिजे.
- तसेच अलिकडच्या न्यायालयीन निर्णयांप्रमाणे[5] पीडितेबरोबर कौटुंबिक नातेसंबंधात असलेली कोणतीही स्त्री जरी ती प्रतिवादी नवऱ्याची/ पुरुष जोडीदाराची नातलग नसली तरी प्रतिवादी होऊ शकते.

---

[4] *Khushaboo* Vs. *Kanimmal* (2010) 5 SCC 600; *Velusamy* Vs. *D. Patchaiammal* AIR 2011 SC 479; *Inder Sarma* Vs. *VKV Sarma* AIR 2014 S.C. 309; *Deepak @ Gajanan Ramrao Kanegaonkar* Vs. *State of Maharashtra* https://indiankanoon.org/doc/5443178/?type=print decided by Bom HC on 1st July 2015

[5] *Hiral P Harsora and ors* Vs. *Kusum Narottamdas Harsora & Ors* (https://indiankanoon.org/doc/114237665/) decided by SC on 6th Oct 2016; *Sandhya Wankhede* Vs. *Manoj Wankhede* (2011) 3 SCC 650

**‘सामाईक घर’ म्हणजे काय?**

कलम 2(s) अन्वये,

- एकत्रित राहते घर म्हणजे जिथे पीडिता कौटुंबिक नातेसंबंधात असताना एकटी अथवा प्रतिवादींसह ज्या घरात राहत आहे किंवा राहत आली आहे/ होती **आणि**
- ते घर पीडितेच्या एकटीच्या किंवा पीडितेच्या आणि प्रतिवादीच्या नावे असलेले स्वतःचे किंवा भाड्याचे घर असेल किंवा
- ज्या घरात दोघांचा किंवा एकट्याचा हक्क, नावे, किंवा हितसंबंध, भागीदारी ह्यापैकी काहीही नसेल परंतु ते घर प्रतिवादी ज्या एकत्र कुटुंबाचा सदस्य आहे अशा एकत्र कुटुंबाच्या मालकीचे आहे, असे घर

वरील सर्व व्याख्या समजून घेतल्यावर कलम 5 प्रमाणे पीडित महिलेला माहिती देण्यासाठी ती प्रथम न्यायदंडाधिकाऱ्यांकडे येणे गरजेचे आहे. म्हणून न्यायदंडाधिकाऱ्यांनी संरक्षण अधिकारी, सेवा पुरवणारे, पोलिस, यांची नावे, पत्ते, मोबाईल क्रमांक अशा माहितीच्या प्रती स्वतःकडे ठेवायला हव्यात. त्या मराठीतून असायला हव्यात. म्हणजे त्या महिलेला सहजपणे देता येतील आणि ती त्याचा योग्य तो उपयोग करू शकेल. महिला आणि बाल कल्याण विकास विभागाकडून अशी माहिती मिळू शकते. ही माहिती वारंवार अद्ययावत करणेही तेवढेच महत्त्वाचे आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. त्यासाठी संरक्षण अधिकाऱ्यांची मदत घेता येईल.

**सदर कायद्याच्या कलम 5 अन्वये न्यायदंडाधिकाऱ्यांनी देण्याची माहिती**

- कौटुंबिक हिंसेपासून विविध आदेशांसाठी दावा करून संरक्षण मिळविण्याचा हक्क आहे
- साहाय्यासाठी सदर कायद्याखाली नोंद झालेले सेवा पुरवणारे आणि पोलिस आहेत
- महिलेला साहाय्य करण्यासाठी संरक्षण अधिकारी उपलब्ध आहेत
- कायद्याची निःशुल्क मदत मागण्याचा हक्क आहे
- जिथे लागू आहे तिथे भारतीय दंड संहितेच्या कलम 498 ए खाली फौजदारी तक्रार दाखल करण्याचा हक्क आहे

### ४.१.३ माहिती कशी द्यावी?

**यासाठी न्यायदंडाधिकाऱ्यांनी खालील गोष्टी कराव्यातः**

- सदर नियमाखालील फॉर्म ४ चा माहिती देण्यासाठी वापर करावा. (परिशिष्ट १ बघावे)
- पीडित महिलेला समजेल अशा भाषेत फॉर्म ४ मधील मजकूर समजावून सांगावा.
- तिला काही शंका आहेत का ते विचारावे आणि असल्यास त्यांचे निवारण करावे.

**याशिवाय न्यायदंडाधिकारी माहिती देण्यासाठी खालील गोष्टी करू शकतील.....**

- कायदेशीर कारवाईस साधारण **किती वेळ लागेल** त्याविषयी आणि कायद्याच्या कालमर्यादांविषयी सांगावे.
- कायद्याकडून **तिच्या काय अपेक्षा आहेत** ते विचारावे आणि त्या अपेक्षा तर्कशुध्द आहेत का आणि सदर कायद्याच्या चौकटीत बसणाऱ्या आहेत का याबद्दल सांगावे.
- कायदा तिच्या अपेक्षांच्या संदर्भात काय देऊ शकतो हे **स्पष्ट** करावे.
  - उदाः
    - संरक्षण अधिकाऱ्यांकडे ती गेल्यास ते काय काय मदत करू शकतील आणि काय करू शकणार नाहीत. उदाः संरक्षण अधिकारी प्रतिवादीस बोलावून सलोखा घडवून आणण्याचा प्रयत्न करू शकणार नाही.
    - सदर कायद्याखाली काय मिळू शकते आणि काय नाही. उदाः कायदा तिला सुरक्षेचा आदेश देऊ शकतो परंतु चोवीस तास संरक्षण करण्यास माणूस देऊ शकत नाही. तिला स्वतःला संरक्षणाचे काही उपाय योजण्यासाठी पुढाकार घ्यावा लागेल आणि त्याच वेळी संरक्षण आदेश मिळवावा लागेल. संरक्षण अधिकारी सुरक्षा योजना बनवण्यासाठी तिला साहाय्य करू शकतात.
    - संरक्षण आदेशाचा भंग करणे हा सदर कायद्याखाली (कलम 31 अन्वये) गुन्हा आहे, आणि तसे केल्यास प्रतिवादीवर फौजदारी कारवाई सुरू करता येते ही माहिती तिला द्यावी.

प्रत्येक जिल्हयातील महिला बालकल्याण विभागाने त्या त्या जिल्हयातील सदर कायद्याखालील सहभागींची तसेच सदर कायद्याची थोडक्यात माहिती सांगणारी पुस्तिका बनवली आहे. त्यात त्या त्या विभागातील संरक्षण अधिकाऱ्यांचा संपर्क तपशील दिला असून आधारगृहे, समुपदेशन केंद्र, आणि अन्य सेवादायी संस्थांची नावे आणि पत्ते तसेच पोलिस स्टेशनची माहिती दिली आहे. न्यायदंडाधिकाऱ्यांनी त्यांच्याकडे साहाय्यासाठी येणाऱ्या महिलांना ही पुस्तिका द्यावी, त्यातील माहिती अद्ययावत आहे ना ह्याची खात्री करून घ्यावी. त्यासाठी ती आधी महिला

बालकल्याण विभागाकडून मागवून ठेवावी लागेल. (हे काम संरक्षण अधिकाऱ्यांना सांगता येईल.)

**सदर कायद्याखाली ती जी कारवाई करेल तिचे परिणाम काय होतील आणि त्यांना तोंड कसे द्यावे याचा विचार करण्यास तिला साहाय्य करावे.**

यासाठी खाली दिलेल्या उदाहरणांप्रमाणे काही मुद्द्यांवर चर्चा करता येईल:

- प्रतिवादीस जेव्हा कळेल की तिने तक्रार केली आहे आणि सदर कायद्याखाली अर्ज दाखल केला आहे तेव्हा काय होईल? **हिंसेत वाढ होण्याची शक्यता आहे का**? आणि तसे असेल तर **सुरक्षेचे कोणते उपाय योजता येतील**?
- तिने एकत्रित घरात राहण्यासाठी निवासाच्या आदेशासारखी काही **विशिष्ट आदेशांची मागणी केल्यास काय होईल?** निवासाच्या हक्कामध्ये असा **कोणता पर्याय आहे** की ज्यामुळे तिला अधिक चांगली सुरक्षितता मिळेल आणि जो अधिक योग्य ठरेल आणि का?
- आधारगृह, मोफत कायदे साहाय्य, समुपदेशन आणि अन्य **सेवा पुरवणाऱ्यांच्या सेवा तिला कोणत्या परिस्थितीत मिळू शकतील**?
- पीडितेसाठी आणि तिच्या परिस्थितीबाबत असलेले अन्य प्रश्न.

| |
|---|
| अशा माहितीमुळे स्त्री सबळ होऊन तिला जाणीवपूर्वक निर्णय घेता यावा आणि जर छळ चालूच राहिला तर कौटुंबिक हिंसाचाराच्या कायद्याआधारे संरक्षण मिळवता यावे हा यामागचा उद्देश आहे. |

**पीडिता भेटायला आल्यानंतर काय करावे -**

- ✓ तिच्याशी बोलताना तिच्याकडे **पूर्ण लक्ष द्यावे आणि वेळही द्यावा**.
- ✓ बोलताना तिच्या **नजरेला नजर देऊन बोलावे**, तिच्या तक्रारी आस्थापूर्वक आणि लक्षपूर्वक ऐकाव्यात.
- ✓ तिला **समानुभूती दाखवावी** -
  - एक 'स्त्री' आणि व्यक्ती म्हणून तिच्या काही असहायता आहेत, हे समजून घ्यावे.
  - तीसुध्दा एक **आदरास आणि सन्मानास** पात्र असलेली व्यक्ती आहे अशा ठाम विश्वासाने तिच्याशी बोलावे.
  - **भूतकाळात तिनेही अनेक मार्गांनी हिंसा थांबवण्याचा प्रयत्न केला** असेल परंतु तिला पूर्ण यश आले नाही हे समजून घ्यावे.
  - चिंता, भीती, वेदना, दुःख,राग, स्वतःला दोष देणे, अपराधी वाटणे, स्वतःची काही किंमत नसल्यासारखे वाटणे, अयशस्वी वाटणे, निराशा, असुरक्षितता, नैराश्य या तिच्या **भावनांना समजून घेऊन** त्यांची दखल घ्यावी.

- तिच्या **व्यावहारिक अडचणी समजून घ्याव्यात**- गरिबी, आर्थिक अडचणी,बेघर असणे, जीवाला धोका असणे इ.
- **हिंसेचे कधीही समर्थन करू नये.**
- **तिला कधीही दोष देऊ नये** आणि तिने चुकीचा निर्णय घेतला असे म्हणू नये.
- **स्वतःचे मत तिच्यावर कधीही लादू नये.** उदाः जेव्हा तिला सलोखा करायचा असेल तेव्हा "तुझा नवरा एवढा हिंसक असताना तुला त्याच्याबरोबर का राहायचे आहे" असे म्हणू नये.
- **व्यक्ती-व्यक्तींमधील असलेला वेगळेपणा लक्षात ठेऊन** तिला वागवावे.
- **तिच्यावर टीका करू नये.** स्वतःच्या पूर्वग्रहांविषयी तसेच तिच्या दृष्टिकोनांवर आणि मूल्यांवर असलेल्या पितृसत्तेच्या पगड्याची जाणीव ठेवावी. उदाः "तू आई असूनसुध्दा तू तुझ्या मुलांना नवऱ्याजवळ कस सोडू शकलीस" असे तिला म्हणू नये.
- ती काय सांगत आहे ते **लक्षपूर्वक ऐकावे** आणि अधून मधून त्या घटनेबद्दल आणि तिला त्याविषयी काय वाटतंय त्याबद्दल प्रश्नही विचारावेत.
- तिने काही **कागदपत्रं** बरोबर आणले असतील तर ते पूर्णपणे व काळजीपूर्वक **वाचावेत.**
- तिच्या कुठल्या अपेक्षा, संरक्षण अधिकाऱ्यांकडून आणि इतर सेवा देणाऱ्याकडून पूर्ण होतील हे तिला स्पष्ट करावे म्हणजे कायद्याचा वापर करावा किंवा नाही याबाबत ती पूर्ण माहितीनिशी निर्णय घेऊ शकेल.

कलम 5 खालील जबाबदारी पार पाडताना न्यायदंडाधिकारी काही वेगळे प्रयोगही करून बघू शकतात. उदा.- कायद्याचे शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयातील विद्यार्थांना योग्य ते मार्गदर्शन करून त्यांच्यावर ही जबाबदारी सोपवता येऊ शकेल. मात्र त्यांच्यावर लक्ष ठेवणे जरुरीचे राहील. त्यामुळे विद्यार्थांनाही समाजभान येण्यास मदत होऊ शकेल.

## ४.२ संरक्षण अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या डीआयआरवर योग्य तो आदेश देणे - कलम 4, नियम 4,9

सदर कायद्याच्या कलम 5 शिवायही न्यायदंडाधिकाऱ्यांवर न्यायालयीन कारवाई पूर्वी इतरही काही जबाबदाऱ्या टाकलेल्या आहेत.

सदर कायद्यातील कलम 4 आणि सदर नियमातील नियम 4 व 9 एकत्रितपणे वाचल्यास ह्या जबाबदाऱ्या स्पष्ट होतात. कलम 4 मध्ये ज्या महिलांवर कौटुंबिक हिंसा होते आहे किंवा होण्याची शक्यता आहे अशा महिलांना मदत होण्याच्या दृष्टीने तरतूद केली आहे.

एखाद्या त्रयस्थ व्यक्तीला  एखाद्या स्त्रीवर अशी हिंसा होते आहे किंवा होण्याची शक्यता आहे असे वाटल्यास ती व्यक्ती संरक्षण अधिकाऱ्यांना लेखी किंवा तोंडी पद्धतीने माहिती कळवू शकते. संरक्षण अधिकाऱ्यांनी शक्यतो ही माहिती लेखी स्वरूपात घ्यायची आहे आणि त्यावर माहिती देणाऱ्या व्यक्तीची स्वाक्षरी घ्यायची आहे. जर माहिती लेखी स्वरूपात घेणे शक्य नसेल तर माहिती देणाऱ्याच्या ओळखीची नोंद ठेवायची आहे.

मिळालेल्या माहितीप्रमाणे अणीबाणीची परिस्थिती आहे असे संरक्षण अधिकाऱ्यांना वाटल्यास त्यांनी नियम 9 प्रमाणे कारवाई करावयाची आहे. त्यांनी पोलिसांची मदत घेऊन त्यांना बरोबर घेऊन प्रत्यक्ष घटनास्थळी जायचे आहे. पीडितेच्या सुरक्षेसाठी तात्काळ उपाय योजावयाचे आहेत. तिची सुटका करायची आहे, गरज असल्यास वैद्यकीय मदत द्यायची आहे. आणि त्याचबरोबर तातडीने डीआयआर तयार करून तो योग्य ते आदेश मिळवण्यासाठी न्यायदंडाधिकाऱ्यांकडे सादर करायचा आहे.

न्यायदंडाधिकाऱ्यांनी  डीआयआर  वाचून त्यांना खरोखरच अणीबाणीची परिस्थिती आहे असे वाटल्यास योग्य ते आदेश द्यावे. त्यांना दिवाणी प्रक्रिया संहितेच्या (सिपीसी) कलम 151 खालील हा अधिकार नक्कीच वापरता येईल. कलम 151 प्रमाणे प्रत्येक न्यायाधीशांना प्रक्रियेच्या तांत्रिकतेत न अडकता  योग्य तो न्याय देता यावा, यासाठी हे मूळ अधिकार - इनहेरंट पॉवर - दिलेले आहेत. त्या अधिकाराचा उपयोग करून स्वतःच्या अख्यत्यारीत योग्य ते आदेश ते देऊ शकतात. कौटुंबिक हिंसेपासून स्त्रियांचे संरक्षण व्हावे हा कायद्याचा मूळ उद्देश लक्षात घेऊन आदेश देणे हे नैसर्गिक न्यायतत्त्वाला धरूनच असेल.

महिलांवर अतिशय गंभीर स्वरूपाच्या हिंसा कुटुंबातल्या लोकांकडून होताना दिसतात. अशा अणीबाणीच्या वेळेस  पीडिता न्यायालात येण्याच्या परिस्थितीतही नसण्याची शक्यता असते. त्यासाठी अणीबाणीची परिस्थिती म्हणजे काय हे समजून घेणे योग्य ठरेल.

### ४.२.१ ‘अणीबाणीची परिस्थिती’ म्हणजे काय?

ज्या परिस्थितीवर तातडीने लक्ष देणे आणि त्याबाबत काहीतरी कारवाई करणे आवश्यक असते, किंवा जीवाला धोकादायक असणाऱ्या किंवा कोणत्याही धोकादायक परिस्थितीला अणीबाणीची परिस्थिती असे म्हणता येईल. कौटुंबिक हिंसेच्या परिस्थितीत असलेल्या महिलेचे हित आणि जीव जेव्हा धोक्यात असतो आणि त्या वेळेस अणीबाणीची परिस्थिती निर्माण होऊ शकते - त्याची काही उदाहरणे-

- घरात कोंडलेले असते आणि घराबाहेर पडू शकत नाहीत.

- मध्यरात्री घरातून बाहेर काढले जाते.
- तिला अन्न आणि जीवरक्षक औषधांपासून वंचित ठेवले आहे, ती बेशुध्द आहे/ हालचाल करू शकत नाही
- तिला विष पाजलेले आहे किंवा तिने ते स्वतः घेतले आहे
- ती भाजलेल्या अवस्थेत आहे (तिला जाळण्याचा प्रयत्न झाला आहे किंवा तिने स्वतः जाळून घेऊन आत्महत्त्येचा प्रयत्न केला आहे.)
- तिच्यावर शारीरिक किंवा लैंगिक हल्ला झाल्याने ती हलू शकत नाही.
- तिची सर्व संपर्क साधने बंद करून टाकली आहेत.
- तिने जर हिंसा करणाऱ्या व्यक्तीच्या इच्छा पूर्ण केल्या नाहीत तर तिला गंभीर परिणाम होतील अशी धमकी देण्यात आलेली आहे.
- धोक्यात असलेल्या महिलेस दुसऱ्या व्यक्तीच्या (अधिकारावर असलेल्या) साहाय्याशिवाय धोक्यातून बाहेर पडण्याचा मार्ग नाही.
- ती स्त्री आत्महत्त्येचा प्रयत्न करत आहे/ केला आहे/ करणार आहे.
- मानसिक हिंसेमुळे, ताणामुळे ती शून्यावस्थेत गेली आहे, काय चालले आहे हेही तिला कळत नाही आहे.

अशा बाबतीत ती औपचारिकपणे तक्रार करावयाच्या परस्थितीत नसल्याने आणि तिच्या जीवाला धोका असल्यामुळे हस्तक्षेपाचे स्वरूप तातडीचे असते. अशा परिस्थितीत ही माहिती संरक्षण अधिकाऱ्यांस वर लिहिल्याप्रमाणे तिऱ्हाईत व्यक्तीकडून फोनवर किंवा व्यक्तिशः किंवा अन्य मार्गाने दिली जाते.

नियम 9 अन्वये नोंद केलेला डीआयआर 'योग्य आदेशासाठी' संरक्षण अधिकाऱ्यांनी न्यायदंडाधिकाऱ्यांकडे 'विनाविलंब' सादर करायला हवा. 'विनाविलंब' याचा अर्थ असे डीआयआर न्यायदंडाधिकाऱ्यांकडे कोणत्याही वेळेस अगदी कार्यालयीन वेळेनंतरही सादर करता येतात. म्हणून अणीबाणीची परिस्थिती उद्‌भवल्यास न्यायालय चालू नसताना कार्यालयीन वेळेनंतर संरक्षण अधिकारी न्यायदंडाधिकाऱ्यांशी कसा संपर्क साधू शकतील हेही ठरवून ठेवणे योग्य असेल.

अशा वेळेस कायद्याच्या तांत्रिक बाबी विचारात घेऊन कोणता योग्य मार्ग कायद्याच्या चौकटीत राहून काढता येईल ह्याचा विचार होणे फार महत्त्वाचे आहे. अर्थात गंभीर स्वरूपाची हिंसा जेव्हा होते तेव्हा तो फौजदारी गुन्हा होईलच. त्याप्रमाणे कारवाई होऊ शकते. पण सदर कायद्यासारख्या दिवाणी कायद्याचा उपयोगही कसा करता येऊ शकतो का हे पाहणेही तितकेच गरजेचे आहे.

## ४.३ संरक्षण अधिकाऱ्यांनी न्यायालयात डीआयआर पाठवल्यावर न्यायदंडाधिकाऱ्यांनी करावयाची कृती - कलम 9, नियम 5

कौटुंबिक हिंसा झाल्यानंतर पीडिता लेखी किंवा तोंडी तक्रार घेऊन संरक्षण अधिकाऱ्यांकडे (किंवा वकिलांकडे) जाऊ शकते. ती तक्रार कोणत्याही प्रकारची असली तरी त्या तक्रारीचा डीआयआर तयार करण्याची जबादारी संरक्षण अधिकाऱ्यांची असते. हा डीआयआर सदर नियमांमधील फॉर्म १ प्रमाणे भरून तो न्यायदंडाधिकाऱ्यांकडे पाठवणे हे नियम 5 प्रमाणे त्यांच्यासाठी अनिवार्य आहे. आतापर्यंत डीआयआर हा शब्द अनेकदा आला आहे. म्हणून पुढे जाण्याअगोदर डीआयआर म्हणजे काय, तो कसा, कधी, कोणी भरायचा ह्याची माहिती घेणे उचित ठरेल.

### ४.३.१ 'कौटुंबिक घटनेचा अहवाल'- डीआयआर म्हणजे काय?

- सदर कायद्याच्या कलम 2(e) खालील व्याख्येप्रमाणे कौटुंबिक घटनेचा अहवाल - डीआयआर - म्हणजे संरक्षण अधिकाऱ्यांनी (किंवा सेवा पुरवणाऱ्याने) पीडितेच्या कौटुंबिक हिंसेच्या तक्रारीचा तयार केलेला अहवाल. त्याचे वर्णन दिवाणी कायद्यातील एफआयआर असे करता येईल.
- असा डीआयआर सदर नियमांमधील नियम 5(1) अन्वये असलेल्या 'फॉर्म १' मध्ये तयार केला जातो. कृपया परिशिष्ट २ पाहा.
- फॉर्म १ मध्ये पुढील माहिती असते.
    - पीडितेचे नाव, तिच्या मुलांची नावे, पत्ता वगैरे
    - कौटुंबिक हिंसेचे प्रकार आणि सविस्तर तपशील
    - जोडलेल्या कागदपत्रांची यादी (उदा. वैद्यकीय प्रमाणपत्र, मानसिक अवस्थेचे प्रमाणपत्र, स्त्रीधनाची यादी, आर्थिक परिस्थितीचे वर्णन करणारी कागदपत्रे - बँक खाते, बिल्स, भाडे पावत्या, पगाराची स्लीप, मुलांच्या खर्चासंदर्भातील कागदपत्रे, वैद्यकीय अहवाल - हिंसेचे झालेले परिणाम आणि त्यासाठी सुरू केलेली उपाययोजना ह्याची माहिती असणारा अहवाल इत्यादी
    - मागणी/विनंती केलेले आदेश
    - कोणत्या प्रकारच्या मदतीची गरज आहे - आधार गृह, सेवा देणारे, वैद्यकीय, इत्यादी

- पीडिता तिला वाटल्यास विशिष्ट कौटुंबिक हिंसेचे वेगवेगळे डीआयआर नोंदवण्याची विनंती संरक्षण अधिकाऱ्यांना करू शकते.

- तिने आधीच्या झालेल्या न्यायालयीन दाव्यांची, फौजदारी तक्रारींची माहिती देणे गरजेचे असते
- एकूणच डीआयआर कौटुंबिक हिंसेसंदर्भात महत्त्वाचा पुरावा ठरू शकतो.




**डीआयआरमध्ये पीडितेच्या परिस्थितीचे आणि तिचे सर्वंकष चित्र दिसून येते.**

तेव्हा संरक्षण अधिकाऱ्यांनी पीडितेच्या तक्रारीनंतर सदर नियमांमधील फॉर्म १ प्रमाणे डीआयआर भरून तो न्यायदंडाधिकाऱ्यांकडे पाठवणे अनिवार्य आहे, त्यामुळे तो त्यांनी न्यायदंडाधिकाऱ्यांकडे पाठवला पण त्यासोबत पीडितेची इच्छा नसल्यामुळे कलम 12 खालचा अर्ज केला नसल्यास न्यायदंडाधिकाऱ्यांनी पुढे काय करायचे, हे त्यांना पुष्कळदा माहीत नसते. त्यामुळे हा डीआयआर न्यायालयात स्वीकारला जात नाही.

आपल्याला जर नियम 5 ची अंमलबजावणी करायची असेल तर संरक्षण अधिकाऱ्यांनी नियम 5 प्रमाणे डीआयआर पाठवलेला असेल पण त्याबरोबर कलम 12 खालचा अर्ज नसेल तरी तो डीआयआर न्यायदंडाधिकाऱ्यांनी ठेऊन घ्यायला हवा आणि पुढीलप्रमाणे कारवाई करायला हवी:

१. जर डीआयआरमध्ये गंभीर स्वरूपाच्या कौटुंबिक हिंसेची नोंद असेल तर न्यायदंडाधिकाऱ्यांनी त्याची दखल घेऊन संरक्षण अधिकाऱ्यांना संपूर्ण तपास

करण्याचा आदेश द्यावा. जरूर असल्यास पीडितेच्या वतीने कलम 12 खालील अर्ज तयार करून तो न्यायालयात सादर करण्यास सांगावे.

२. जर डीआयआरमध्ये भारतीय दंड विधान कलम 498A खाली किंवा इतर कोणत्याही दखलपात्र झालेल्या गुन्ह्याची नोंद असेल आणि प्रथम माहिती अहवाल (एफआयआर) दाखल झाला नसेल तर न्यायदंडाधिकाऱ्यांनी सीआरपीसीच्या कलम 190 प्रमाणे स्वतःहून दखल घेऊन दोषारोप तयार करून तपासाच्या कारवाईचे आदेश द्यायला हवे.

३. तुलनात्मक दृष्ट्या फार गंभीर स्वरूपाच्या कौटुंबिक हिंसेची नोंद नसेल तर न्यायदंडाधिकारी संरक्षण अधिकाऱ्यांना पीडितेला कलम 12 खाली अर्ज करण्याची इच्छा आहे का, असे विचारायला सांगू शकतात.

४. जर वरील ३ प्रमाणे परिस्थिती असेल आणि पीडितेला कलम 12 खाली अर्ज करण्याची इच्छा नसेल अशा वेळेस डीआयआरची वेगळी फाईल करायला हवी. तसेच संगणकामध्ये त्यांची नोंदही ठेवायला हवी. एखादी महिला संरक्षण अधिकाऱ्यांपर्यंत जाईल. संरक्षण अधिकारी डीआयआर तयार करून तो न्यायालयात सादरही करतील. परंतु पीडिता कलम 12 खालचा अर्ज काही कारणामुळे कदाचित करणार नाही. मात्र पुन्हा कधी हिंसेचा अनुभव आल्यास ती न्यायालयापर्यंत येऊ शकेलही. अशा वेळेस आधी घडलेल्या घटनांचा डीआयआरच्या रूपाने पुरावा म्हणून उपयोग करता येईल. त्यासाठी नियम 5 ची तरतूद महत्त्वाची आहे आणि म्हणून त्याची अंमलबजावणी होणे हे महत्त्वाचे आहे हे समजून घेतले पाहिजे.

## ५.० न्यायालयीन कारवाई चालू असतानाचा टप्पा

सदर कायद्याखालील कलम 12 अन्वये न्यायदंडाधिकाऱ्यांकडे अर्ज दाखल झाल्यानंतर न्यायालयीन कारवाई सुरू होते.

| |
|---|
| सदर कायद्याचे कलम 12(1) असे नमूद करते की:<br>"पीडिता किंवा संरक्षण अधिकारी किंवा अन्य कोणतीही व्यक्ती पीडितेच्या वतीने ह्या कायद्याखाली एखादी अथवा अधिक मदत मागण्यासाठी न्यायदंडाधिकाऱ्यांकडे अर्ज सादर करू शकते<br>"जर अशा अर्जानुसार कोणताही आदेश करायचा असेल तर त्याआधी संरक्षण अधिकाऱ्यांनी अथवा सेवा पुरवणाऱ्यांनी सादर केलेला कौटुंबिक घटनेचा अहवाल न्यायदंडाधिकाऱ्यांनी विचारात घेतला पाहिजे." |

कलम 12 खालच्या अर्जाचा नमुना सदर नियमांच्या नियम 6 खालील फॉर्म २ मध्ये दिला आहे. तो पीडितेने भरून देणे अपेक्षित आहे. परंतु तो त्याच फॉर्मप्रमाणे भरला जावा अशी सक्ती करण्याची आवश्यकता नाही. सदर नियमांखाली फॉर्म २ नमुन्यादाखल दिलेला आहे. कृपया परिशिष्ट ३ पाहा.

## ५.१ सदर कायद्याच्या कलम 12 खाली केलेल्या अर्जातील प्रमुख घटक



अर्जातील कौटुंबिक हिंसेच्या घटनेचा तपशील वाचत असताना कौटुंबिक हिंसेच्या व्याख्येप्रमाणे कोणत्या प्रकारची हिंसा अर्जदाराने भोगली आहे हे स्पष्ट होईल. बहुधा कौटुंबिक हिंसा ही चक्रामध्ये अडकल्यासारखी, अनेक प्रकारांनी, कधी उघडपणे तर कधी छुपेपणाने केलेली असू शकते. शारीरिक हिंसेचे दूरगामी मानसिक परिणाम राहू शकतात. ह्या साऱ्याचा विचार अर्जदारावर झालेली कौटुंबिक हिंसा समजून घेताना व्हायला हवा.

कौटुंबिक हिंसेच्या घटनेशी भावनिक चढउतार निगडित असल्यामुळे न्यायदंडाधिकाऱ्यांना ही कल्पना असली पाहिजे की पीडिता एकदा अर्ज करून तो मागे घेऊ शकते आणि पुनःपुन्हा दाखलही करू शकते. ह्या मागच्या कारणांची जाणीव न्यायदंडाधिकाऱ्यांना असणे महत्त्वाचे आहे. पीडितेवर हिंसा झाल्यानंतर प्रतिवादी अनेकदा तिच्याशी प्रेमाने वागतो, माफी मागतो, 'मी बदलेन', पुन्हा हिंसा करणार नाही अशी कबुली देतो. त्याच्यावर विश्वास ठेऊन पीडिता अर्ज मागे घेते. पण काही काळानंतर हिंसा परत सुरू होते. पुन्हा त्याचप्रकारची कबुली प्रतिवादी देतो. पुन्हा ती विश्वास ठेवते. असे हिंसेचे चक्र चालूच रहाते. आणि ती महिला अर्ज करते, काढून घेते, परत अर्ज करते हे चक्रही चालू राहते. ह्या कारणांसाठी पीडितेचा अर्ज बेदखल केला जाऊ नये. वास्तविक तसा अधिकार कायद्याने न्यायदंडाधिकाऱ्यांना दिलेलाही नाही. पण मूळ मुद्दा हा आहे की न्यायदंडाधिकाऱ्यांनी अशा प्रसंगी संवेदशीलतेने, समानुभूतीने कौटुंबिक हिंसा पीडित महिलांच्या अर्जांकडे पाहणे जरुरीचे आहे.

कौटुंबिक हिंसेच्या घटना सदर कायदा पारित होण्याअगोदरच्या काळात झाल्या असल्या तरी त्या घटना  ह्या कायद्याखाली विचारात घेता येऊ शकतात, असे न्यायालयीन निर्णय झालेले आहेत [6]. त्याचबरोबर पीडितेच्या व्याख्येतही पूर्वीच्या घटनांचा उल्लेख आहे कलम 2(a). तसेच हिंसा झाल्यानंतर किती कालमर्यादेत सदर कायद्याखाली अर्ज केला पाहिजे त्याबद्दल वेळेची मर्यादा घालणारी तरतूद कायद्यात नाही. हे न्यायदंडाधिकाऱ्यांनी लक्षात घ्यायला हवे. आदेश देताना ते सदर कायदा लागू झाल्यापासून असू शकतील परंतु पूर्वीच्या हिंसक कृतींचे संदर्भ मात्र नक्कीच घेता येतील.

---

[6] *V. D. Bhanot* Vs. *Savita Bhanot* AIR 2012 S.C. 965; *Sarswathy* Vs *Babu* (2014) 3 SCC 712; *Shalini* Vs. *Kishore* AIR 2015 SC 2605 *Karim Khan* Vs. *State of Maharashtra* 2011 CrLJ 4793; *Anita Tambe* Vs. *Ananndd Tambe* (https://indiankanoon.org/doc/175316050/) decided by Bom HC on 28th Feb 2018

- संगीताला २००४ साली तिच्या वयाच्या १५ व्या वर्षी वडिलांनी घरातून हाकलून दिले होते. तेव्हा सदर कायदा पारित झाला नव्हता. तरीही ती सदर कायद्याखाली अर्ज करू शकते. तिला संरक्षणाचा आदेश, आर्थिक आदेश आणि सामाईक घरात राहण्याचा आदेश मिळू शकतो.
- विद्या नवऱ्याने केलेल्या शारीरिक आणि भावनिक हिंसेमुळे सामाईक घरातून २००२ साली घराबाहेर पडली. ती सदर कायद्याखाली अर्ज करू शकते. तिला संरक्षणाचा आदेश आणि सामाईक घरात राहण्याचा आदेश मिळू शकतो.
- हसीनाला नवऱ्याने २००० साली तलाक दिला आणि घरातून बाहेर काढले. तेव्हापासून ती वेगळी राहत आहे. पण तिचा नवरा तिच्या घरात जबरदस्तीने शिरून तिला अनेकदा धमकावत असतो. ती सदर कायद्याखाली अर्ज करू शकते. तिला संरक्षणाचा आदेश मिळू शकतो.

कलम 12 खालचा अर्ज पीडिता स्वतः किंवा वकिलातर्फे किंवा संरक्षण अधिकाऱ्यांतर्फे किंवा कोणाही दुसऱ्या व्यक्तीतर्फे न्यायालयात दाखल करू शकते. एखादी महिला स्वतःच अर्ज करत असेल तर तिला जरूर प्रोत्साहन द्यायला हवे. त्यासाठी तिला काही मदत हवी असल्यास तीही करणे हे योग्यच ठरेल. कलम 5 प्रमाणे न्यायदंडाधिकाऱ्यांवर पीडितेला ह्या कायद्याखालील तिच्या हक्कांची माहिती देण्याची जबाबदारी आहेच. तिच्या अर्जात काही त्रुटी असतील तर त्याबद्दल तिला माहिती द्यायला हवी आणि अर्ज सुधारण्याची संधीही द्यायला हवी. असे करणे हे कायद्याच्या चौकटीतच आहे हे समजून घ्यायला हवे. हिंसामुक्त जीवन जगण्याच्या व्यक्तीच्या मूलभूत आणि मानवी हक्काला त्यामुळे पाठिंबाच दिला जाणार आहे आणि हेच ह्या कायद्याचे उद्दिष्ट आहे हे सतत लक्षात ठेवणे फार गरजेचे आहे. ह्या कायद्याचे इतर कायद्यांपेक्षा असलेले वेगळेपण समोर ठेऊन न्यायदानाची प्रक्रिया व्हायला हवी. कलम 5 ची माहिती देत असताना तिला कायद्याची मोफत सेवा मिळू शकते हेही अशा वेळेस सांगावे.

त्याचबरोबर तिला हिंसेमुळे घर सोडावे लागले असल्यास व त्यामुळे राहण्यासाठी जागा उपलब्ध नसल्यास आधारगृहात ती जाऊन राहू शकते, तिला गरज असल्यास वैदयकीय मदत मिळू शकते, संरक्षण अधिकारी कोण आहेत आणि त्यांची तिला काय मदत मिळू शकते, तसेच पोलिसांचीही मदत ती घेऊ शकते ही सर्व माहिती तिला सांगावी. त्याबरोबर ह्या सर्व सेवा देणाऱ्या व्यक्ती, संस्थांचे पत्ते, फोन नंबरही द्यावेत.

तिने स्वतः किंवा वकिलातर्फे अर्ज केला असल्यास आणि त्याबरोबर डीआयआर केलेला नसल्यामुळे त्याची प्रत जोडलेली नसल्यास संरक्षण अधिकाऱ्यांकडे तिला पाठवून डीआयआर मागवून घेता येऊ शकतो. डीआयआरमुळे पीडितेची सर्व माहिती, तिच्यावर झालेल्या हिंसेची संपूर्ण माहिती, तिला कोणत्या आदेशांची गरज आहे इत्यादी सर्व मुद्दे न्यायालयासमोर येऊ शकतात. त्याचा नक्कीच फायदा पीडितेला मिळू शकतो. परंतु डीआयआरशिवायही अर्ज पुढे

चालवला जाऊ शकतो हेही लक्षात ठेवणे आवश्यक आहे. मुंबई उच्च न्यायालयाचा तसा निर्णयही आहे.[7]

पीडिता आधीच संरक्षण अधिकाऱ्यांकडे गेलेली असल्यास, तिने संरक्षण अधिकाऱ्यांच्या मदतीने अर्ज केलेला असू शकतो किंवा ती अर्ज करण्याच्या परिस्थितीत नसल्यास तिच्यावतीने इतर कोणा व्यक्तीने, किंवा संरक्षण अधिकाऱ्यांनीही तिच्या वतीने अर्ज केलेला असू शकतो.

अर्ज आपल्यापुढे आल्यानंतर अर्जदाराची केस **प्रथमदर्शनी** सदर कायद्याखाली बसते का हे ठरवावे लागेल. विशेषतः कलम 23 खालील एकतर्फी आदेश देण्याची विनंती अर्जात असेल तर ते देण्यापूर्वी पुढील **तीन प्रश्नांची उत्तरे** अर्जात आली आहेत का हे पाहणे महत्त्वाचे ठरेल:

१. अर्जदार महिलेवर 'कौटुंबिक हिंसा' होत आहे का किंवा झाली आहे का ज्यामधे 'प्रतिवादीच्या' वर्तनाने पीडितेस शारीरिक/ मानसिक/ भावनिक/ लैंगिक /आर्थिक दृष्ट्या अपाय / इजा/ छळ/ धमकी/ धोका आहे का ?
२. तिचे प्रतिवादीबरोबर 'कौटुंबिक नाते संबंध' आहेत का / होते का?
३. ती 'एकत्रित घरात' राहत आहे का / राहत होती का? [8]

वरील तीनही प्रश्नांची उत्तरे 'होय' असल्यास अजून एक प्रश्न स्वतःला विचारायला हवा. तो म्हणजे अर्ज न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रातला आहे का? तो कधी असू शकतो हे खाली दिले आहे.

## ५.२ अर्ज दाखल करून घेण्याचे कायदेशीर अधिकार कोणत्या न्यायालयास आहेत?

सदर कायद्याखाली स्थानिक सीमेअंतर्गत एक तर प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकाऱ्यांसमोर किंवा महानगर न्यायदंडाधिकाऱ्यांसमोर (नागरी विभाग) कलम 27 अन्वये अर्ज जिथे

१. पीडिता (कायम अथवा तात्पुरत्या स्वरूपात) राहते, व्यवसाय करते, किंवा नोकरी करत आहे किंवा
२. प्रतिवादी राहतो, व्यवसाय करतो, किंवा नोकरी करतो आहे किंवा
३. कारवाईचे कारण घडले - म्हणजेच जिथे आरोप केलेली कौटुंबिक हिंसेची घटना घडलेली आहे तिथे दाखल करण्याची तरतूद आहे.

---

[7] *Manoj Harikisanji Changani* Vs. *Prema Changani* MANU/MH/0087/2012; *Nandkishore Vincurkar* Vs. *Kavita* MANU/MH/0957/2009

[8] ह्या तीनही प्रश्नांमधील शब्दांच्या व्याख्या आधी दिल्या आहेत, त्या बघाव्या.

ह्याचबरोबर कलम 26 मधील तरतूदही लक्षात घ्यायला हवी. पीडितेचा जर दिवाणी, कौटुंबिक किंवा फौजदारी न्यायालयात अन्य दावा / खटला कलम 12 खालील अर्ज ज्या प्रतिवादींच्या विरोधात करायचा आहे त्याच प्रतिवादींच्या विरोधात प्रलंबित असेल तर सदर कायदयाच्या कलम 26 अन्वये त्याच दिवाणी, कौटुंबिक किंवा फौजदारी न्यायालयात कलम 12 खालील अर्जही दाखल करता येतो[9]. या तरतुदीमुळे त्याच दोन पक्षात एकाच न्यायालयात केस प्रलंबित असेल तर ह्या न्यायालयातून त्या न्यायालयात धावपळ करायला न लागता तिथेच अर्ज दाखल करता येतो. मात्र पीडितेवर कलम 26 चा वापर केलाच पाहिजे अशी सक्ती करता येत नाही.[10] कलम 26 प्रमाणे कलम 12 खालचा अर्ज करण्यासाठी ती अजून एक सुविधा तिच्यासाठी उपलब्ध करून दिलेली आहे, पण त्या सुविधेचा उपयोग करायचा किंवा नाही हे तिच्या इच्छेवर अवलंबून असेल.

थोडक्यात, पीडितेस अर्ज कुठे करायचा यासाठी बरेच पर्याय आहेत. वरील तीन पर्यायांपैकी ती कुठल्याही एका पर्यायाची निवड करू शकते. आपल्यासमोर आलेला अर्ज वरील तीन पर्यायांपैकी एक जरी पर्याय आपल्याला असलेल्या अधिकार क्षेत्रातील असेल, तर न्यायदंडाधिकाऱ्यांना अर्ज चालवण्याचा अधिकार आहे. चौथा पर्याय त्या त्या परिस्थितीप्रमाणे अर्ज कोणत्या न्यायदंडाधिकाऱ्यांकडे जाईल ते ठरेल.

म्हणून वरील चारही प्रश्नांची उत्तरे 'होय' असल्यास आणि त्यामुळे आपल्यासमोर आलेली अर्जदार ही **प्रथमदर्शनी** कौटुंबिक हिंसेने पीडित आहे असे आपले मत झाले तर पुढचा अतिशय महत्त्वाचा मुद्दा म्हणजे तिने अर्जामध्ये कोणते आदेश मिळावेत अशी मागणी/विनंती केली आहे, हे तपासून पाहणे.

---

[9] *Kunanpa Reddy* Vs. *K. Swarna Kumari* AIR 2016 SC 2519 *Vaishali Joshi* Vs. *Nanasaheb Joshi* AIR 2017 S.C. 2926

[10] *Abhjjit Jail* Vs. *Manisha Jail* (https://indiankanoon.org/doc/71382985/) Bombay HC decided on 5th June 2018; *XXX* Vs *ABC* MANU/MH/0882/2016 decided by Bom HC 2nd March 2016

## ५.३ सदर कायद्याखाली मिळवता येणारे न्यायालयीन आदेश:

सदर कायद्याखाली मिळवता येणारे आदेश खालील आकृतीत दर्शवले आहेत. कलम 18 अन्वये मिळणारा संरक्षणाचा आदेश म्हणजेच 'हिंसा थांबवा आदेश' हा सदर कायद्याचा **आत्माच** आहे. पुढील आकृतीत दाखवलेल्या सर्व आदेशांची चर्चा पुढे विस्ताराने केली आहे.




### ५.३.१ अंतरिम आणि एकतर्फी आदेश

सदर कायद्याचे कलम 23 न्यायदंडाधिकाऱ्यांना अंतरिम आणि एकतर्फी आदेश देण्याचे अधिकार देते.

(१) न्यायदंडाधिकाऱ्यांसमोर चालत असलेल्या कोणत्याही दाव्यात त्यांना न्याय्य आणि योग्य वाटेल ते अंतरिम आदेश ते देऊ शकतात.

(२) न्यायदंडाधिकाऱ्यांना सकृद्दर्शनी प्रतिवादी कौटुंबिक हिंसा करत आहे, केली आहे किंवा करण्याची शक्यता आहे असे पटल्यास, आणि अर्जदाराने कलम 18 ते 22 संदर्भात तसे शपथपत्र दाखल केले असल्यास, ते एकतर्फी आदेश देऊ शकतात.

सदर दिवाणी स्वरूपाच्या कायद्याखाली पीडितेस आणि तिच्या मुलांना दाव्याच्या काळात कौटुंबिक हिंसेपासून अपाय होऊ नये म्हणून त्याचा प्रतिबंध करण्यासाठी अंतरिम आदेशाची तरतूद आहे. अंतरिम आदेश म्हणजे अर्जाची सुनावणी चालू असतानाच्या काळात दिलेला आदेश. ह्या आदेशामुळे पीडितेस न्यायालयीन कारवाई सुरू असताना हिंसा मुक्त परिस्थितीत कारवाईला सामोरे जाण्यास साहाय्य होऊ शकते.

अंतरिम आदेश (किंवा अंतिम आदेश सुद्धा) एकतर्फी हवा असेल तर तोही मागण्याची तरतूद कलम 23 (2) मध्ये आहे. प्रतिवादीवर नोटीस बजावण्याच्या आधी किंवा नोटीस बजावल्यानंतर पण प्रतिवादी न्यायालयात हजर होण्याच्याआधी त्याच्या अनुपस्थितीत जो आदेश दिला जातो त्याला एकतर्फी अंतरिम आदेश म्हणतात. (एकतर्फी आदेश हे अंतरिम किंवा अंतिम स्वरूपाचे असू शकतात). पीडितेच्या अर्जावरून सकृद्दर्शनी असे दिसून आले की प्रतिवादी कौटुंबिक हिंसा करत आहे किंवा तसे करण्याची शक्यता आहे तर एकतर्फी आदेश दिला जातो. प्रतिवादी नोटीस बजावूनही कोर्टात हजर होऊ शकला नाही किंवा त्याने त्यास नकार दिला तरी हे आदेश देता येतात.

पीडितेने कलम 12 खालच्या अर्जाबरोबर अंतरिम/ अंतिम एकतर्फी आदेशाची मागणी/विनंती केली असल्यास, आणि अर्जाबरोबर सदर नियमांमधील नियम 6(4) आणि नियम 7 अंतर्गत विहित केलेल्या फॉर्म ३ प्रमाणे शपथपत्र जोडले असल्यास त्यावर तातडीने निर्णय देणे हे तिच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे हे समजून घेणे फार फार जरुरीचे आहे. त्यासाठी स्वतंत्र अर्जाची आवश्यकता नाही,[11] हेही लक्षात ठेवायला हवे (कृपया परिशिष्ट ४ पाहा). मात्र अंतरिम/ एकतर्फी आदेश देण्याअगोदर न्यायदंडाधिकाऱ्यांना काही खुलासा हवा असेल तर सदर नियमांच्या नियम 10(1)(a) प्रमाणे न्यायदंडाधिकारी संरक्षण अधिकाऱ्यांना पीडिता ज्या सामाईक घरात प्रतिवादीबरोबर राहत असेल त्या घराला भेट देऊन प्राथमिक चौकशी करण्याचे लेखी आदेश देऊ शकतात. चौकशीचा अहवाल सादर झाल्यानंतर अहवालातील मुद्द्यांना धरून न्यायदंडाधिकारी कोणते एकतर्फी अंतरिम आदेश द्यायचे किंवा नाही त्याबाबतचा निर्णय घेऊ शकतात. अंतरिम किंवा अंतरिम एकतर्फी आदेश दिल्यानंतर न्यायदंडाधिकारी संरक्षण अधिकाऱ्यांना तो अंमलात आणावा यासाठी निर्देश देऊ शकतात. (आदेश अंमलात कसे आणता येतील त्याची चर्चा पुढे केली आहे.)

[11] *Vishal Damodar Patil* Vs. *Vishakha Vishal Patil* 2009 CrLJ 107

मात्र असे एकतर्फी आदेश प्रत्यक्षात दिले जात नाहीत असे पुष्कळदा अनुभवास येते. त्यामुळे ह्या मुद्द्याकडे न्यायदंडाधिकाऱ्यांनी विशेष लक्ष द्यायला हवे हे अधोरेखित करावे असे वाटते. अर्ज वाचल्यावर सकृद्दर्शनी असे दिसून आले की प्रतिवादी कौटुंबिक हिंसा करत आहे किंवा तसे करण्याची शक्यता आहे, तसेच कौटुंबिक हिंसेची तीव्रता आणि इतर परिस्थिती लक्षात घेऊन, तातडीने एकतर्फी आदेश करण्याने अर्जदार पीडितेला नक्की मदत होईल असे आपल्या लक्षात आल्यास सर्वात प्रथम तसा आदेश करावा. अंतरिम आदेशामुळे पीडितेस (आणि तिच्या मुलांना) अर्जाच्या सुनावणीच्या काळात कौटुंबिक हिंसेपासून कोणताही अपाय होऊ नये म्हणून त्याचा प्रतिबंध करण्यासाठी अंतरिम आदेशाचा उपयोग होऊ शकतो. तसेच अंतरिम आदेशानंतर अर्जाची सुनावणी झाल्यावर गरजेप्रमाणे अंतरिम आदेशात बदल करता येऊ शकतो [12] किंवा तो रद्दही करता येतो.

सदर कायदा हा दिवाणी कायदा असल्यामुळे प्रतिवादीला तुरुंगवासाची शिक्षा होण्याचा प्रश्न उद्भवत नाही. 'हिंसा थांबवा' ह्या आदेशामुळे प्रतिवादीचे नुकसान तर होत नाहीच पण अर्जदार पीडितेच्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण होऊ शकते, आपल्यावरील अन्यायाचे निराकरण होऊ शकते, न्यायालयीन यंत्रणेकडून तिला दिलासा मिळतो आहे असे वाटू शकते. ह्या साऱ्यामुळे तिचा कायदा आणि न्यायावरचा विश्वासही वाढू शकतो. पर्यायाने सदर कायद्याची उद्दिष्टेही साध्य होण्यास मदत होऊ शकते.

मात्र अशी मागणी/विनंती अर्जामध्ये नसल्यास ती माहिती अर्जदार महिलेला देणे हे न्यायदंडाधिकाऱ्यांचे कलम 5 प्रमाणे कर्तव्यच आहे. बहुतांश वेळेला अर्जदार न्यायदंडाधिकाऱ्यांना अर्ज दाखल करताना प्रथमच भेटत असल्यामुळे तिला तिचे सदर कायद्याखालील सर्व हक्क माहीत आहेत का हे विचारणे आणि नसल्यास ते सांगणे ही त्यांची जबाबदारी आहे. माहिती दिल्यानंतर तिला अर्जात बदल करायचा असल्यास त्यासाठी तिला परवानगीही द्यायला हवी.[13] त्यानंतर तिने अर्जात बदल केल्यास वर लिहिल्याप्रमाणे एकंदर परिस्थिती बघून एकतर्फी आदेश द्यायचे का ते ठरवावे.

ह्याचबरोबर अर्जदार पीडितेने अर्जामध्ये कलम 18 खालील संरक्षणाच्या आदेशाची मागणी/विनंती केली आहेना हेही तपासून पाहणे अत्यंत जरूरीचे आहे. जर अर्जात कलम

---

[12] *Kunanpa Reddy* Vs. *K. Swarna Kumari* AIR 2016 SC 2519; *Raosaheb Kambale* Vs. *Shaila Kambale* 2010 CrLJ 3596

[13] Same as above

18 खालील संरक्षणाच्या आदेशाची मागणी/विनंती केली नसेल तर अर्जदार पीडितेला ते समजावून सांगून अर्जात तसे लिहिण्यासाठी सांगायला हवे. कलम 12 खालील प्रत्येक अर्जावर आदेश देताना संरक्षणाचा आदेश नेहमी असायलाच हवा. एकतर्फी आदेश देतानाही **अंतरिम एकतर्फी संरक्षणाचा आदेश** द्यायलाच हवा. त्याची अनेक कारणे आहेत. ती खाली दिली आहेत.

### ५.३.२ कौटुंबिक हिंसेच्या प्रत्येक अर्जावर अंतरिम एकतर्फी / अंतिम संरक्षण आदेश देणे महत्त्वाचे आहे - सहा कारणेः

१. कलम 18 अन्वये दिलेला संरक्षण आदेश जोपर्यंत पीडिता न्यायदंडाधिकाऱ्यांकडे विनंती करून **मागे घेत नाही तोपर्यंत तो वैध असतो म्हणजेच लागू असतो.** म्हणजेच जोपर्यंत पीडितेस सुरक्षित वाटत नाही आणि प्रतिवादीची हिंसक वागणूक/ कृत्ये थांबली आहेत असे वाटत नाही किंवा अशी कृत्ये करण्याची शक्यता असल्यास ती थांबवण्यासाठी तो आदेश लागू राहतो.

२. अंतरिम / अंतिम संरक्षण आदेश असा विश्वास निर्माण करतो / वाढवतो की -
   अ. महिलेस (आणि तिच्या मुलांना) हिंसामुक्त, शांततापूर्ण आणि सन्मानपूर्वक जीवन जगण्याचा हक्क आहे आणि
   आ. कौटुंबिक हिंसा ही अशी घटना आहे की ती सहन केली जाऊ नये आणि त्यासाठी त्या महिलेस सदर कायद्याखाली आदेशांची मागणी करण्याचा हक्क आहे.

३. पीडितेस हिंसा थांबायला हवीच असते आणि तसे निर्देश न्यायदंडाधिकाऱ्यांनी दिल्यामुळे, प्रतिवादी हिंसा थांबवण्याचा निर्देश पाळण्याची शक्यता वाढते.

४. अंतरिम / अंतिम संरक्षण आदेशाचा भंग केल्यास तो सदर कायद्याच्या कलम 31 अन्वये गुन्हा असून त्यासाठी एक वर्षापर्यंत कैद आणि/ किंवा २०,००० रु. पर्यंत दंड ही शिक्षा आहे. अंतरिम / अंतिम संरक्षणाचा आदेश दिल्यावर शिक्षेच्या भीती मुळे प्रतिवादी हिंसा थांबवण्याची शक्यता वाढते.

५. न्यायालयीन आदेशांची अंमलबजावणी न झाल्यास तुरुंगवास किंवा दंड किंवा दोन्ही ही शिक्षा करण्याची सदर कायद्याच्या कलम 31 मधील ही एकमेव तरतूद आहे.

६. अंतरिम / अंतिम 'संरक्षण आदेशाचा' भंग केल्यासच कलम 31 लागू करणे शक्य होईल, कारण पीडितेचे तसे म्हणणे पुरावा म्हणून पुरेसे आहे.

## ५.४ अर्ज 12 निकाली लावण्यासाठीची कालमर्यादा :

कलम 12(1) खालचा अर्ज लवकरात लवकर सुनावणीस घेऊन निकाली काढण्यासाठी विशेष तरतूद कलम 12(4), (5) मध्ये करण्यात आली आहे.

सदर कायद्याच्या कलम 12(4) प्रमाणे
"न्यायदंडाधिकाऱ्यांनी अर्ज दाखल झाल्यापासून पहिली सुनावणी सर्वसाधारणपणे तीन दिवसांच्या आत ठरवावी".

सदर कायद्याच्या कलम 12(5) प्रमाणे
"न्यायदंडाधिकाऱ्यांनी कलम 12(1) खालील अर्जाचा निकाल पहिल्या सुनावणीच्या तारखेपासून साठ दिवसांच्या आत लावण्याचा कसोशीने प्रयत्न करावा".

वरील तरतुदीमागची भूमिका लक्षात घेऊन न्यायदंडाधिकाऱ्यांनी विशेष प्रयत्न करणे अपेक्षित आहे. हिंसापीडित महिला जेव्हा कायद्याचा आधार घेऊन न्यायालयापर्यंत पोचते तोपर्यंत तिने बरेच काही सहन केले असण्याची खूप जास्त शक्यता असते. अशा वेळेस न्यायालयातील औपचारिक दिरंगाईमुळे तिला आणखीन त्रास सहन करावा लागू नये आणि तिला लवकरात लवकर न्याय मिळावा ह्या दृष्टिकोनातून पीडितेचा विचार व्हायला हवा.

अर्थात ६० दिवसांच्या आत अर्ज निकाली काढण्याची तरतूद कायद्यात असली तरी प्रत्यक्षात तसे होताना दिसत नाही. मात्र ६० दिवसांच्या मर्यादेच्या कारणास्तव अनेकदा अंतरिम / एकतर्फी आदेश दिले जात नाहीत असा अनुभव आहे. त्यामुळे योग्य त्या ठिकाणी जरूर असेल तेव्हा वर सांगितलेल्या कारणासाठीही अंतरिम / एकतर्फी आदेश देणे हे आवश्यकच ठरते.

## ५.५ नोटीस बजावणे

कलम 12 खालचा अर्ज, डीआयआर, इतर पुराव्याची कागदपत्रे इत्यादी न्यायालयापुढे सादर झाल्यानंतर, अंतरिम एकतर्फी आदेश दिल्यानंतर किंवा तशी जरूर नसल्यास अंतरिम आदेशाशिवाय, पुढची पायरी म्हणजे कलम 12 खालील अर्ज प्रतिवादींच्या विरोधात दाखल झाल्याची नोटीस बजावणे.

कलम 12 खालील अर्जाच्या पुढील सुनावणीसाठी ठरलेल्या तारखेची नोटीस कलम 13 अन्वये न्यायदंडाधिकाऱ्यांनी तयार करून ती संरक्षण अधिकाऱ्यांकडे प्रतिवादींवर बजावण्यासाठी सुपुर्द करायची आहे. कलम 12(4), (5) ची परिणामकारकरित्या अंमलबजवाणी होण्याच्या दृष्टीने ही नोटीस संरक्षण अधिकाऱ्यांच्या हातात दिल्यापासून

त्यांनी ती दोन दिवसांच्या आत किंवा काही विशिष्ट परिस्थितीत न्यायदंडाधिकाऱ्यांनी दिलेल्या अनुमतीनुसार वाजवी वेळेच्या आत बजवावयाची असते. जरी कलम 13 मध्ये फक्त संरक्षण अधिकाऱ्यांनी नोटीस बजवावयाची अशी तरतूद असली तरी व्यवहारात येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन सदर नियामांखालील नियम 12(2) नुसार संरक्षण अधिकारी ही जबाबदारी दुसऱ्या व्यक्तीवर टाकू शकतात.

वास्तविक न्यायदंडाधिकारी नोटीस बजावण्यासाठी कलम 28 (2) मधील तरतुदीच्या आधारे आदेश देऊ शकतात. कलम 12 खालील अर्ज चालवण्यासाठी कलम 28 (2) मध्ये न्यायदंडाधिकाऱ्यांना त्यांना रास्त वाटेल अशी कोणतीही प्रक्रिया राबवण्याचा अधिकार आहे. **सदर कायद्यामधील कलम 28 (2) मधील ही अत्यंत महत्त्वाची तरतूद आहे.** त्यामुळे संरक्षण अधिकाऱ्यांशिवाय न्यायालयीन व्यवस्थेमध्ये असलेल्या बेलीफांनाही किंवा पोलिसांनाही नोटीस बजावण्याचे काम देता येऊ शकते. नेमलेल्या संरक्षण अधिकाऱ्यांची संख्या, त्यांच्यावर टाकलेल्या अनेक जबाबदाऱ्या आणि त्यांना उपलब्ध असलेली संसाधने बघता, नोटीस बजावण्यासाठी त्यांना मदत दिल्यास किंवा अस्तित्वात असलेली नोटीस बजावण्याची प्रक्रिया (उदा. बेलीफ, पोलिस) राबवल्यास प्रतिवादीवर वेळेत नोटीस बजावली जाऊ शकते.

त्याचप्रमाणे इमेलचाही उपयोग जरूर तिथे करता येऊ शकतो. अर्ज लवकर निकाली लागण्याच्या दृष्टीने नोटीस शक्य तितक्या लवकर बजावली जाणे महत्त्वाचे, हे न्यायदंडाधिकाऱ्यांनी लक्षात ठेवणे महत्त्वाचे. त्या दृष्टीने विचार करून परिस्थितीप्रमाणे योग्य तो निर्णय घेतला जायला हवा.

### ५.५.१ प्रतिवादीवर बजावल्या जाणाऱ्या नोटीसीत काय असावे?

सदर नियमांखालील फॉर्म ७ च्या किंवा त्यासारख्या नमुन्याप्रमाणे न्यायदंडाधिकाऱ्यांनी नोटीस तयार करायला हवी. कृपया परिशिष्ट ५ पाहा.

त्यात खालील बाबींचा समावेश असावा -

- अर्ज करणाऱ्यांचे ⁄ ची नाव ⁄ नावे आणि प्रतिवादीचे ⁄ दींची नाव / नावे
- नोटीस कुठे बजावली जावी त्या जागेचा पत्ता
- एखादी व्यक्ती किंवा जागा ओळखण्यास साहाय्य होईल असा तपशील
- ज्या कायद्याखाली आणि विशिष्ट कलमाखाली अर्ज केला असेल त्या कायद्याचे नाव व कलमाचा क्रमांक
- प्रतिवादीने कोर्टासमोर कधी हजर राहायचे ती तारीख व वेळ

**नोटीस संरक्षण अधिकाऱ्यांच्या हातात देण्यापूर्वी न्यायदंडाधिकाऱ्यांनी लक्षात घेण्याच्या इतर बाबी**

- प्रतिवादींची ओळख पटण्यास साहाय्य होईल अशी त्यांच्या बद्दलची संपूर्ण माहिती - नाव, पत्त्यांसकट द्यावी.
- नोटीस कुठे बजावली जावी तो पूर्ण पत्ता नोटीशीवर असावा. म्हणजे ती प्रतिवादीच्या राहत्या घरी किंवा कामाच्या ठिकाणी बजावता येईल.
- नोटीशीबरोबर अर्जाची आणि डीआयआरची प्रत जोडली आहे याची खात्री करून घ्यावी.
- नोटीस बजावण्यासाठी संरक्षण अधिकाऱ्यांना पोलिसांची/बेलीफाची गरज भासणार असल्यास त्याप्रमाणे पोलिसांसाठी/बेलीफासाठी लेखी आदेश तयार करून तोही नोटीशीबरोबर द्यावा.
- प्रतिवादी जर दुसऱ्या न्यायदंडाधिकाऱ्यांच्या न्यायकक्षेत राहत असेल (तात्पुरता किंवा कायमस्वरूपी) तर तेथील न्यायदंडाधिकाऱ्यांमार्फत नोटीस बजावण्यासाठी योग्य ते पत्र तयार करून संरक्षण अधिकाऱ्यांकडे द्यावे आणि पुढील योग्य त्या पद्धतीने नोटीस बजावण्याची प्रक्रिया करण्यास त्यांना सांगावे.
- नोटीस बजावल्याची घोषणा आणि लेखी अहवाल - ज्यात नोटीस कधी, कुठे, कोणाला आणि कशी बजावली गेली याचा तपशील असावा - संरक्षण अधिकाऱ्यांना न्यायालयात सादर करण्यास सांगावे. घोषणेचा आणि अहवालाचा नमुना खाली दिला आहे. हा अहवाल तयार करताना सदर नियमांमधील नियम 12 (2) चा उपयोग केला आहे

**संरक्षण अधिकाऱ्यांनी नोटीस बजावताना त्यांना येणाऱ्या अडचणींचा विचार करून न्यायदंडाधिकारी त्यांना पुढीलप्रमाणे मार्गदर्शन करू शकतील:**

## ५.५.२ विविध परिस्थितीत नोटीस कशी बजावावी?

**परिस्थिती १ : प्रतिवादी संरक्षण अधिकाऱ्यांच्या न्यायकक्षेत आहे परंतु तो जाणूनबुजून किंवा अन्य काही कारणांनी भेटत नाही.**

- “त्या स्थानाचे नियंत्रण” ज्याच्याकडे आहे अशा व्यक्तीस नोटीशीची प्रत द्यावी (दिवाणी प्रक्रिया संहितेच्या ऑर्डर 5 प्रमाणे, फौजदारी प्रकिया संहितेच्या प्रकरण ६ प्रमाणे) जसे

- ज्याच्या निवासस्थानी नोटीस बजावली जाते अशी प्रौढ व्यक्ती, कुटुंब सदस्य इत्यादी.
- जर नोटीस नोकरीच्या ठिकाणी बजावली गेली तर प्रतिवादीचा मालक/अधिकारी

- घरातील सज्ञान व्यक्तीने नोटीस घेण्याचे नाकारले किंवा दरवाजाला कुलुप असले तर ती नोटीस सहज दिसेल अशा ठिकाणी, उदाः दरवाजावर चिकटवून ठेवावी.
- कामात विलंब होऊ नये म्हणून त्या परिसरात प्रतिवादी राहतो का याविषयी शेजारी-पाजारी व अन्य ठिकाणी विचारून संरक्षण अधिकाऱ्यांनी खात्री करून घ्यावी आणि नंतरच ती चिकटवावी.
- चिकटवलेल्या नोटीशीचा फोटो काढावा किंवा नोटीस चिकटवली म्हणून साक्षीदार म्हणून शेजाऱ्यांची स्वाक्षरी घ्यावी.

**परिस्थिती २ : प्रतिवादी संरक्षण अधिकाऱ्यांच्या न्यायकक्षेत उपस्थित नाही**

- प्रतिवादीने नोटीशीमध्ये दिलेल्या पत्त्यावर नोटीस टपालाने, कुरियरने, फॅक्सने, इ-मेलने किंवा अन्य माध्यमातून पाठवायला सांगावी. काही उच्च न्यायालयांनी, उदाः दिल्ली उच्च न्यायालयाने, नोटीस बजावण्याच्या विविध मार्गांसाठी नियम तयार केले आहेत.
- ज्या न्यायकक्षात प्रतिवादी राहत आहे (तात्पुरता किंवा कायमस्वरूपी) तेथील न्यायदंडाधिकाऱ्यांमार्फत नोटीस बजावली जावी.
- ती नोटीस बजावण्यासाठी संरक्षण अधिकारी प्रतिवादी सध्या राहत असलेल्या न्यायकक्षेतील संरक्षण अधिकाऱ्यांकडे पाठवू शकतात. तसेच प्रतिवादी त्याच राज्याच्या दुसऱ्या जिल्ह्यात असेल किंवा दुसऱ्या राज्यात असेल तर त्या न्यायकक्षेतील संरक्षण अधिकाऱ्यांकडे पाठवू शकतात. (या कारणासाठी सर्व राज्यांमध्ये संरक्षण अधिकाऱ्यांच्या संपर्काचे जाळे तयार होणे आवश्यक आहे, त्यासाठी न्यायदंडाधिकाऱ्यांनी प्रयत्नशील राहावे).
- जर प्रतिवादी परदेशात राहत असेल किंवा नोकरी करत असेल तर ती नोटीस त्या विशिष्ट देशातील भारतीय राजदूतांच्या दूतावासाकडून बजावली जावी, (ऑर्डर 5, भारतीय दंड संहितेचा कलम 26A)
    - भारतीय दूतावासाच्या अधिकृत अधिकाऱ्यांचा सहीशिक्का घ्यावा. तो नोटीस बजावल्याचा पुरावा होतो.

**परिस्थिती ३ : जर संरक्षण अधिकाऱ्यांना दिलेल्या पत्त्यावर नोटीस बजावण्यासाठी जाणे असुरक्षित वाटले तर**

- जर संरक्षण अधिकाऱ्यांना प्रतिवादी किंवा त्याच्या कुटुंबीयांकडून हिंसा होण्याची भीती वाटत असेल तर पोलिसांना बरोबर नेण्यासाठी न्यायदंडाधिकारी यांनी तसे पोलिसांसाठी आदेश काढावे.
- संरक्षण अधिकाऱ्यांना आपण न्यायालयाचे अधिकारी असून सदर कायद्याखाली संरक्षण अधिकारी म्हणून आपली नेमणूक झालेली आहे हे दर्शवणारे राज्य शासनाने दिलेले ओळखपत्र बरोबर घेऊन जाण्यास सांगावे.
- ते ओळखपत्र प्रतिवादीस किंवा घरातील सज्ञान व्यक्तीस किंवा नोकरीच्या ठिकाणी मालकास/ अधिकाऱ्यांस दाखवावे असे संरक्षण अधिकाऱ्यांना सांगावे.

संरक्षण अधिकाऱ्यांनी नोटीस बजावल्यानंतर त्यांना नोटीस बजावली गेल्याची घोषणा आणि नोटीस बजावल्याचा अहवाल खाली दिलेल्या पद्धतीने न्यायालयात दाखल करण्यास सांगावे.

**नोटीस बजावली गेल्याची घोषणा**

प्रति,

माननीय न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी कोर्ट क्र. ---- स्थळ-----

विषयः प्रतिवादीस नोटीस बजावणे ----- नाव------

संदर्भः केस क्र. ------ कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण अधिनियम खाली दाखल केलेली केस

नोटीस बजावण्याच्या आदेशानुसार, जावक क्र.----- असलेली नोटीस या ठिकाणी ------- पत्ता----- या दिवशी------तारीख----- यावेळी------ बजावली गेली. नोटीस बजावली गेल्याचा अहवाल सोबत जोडला आहे.

संरक्षण अधिकाऱ्यांचे नाव आणि स्वाक्षरी

तारीख-----

| |
|---|
| **नोटीस बजावल्याचा अहवाल**<br>नोटीस -----------नाव यांनी स्वीकारली. प्रतिवादीने स्वतः / त्याच्या वतीने त्याच्या नात्यातील व्यक्तीने स्वीकारली.<br>किंवा<br>नोटीस ज्या पत्त्यावर द्यायची होती तो पत्ता अनेक प्रयत्न करूनही सापडला नाही (तो का सापडला नाही याचा काही तपशील लिहिणे)<br>किंवा<br>संरक्षण अधिकाऱ्यांनी ---------- यांच्याकडे चौकशी केल्यावर कळले की प्रतिवादी दिलेल्या पत्त्यावर राहत नाही किंवा नोकरी करत नाही.<br>किंवा<br>नोटीस दिलेल्या पत्त्याच्या ठिकाणी ------ चिकटवण्यात आली कारण कोणीही व्यक्ती तिथे नव्हती. (सोबत - फोटो जोडावा)<br>किंवा<br>संरक्षण अधिकारी दिलेल्या पत्त्यावर तीन वेळा जाऊन आले परंतु प्रतिवादी भेटला नाही. शेजाऱ्याने ----- नाव-- माहिती दिली की प्रतिवादी तेथे नेहमी येतो म्हणून नोटीस दरवाजावर चिकटवण्यात आली. (सोबत - फोटो जोडावा)<br>किंवा<br>प्रतिवादीने किंवा त्याच्या वतीने उपस्थित असलेल्या व्यक्तीने नोटीस स्वीकारण्यास नकार दिला.<br>किंवा<br>नोटीस इ-मेलने पाठवण्यात आली. इ-मेल गेला नाही असे दिसून येत नाही याचा अर्थ असा की ती नोटीस पोचली आणि म्हणून बजावली गेली.<br><br>संरक्षण अधिकाऱ्यांचे नाव आणि स्वाक्षरी<br>तारीख----- |

### ५.५.३ नोटीस बजावण्यात अपयश आल्यास त्याचे परिणाम काय होतात?

नियम 12(2)(d) प्रमाणे नोटीस बजावली गेली नाही किंवा नाकारली गेली तर दिवाणी प्रक्रिया विधान, १९०८ चा (सीपीसीचा) ऑर्डर 5 आणि फौजदारी प्रक्रिया संहितेचे (सीआरपीसी) प्रकरण ६ अन्वये जे परिणाम होतात तेच परिणाम होतात.

फौजदारी प्रक्रिया संहितेतील तरतुदी अनुसरून न्यायदंडाधिकारी खालील गोष्टी करू शकतातः

- नोटीस बजावताना पहिल्याच वेळेस जामीन देता येण्यासारखे वॉरंट काढू शकतात.
- नोटीस बजावतानाच्या दुसऱ्या वेळेस जामीन न देता येणारे वॉरंट काढू शकतात.
- जर परिस्थितीच तशी असेल तर प्रतिवादी विरुध्द सदर कायद्याच्या कलम 23(2) अन्वये एकतर्फी आदेश देऊ शकतात.

### ५.५.४ संरक्षण अधिकाऱ्यांनी वेळेवर नोटीस बजावली नाही तर काय करावे?

संरक्षण अधिकाऱ्यांनी जर नोटीस बजावली नाही तर तसे न्यायालयाला लेखी कळवणे अपेक्षित आहे. त्यात नोटीस न बजावण्याची कारणे द्यायला हवीत आणि मुदत वाढवून देण्याची विनंती करायला हवी. दिलेली कारणे योग्य नसल्यास, न्यायदंडाधिकारी संरक्षण अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करू शकतात आणि त्यांना सदर कायद्याच्या कलम 33 अन्वये एक वर्षापर्यंत कैद आणि / किंवा २०,००० रु.पर्यंत दंड करू शकतात. वेळ आल्यास न्यायदंडाधिकाऱ्यांनी तसे आदेश देऊन कारवाई करायला हवी. अशा प्रकारची कारवाई प्रत्यक्षात होऊ शकते हे संरक्षण अधिकाऱ्यांना समजले की ते आपली कर्तव्ये जास्त जबाबदारीने पार पाडतील. त्याची मदत पीडितेला मिळेल.

### ५.५.५ नोटिशीला प्रतिवादीचे उत्तर:

नोटीस बजावली गेल्यानंतर प्रतिवादीने न्यायालयात हजर होऊन पीडितेच्या अर्जाला लेखी उत्तर द्यायचे आहे. ते देण्यासाठी जास्त मुदती न्यायदंडाधिकाऱ्यांनी देऊ नयेत. तसेच पुढील तारखाही लवकरच्या द्याव्यात. अन्यथा अर्ज निकाली लागण्यास उशीर लागू शकतो, जे कायद्यातील कलम 12 (2) च्या आणि पीडितेच्या दृष्टीनेही हिताचे नाही.

## ५.६ समुपदेशन:

**कलम 14:**

१. न्यायदंडाधिकारी त्यांच्यासमोर सुरू असलेल्या अर्जाच्या सुनावणीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदारास किंवा प्रतिवादीस, एकेकटे किंवा एकत्र, पात्रता आणि अनुभव असणाऱ्या समुपदेशकाकडे समुपदेशनासाठी जाण्याची सूचना करू शकतात.

२. अशी सूचना केल्यानंतर सुनावणीची तारीख दोन महिन्यांच्या नंतरची ठेवावी.

सदर कायदा हा कायदा दिवाणी करण्यामागे एक महत्त्वाचे कारण असे होते की पीडित स्त्रीला संसार मोडण्यामध्ये नव्हे तर तो वाचवण्यासाठी कायदा हवा होता. **तिला नात्यात न्याय हवा होता**. फौजदारी कायद्याने हे सहसा साध्य होत नव्हते. पण संसार वाचवताना तिला हिंसा बंद व्हावी असेही अपेक्षित होते. त्यासाठी कोणाबरोबर तरी चर्चा करावी, ती

विश्वासातल्या व्यक्तीबरोबर असावी ज्यात गुप्तता पाळली जाईल ह्याची खात्री असावी असे अपेक्षित होते.

दोघांच्यामधले समज-गैरसमज दूर व्हावे, महिलेलाही सन्मानाने, शांततेने जगता यावे, हिंसा करणे हा कोणत्याच प्रश्नावरचा इलाज असू शकत नाही हे चर्चेतून दोघांच्याही लक्षात आणून देण्यासाठी समुपदेशनाइतके महत्त्वाचे दुसरे माध्यम नाही. हया विचाराने समुपदेशनाची तरतूद कलम 14 मध्ये करण्यात आली. समुपदेशन हे मुख्यत्वे पीडितेच्या हितासाठी केले जावे हे मूळ तत्त्व त्यामागे आहे.

प्रतिवादीला हिंसा कधीच खपवून घेतली जाणार नाही असा संदेश देणे हाही समुपदेशनाचा एक महत्त्वाचा उद्देश आहे.

समुपदेशकांची नेमणूक राज्य सरकारतर्फे केली जाते. समुपदेशक शक्यतो महिला असावी असे नियम 13 (3) ने सांगितले आहे. समुपदेशकांची यादी संरक्षण अधिकाऱ्यांनी तयार करायची असते आणि दर तीन वर्षांनी ती सुधारून न्यायदंडाधिकाऱ्यांकडे पाठवायची असते (नियम 8 (1) (9) (10)). न्यायदंडाधिकाऱ्यांनी संरक्षण अधिकाऱ्यांकडून ही यादी येते आहे ना ह्याकडे लक्ष ठेवायला हवे. यादी न आल्यास संरक्षण अधिकाऱ्यांना 'यादी पाठवा' असा आदेश द्यायला हवा. आणि तरीही न आल्यास त्यांच्या विरुद्ध कलम 33 खाली कारवाई करावी.

न्यायदंडाधिकाऱ्यांना जर खात्री वाटत असेल की समुपदेशनामुळे हिंसा थांबेल, तर आणि तरच समुपदेशनाची सूचना करावी. त्याचबरोबर शक्यतो अंतरिम आदेश दिल्यानंतरच ही सूचना करावी. त्यामुळे अनेक हेतू साध्य होऊ शकतात. महिलेचा आत्मविश्वास वाढून तिला सक्षम झाल्याची भावना निर्माण होऊ शकते, जी तिच्यासाठी ह्या टप्प्यावर अतिशय महत्त्वाची असते. त्याचबरोबर समुपदेशन गंभीरपणे घेतल्यास आपल्याला त्याचा उपयोग होईल असे प्रतिवादीसही वाटू शकते.

समुपदेशनाची सूचना न्यायदंडाधिकाऱ्यांनी करताना समुपदेशकाची नेमणूकही करण्याचे आदेश द्यायला हवेत. एकदा समुपदेशक नेमले की त्यांनी न्यायदंडाधिकाऱ्यांच्या किंवा संरक्षण अधिकाऱ्यांच्या किंवा दोघांच्याही देखरेखीखाली काम करायचे असते - सदर नियमांखालील नियम 14(1) नियम 14(2) ते (6) मध्ये समुपदेशनाची प्रक्रिया विशद केली आहे. समुपदेशकांना समुपदेशनाचा आदेश देताना त्यांनी नियम 14 मध्ये विहित केल्याप्रमाणे पीडितेच्या आणि तिच्या मुलांच्या सुरक्षेच्या प्राधान्यावर भर देणारी प्रक्रिया

अनुसरावी असे आदेशात स्पष्टपणे लिहावे. नियम 14 (2) ते (6) मधील प्रक्रियेनुसार न्यायदंडाधिकाऱ्यांनी समुपदेशकासाठी कागदपत्रे तयार करवून घ्यावीत. ती पुढील प्रमाणे असावीत आणि समुपदेशनाच्या आदेशाबरोबर समुपदेशकाकडे पाठवावीत:

१. अर्जदाराच्या अर्जाची आणि प्रतिवादीच्या उत्तराची प्रत
२. समुपदेशनाची सूचना, त्या सूचनेमधे पुढील मुद्दे असावेत:
   अ. समुपदेशनासाठी अर्जदार किंवा प्रतिवादी किंवा दोघांच्याही सोयीची जागा ठरवा
   आ. प्रतिवादी कडून 'हिंसा करणार नाही, किंवा अर्जदाला भेटून किंवा फोनवरुन दबाव टाकणार नाही' असे हमीपत्र तुम्हाला द्यायला सांगा
   इ. कोणत्याही प्रकारे कौटुंबिक हिंसेचे समर्थन करण्यास प्रतिवादीस परवानगी दिली जाणार नाही ह्याची स्पष्ट कल्पना समुपदेशन सुरू करण्याआधी प्रतिवादीस द्या
   ई. कौटुंबिक हिंसा परत केली जाणार नाही अशी खात्री प्रतिवादीकडून दिली जाईल ह्या पद्धतीने समुपदेशन करा

दोघांच्या एकत्र समुपदेशनासाठी नियम 14 (7) ते (16) मध्ये समुपदेशनाची प्रक्रिया विशद केली आहे. त्या प्रक्रियेनुसार न्यायदंडाधिकाऱ्यांनी समुपदेशकासाठी पुढील कागदपत्रे तयार करवून घ्यावीत आणि ती समुपदेशकाकडे समुपदेशनाच्या आदेशाबरोबर पाठवावीत:

अ. पीडितेच्या तक्रारी काय आहेत ते समजून घेऊन त्या कशा सोडवल्या जाऊ शकतील ह्यावरच प्रामुख्याने भर द्या
आ. पीडितेची इच्छा असेल तरच तडजोडीचे प्रयत्न करा
इ. तडजोडीच्या प्रयत्नामध्ये पीडितेच्या तक्रारींचे निवारण दोघांशी चर्चा करून ठरवा
ई. लवकरात लवकर आपला अहवाल तयार करून सादर करा
उ. जर दोघांमध्ये तडजोड झाली तर तडजोडीच्या अटी लिहून त्यावर दोघांच्याही सह्या घ्या
ऊ. जर दोघांमध्ये तडजोड झाली नाही तर तसा अहवाल  करून सादर करा

तडजोड झाली असल्यास ती झाल्याचा अहवाल न्यायदंडाधिकाऱ्यांकडे आल्यावर, तडजोडीतील तोडग्यांची गुणवत्ता पाहून  दोघांकडून प्राथमिक चौकशी करून, स्वतःचे समाधान झाले असल्यास समाधानाची कारणे नोंदवावी. जरूर वाटल्यास प्रतिवादीकडून 'पुन्हा हिंसा करणार नाही, तडजोडींच्या अटी मान्य आहेत' असे हमीपत्र घ्यावे - नियम

14(13). तडजोडीचा अहवाल पडताळून बघून दोन्ही बाजूंच्या संमतीने तडजोडीच्या अटींसह आदेश द्यावा, नियम 14(14).

तडजोड झाली नसल्याचा अहवाल जर आला तर न्यायदंडाधिकाऱ्यांनी अर्ज पुढे चालवावा - नियम 14 (15). न्यायदंडाधिकाऱ्यांनी हेही लक्षात ठेवले पाहिजे की समुपदेशनाचे झालेले कामकाज हे न्यायालयाच्या नोंदीचा भाग होत नाही. फक्त त्याचाच आधार घेऊन कोणतेही निष्कर्ष काढता येणार नाहीत - नियम 14 (16).

दोन महिन्यांपेक्षा अधिक कालावधी समुपदेशनासाठी देता येणार नाही ह्याची खबरदारी न्यायदंडाधिकाऱ्यांनी घ्यावी.

## ५.७ 'मध्यस्थी' (मेडीएशन):

सदर नियामांखालील नियम 14 मध्ये 'मध्यस्थी'चा (मेडीएशन) उल्लेख नाही. परंतु सीपीसी कलम 89 (1) प्रमाणे तसेच उच्च न्यायालयांच्या मेडीएशन नियमांप्रमाणे न्यायदंडाधिकारी अर्जदारास आणि प्रतिवादीस मध्यस्थीसाठी पाठवू शकतात. मात्र मध्यस्थी आणि समुपदेशानामध्ये फरक आहे हे समजून घेतले पाहिजे. मध्यस्थी करताना फक्त तडजोडीसाठीच प्रयत्न होतात तर समुपदेशनामधे समुपदेशकावर जास्त जबाबदारी असते. महत्त्वाचे म्हणजे समुपदेशक तडजोडीसाठी स्वतः अटी न सांगता मुद्दे सुचवतात आणि समुपदेशीना निर्णय घेण्यास सांगतात. स्वतःचे मुद्दे लादत नाहीत. त्याबरोबरच समुपदेशनासाठीचे विस्तृत नियम सदर नियमांखाली दिलेले असल्यामुळे स्त्रीवादी भूमिकेतून, पीडितेचे प्रश्न लक्षात घेऊन ते कसे सोडवले जातील ह्या बद्दल मार्गदर्शन केलेले आहे. त्यामुळे समुपदेशन का मेडीएशन ह्याचा निर्णय दोन्हींमधला फरक लक्षात घेऊन न्यायदंडाधिकाऱ्यांनी घ्यायला हवा आणि योग्य तो आदेश द्यायला हवा.

## ५.८ कुटुंब कल्याण तज्ज्ञ :

सदर कायद्याच्या कलम 15 मध्ये न्यायदंडाधिकाऱ्यांच्या मदतीसाठी अजून एका तज्ज्ञाची तरतूद केली आहे. पीडितेचे नातेवाईक किंवा इतर कोणीही व्यक्ती, ज्या कुटुंब कल्याणाच्या पुरस्कर्त्या आहेत आणि त्यासाठी काम करत आहेत अशा व्यक्तींपैकी न्यायदंडाधिकाऱ्यांना योग्य वाटेल अशा व्यक्तींची निवड ते करू शकतात. अशा व्यक्तींमध्ये महिलांना प्राधान्य देण्यात यावे, असे कलम 15 मध्ये लिहिले आहे.

## ५.९ सुरक्षा नियोजन:

सदर नियमांखालील नियम 8(4) मध्ये संरक्षण अधिकाऱ्यांनी पीडितेवर भविष्यात होणारी कौटुंबिक हिंसा टाळण्यासाठी तिच्या मदतीने संरक्षण योजना तयार करावी, हे त्यांचे कर्तव्य आहे असे म्हणले आहे. (फॉर्म ५ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे पोलिस अधिकारी, इतर सेवा देणारे हेही महिलेस संरक्षण नियोजन तयार करण्यास मदत करू शकतात). हे सुरक्षा नियोजन पूर्वी झालेल्या हिंसेवरुन पीडितेला असलेल्या धोक्याचे मूल्यमापन करून तिच्याशी चर्चा करून संरक्षण अधिकाऱ्यांनी तयार करावयाचे आहे. त्यासाठी सदर नियमांखाली फॉर्म ५ दिला आहे. कृपया परिशिष्ट ६ पाहा.

त्यामध्ये पुढील रकाने असतात.

| अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|
| प्रतिवादीकडून **होणारी हिंसा** (**अनेक प्रकार**) | 'अ' रकान्यात उल्लेखिलेल्या हिंसेचे पीडित **महिलेवर झालेले/ होणारे परिणाम** | 'अ' रकान्यात उल्लेखिलेल्या हिंसेविषयी **पीडितेस वाटणारी चिंता किंवा भीती** | **सुरक्षेसाठी उपाय** (ती महिला सुरक्षेसाठी कोणते उपाय करू शकते) | **न्यायालयाकडून कोणते आदेश मिळावेत** |

न्यायदंडाधिकाऱ्यांना कलम 12 खालील पीडितेचा अर्ज वाचल्यानंतर किंवा कारवाई चालू असताना कोणत्याही टप्प्यावर पीडितेवर पुनःपुन्हा हिंसा होण्याचा धोका आहे असे वाटले आणि अर्जाबरोबर किंवा नंतरही सुरक्षा नियोजन न्यायालयात दाखल झाले नसल्यास, ते संरक्षण अधिकाऱ्यांना अर्जदाराशी चर्चा करून सुरक्षा नियोजन तयार करून न्यायालयात दाखल करण्यास सांगू शकतात. धोक्याचा अंदाज दर्शवणारे काही निदर्शक पुढीलप्रमाणे सांगता येतील:

- हिंसेची वारंवारिता
- काही वर्षात हिंसेत झालेली वाढ आणि तिची तीव्रता
- काळाबरोबर फक्त पीडितेवरच नव्हे तर तिच्या मुलांवर आणि तिला पाठिंबा देणाऱ्यांवरही हिंसा
- वस्तू किंवा शस्त्रांचा वापर
- पीडितेचा आत्महत्येचा प्रयत्न
- प्रतिवादीची आत्महत्येची धमकी किंवा तसे प्रयत्न
- पूर्वी खून करण्याची धमकी किंवा तसे प्रयत्न
- वेळी-अवेळी घरात कोंडून ठेवल्याचा किंवा घरातून हाकलून दिल्याचा पूर्वानुभव
- हिंसेची वेळ आणि स्थळ - हिंसा रात्रीच्या वेळी घडली का किंवा आजूबाजूस कोणी नसताना दारू प्यायल्यावर किंवा दारू न पिताही घडली का

- प्रतिवादीची वस्तूंची फेकाफेक करण्याची तसेच दंगा करण्याची आणि प्राण्यांना इजा करण्याची सवय

हे नियोजन दाखल झाल्यानंतर फॉर्म ५ च्या 'ड' रकान्यातील महिलेने कोणते उपाय करायचे हे लिहिले आहेत आणि त्यासाठी मदत व्हावी म्हणून 'इ' रकान्यात न्यायालयाकडून कोणते आदेश अपेक्षिले आहेत ते न्यायदंडाधिकाऱ्यांनी बघावेत आणि त्याप्रमाणे योग्य वाटतील ते आदेश द्यावेत.

सुरक्षा नियोजन न्यायालयात सादर करणे बंधनकारक नाही. सुरक्षा नियोजन एकदा सादर झाले की ते प्रतिवादीसही पाहता येते. पीडिता स्वतःच्या सुरक्षेसाठी खबरदारीचे कोणते उपाय करणार हे त्यालाही कळतात (फॉर्म ५ रकाना 'ड' मधे लिहिलेले) उदाः मोबाईल हाताशी ठेवणे, शेजाऱ्यांची मदत घेणे, एकत्र राहत असल्यास घरातील शस्त्रांसारख्या वस्तु लपवून ठेवणे इ. या गोष्टी त्याला कळल्यास तो या माहितीचा दुरुपयोग करू शकेल आणि तिची योजना उधळून लावू शकेल.

मात्र हिंसेची तीव्रता आणि कौटुंबिक हिंसेस आळा घालण्यासाठी विशिष्ट आदेशांची गरज आणि निकड आहे हे दाखवण्यासाठी सुरक्षा योजना न्यायालयात सादर होऊ शकते. त्याची काही उदाहरणे खाली दिलेली आहेत.

ग्रामीण रुग्णालयात रूपाली 'एएनएम' म्हणून आरोग्य खात्यात काम करते, नवऱ्याने तिच्यावर केलेल्या हिंसेच्या घटनेनंतर ती संरक्षण अधिकाऱ्यांकडे गेली व तिने सदर कायद्याखाली संरक्षण आणि उपायांची मागणी केली.

त्यानंतर ती तिच्या पाच वर्षांच्या मुलासह नवऱ्यापासून स्वतंत्र राहू लागली. तिला लग्न मोडायचे नव्हते, तिला फक्त हिंसा थांबवायची होती. तिने डीआयआर आणि कलम 12 खाली अर्ज दाखल केला तसेच सुरक्षेच्या आणि मुलाच्या देखभालीच्या खर्चासाठी अंतरिम आर्थिक आदेशाची विनंती केली. ती स्वतंत्र राहू लागल्यावर तिचा नवरा तिचा पाठलाग करू लागला, आणि तिच्या सहकाऱ्यांना तसेच चहावाल्यालासुध्दा तिचे चारित्र्य चांगले नाही असे सांगू लागला.

अर्जाची सुनावणी सुरू झाली आणि संरक्षण अधिकाऱ्यांनी सुनावणीच्या वेळी नवऱ्याचे पाठलाग करणे न्यायालयाच्या निदर्शनास आणले आणि अंतरिम आदेश द्यावा असा आग्रह धरला. तथापि अंतरिम आदेश दिला गेला नाही.

त्यानंतर संरक्षण अधिकाऱ्यांनी रूपालीस फॉर्म ५ - सुरक्षा नियोजन - भरण्यास साहाय्य केले आणि ते न्यायदंडाधिकाऱ्यांकडे सादर केले. **या सुरक्षा नियोजनातून तिला असलेला धोका स्पष्टपणे दिसून आला आणि न्यायदंडाधिकाऱ्यांनी विनाविलंब सुरक्षेसाठी अंतरिम आदेश दिला आणि तिच्या नवऱ्याला पाठलाग करण्याची तसेच तिच्या कामाच्या ठिकाणी जाण्याची मनाई केल्याचा आदेश देण्यात आला.**

**संरक्षण आदेश एकतर्फी किंवा शक्य तितक्या लौकर देण्याचे समर्थन करण्यासाठी न्यायदंडाधिकाऱ्यांनी संरक्षण अधिकाऱ्यांना सुरक्षा नियोजन तयार करण्याचे निर्देश दिले**, अशीही काही उदाहरणे आहेत.

> मंगल आणि राजेंद्रचा आंतरजातीय विवाह दोन्ही कुटुंबीयांच्या मनाविरुध्द होता. सात वर्षांच्या कालावधीत राजेंद्र मरण पावला. त्याच्या मागे मंगल आणि तीन लहान मुले होती. मंगलने तिच्या सासू-सासऱ्यांबरोबर एकत्र कुटुंबाच्या एकत्रित घरात, ज्यात राजेंद्रचासुध्दा कायदेशीर वाटा होता, त्यात राहण्याची परवानगी द्यावी असे सांगायचा प्रयत्न केला. परंतु तिच्या सासू-सासऱ्यांनी परत घरात यायचा प्रयत्न केला तर गंभीर परिणामांना तोंड द्यावे लागेल असे धमकावले आणि छळ केला.
>
> सदर कायद्याखाली मंगलने संरक्षण आणि निवासाच्या आदेशासाठी अर्ज दाखल केला. जेव्हा अर्जाची सुनावणी चालू होती तेव्हा **न्यायदंडाधिकाऱ्यांनी मंगल आणि तिच्या मुलांसाठी सुरक्षा नियोजन बनवण्याचे संरक्षण अधिकाऱ्यांस निर्देश दिले**.
>
> हिंसेचा तपशील, आणि सुरक्षा योजनेत दर्शवलेल्या भावनिक, आर्थिक हिंसेच्या धोक्याच्या नोंदी आणि एकत्रित घराच्या मालकी हक्कांपासून वंचित करणे आणि जीवाला धोका असणे, या आधारावर न्यायदंडाधिकाऱ्यांनी संरक्षण अधिकाऱ्यांना गृहभेट देऊन एकत्रित कुटुंबाच्या राहत्या घरात मंगलला राहता येईल असा स्वतंत्र भाग देता येतो का, ते तपासण्याचा निर्देश दिला.
>
> संरक्षण अधिकाऱ्यांच्या अहवालाच्या साहाय्याने न्यायदंडाधिकाऱ्यांनी पहिल्या मजल्यावरच्या दोन खोल्या मंगल आणि तिच्या मुलांना राहण्यासाठी देण्यात याव्यात असा 'निवासाचा आदेश' दिला. त्याचबरोबर प्रतिवादींपासून कौटुंबिक हिंसेच्या बाबतीत संरक्षण मिळावे असा 'संरक्षण आदेशही' दिला. संरक्षण अधिकाऱ्यांच्या अहवालानुसार आता घराचा ताबा मिळून चार वर्षे झाली, मंगल तिच्या मुलांसह शांततेने राहत आहे.

वरील उदाहरणे प्रत्यक्षात घडलेली आहेत (फक्त नावे बदलली आहेत). यात वापरलेल्या सुरक्षा नियोजनातून संरक्षण आदेश, साहाय्यासाठी विशिष्ट आदेश आणि अन्य संबंधित साहाय्य किती गरजेचे आणि निकडीचे आहे याचे समर्थन होते.

एकूणच अर्जदार महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ही तरतूद फार महत्त्वाची आहे आणि योग्य त्या ठिकाणी तिचा वापर झाल्यास त्यांना शांततेने जगण्यास मदत होणारी आहे, हे न्यायदंडाधिकाऱ्यांनी लक्षात घ्यावे. मात्र सुरक्षा नियोजन ही न्यायालयीन आदेशांना पर्याय नाही. सुरक्षा नियोजन दाखल झाले नाही तर अर्जाची सुनावणी प्रलंबित करता येणार नाही कारण ती प्रत्येक अर्जाबरोबर दाखल झालीच पाहिजे अशी तरतूद कायद्यात नाही.

## ५.१० अर्ज सुनावणीची प्रक्रिया

सदर कायद्याच्या कलम 28(1) मध्ये अर्जाची सुनावणी सीआरपीसीतील फौजदारी प्रक्रियेनुसार करायची आहे असे स्पष्टपणे सांगितले आहे. पण त्याचवेळेस हा कायदा आणि त्याखालील मिळणारे आदेश हे दिवाणी स्वरूपाचे असल्यामुळे न्याय करताना न्यायदंडाधिकाऱ्यांना स्वतःला योग्य वाटेल अशी प्रक्रिया राबविण्याचे स्वातंत्र्यही दिले आहे.

### ५.१०.१ प्रक्रिया

**कलम 28: प्रक्रिया**

(१) ह्या कायद्यामध्ये ज्या कलमांखाली विशिष्ट प्रक्रिया वापरायची तरतूद आहे ती कलमे सोडून, कलम 12, 18, 19, 20, 21, 22, 23 आणि 31 खालील सुनावणी चालवण्यासाठी सीआरपीसीतील तरतूदी लागू होतील.

(२) उप-कलम (१) मधील तरतुदी कलम 12 किंवा कलम 23(2) खालील अर्जाची सुनावणी करताना न्यायालयाला स्वतःची प्रक्रिया राबविण्यास प्रतिबंध करणार नाहीत.

कलम 28(2) मधील विशेष अधिकार फारच महत्त्वाचा आहे. बरेचदा असा अनुभव येतो की पीडितेच्या हितासाठी, तिला मदत मिळावी या उद्देशाने (बेनिफिशिअल) केलेला हा कायदा असल्यामुळे तिला न्याय मिळावा म्हणून न्यायदंडाधिकारी अशा प्रकारची प्रक्रिया राबवतात तेव्हा प्रतिवादीच्या वकिलांकडून न्यायदंडाधिकारी पक्षपातीपणाने प्रक्रिया राबवत आहेत, ह्या कारणासाठी वेगळ्या न्यायालयात अर्ज चालविण्याची विनंती जिल्हा न्यायाधीशांकडे केलेली दिसते. अशा वेळेस न्यायदंडाधिकाऱ्यांनी कणखर भूमिका घेऊन कलम 28 (2) च्या आधारे आपण जे करतो आहे ते कायद्याच्या चौकटीत राहूनच न्यायाच्या दृष्टीने योग्य ते करतो आहोत असे ठामपणे सांगावे. न्यायालयातील सर्वच न्यायदंडाधिकाऱ्यांनी अशी भूमिका घेणे हे कायद्यातील तरतुदींच्या दृष्टीने योग्य, न्याय्य बुध्दीचेच (इक्विटी) ठरणारे आहे.

सदर नियमांखालील नियम 6 (2) प्रमाणे, कलम 28 (1) च्या संदर्भात कलम 12 खालचा अर्ज आणि आदेशांची अंमलबजावणी सीआरपीसीतील कलम 125 चालवताना जी प्रक्रिया

वापरली जाते त्या प्रक्रियेप्रमाणे चालवायचे आहे, असे सांगितले आहे. मात्र 28 (2) मधली विशेष तरतुदीला डावलणारा हा नियम नाही हे समजून घेतले पाहिजे [14].

कलम 12 खालचा अर्ज संक्षिप्त (समरी) प्रक्रिया वापरून चालवायचा आहे. त्यामागचे कारण अर्ज लवकरात लवकर निकाली काढणे हे आहे. त्यासंबंधी सीआरपीच्या कलम 262, 263, 264 मध्ये तरतूद केलेली आहे. आरोपपत्र लेखी तयार न करता तोंडी पुरेसे असते. तोंडी साक्षीसह इतर पुराव्यातील फक्त महत्त्वाचा भाग नोंदवायचा असतो. निकाल पत्रात निकालाची कारणे थोडक्यात लिहायची असतात.

### ५.१०.२ अर्जाची सुनावणी - संरक्षण अधिकाऱ्यांची मदत

वर लिहिल्याप्रमाणे कलम 12 खालील अर्जाची नोटीस पाठवण्याची जबाबदारी संरक्षण अधिकाऱ्यांवर आहे. त्याशिवाय ह्या कायद्याने आणखीही अनेक जबाबदाऱ्या संरक्षण अधिकाऱ्यांवर टाकलेल्या आहेत. पीडितेला मदत करण्याच्या अत्यंत महत्त्वाच्या जबाबदारीबरोबर (सदर नियमांखालील नियम 8 (1) (2) मध्ये विहित) संरक्षण अधिकारी हे न्यायालयाला मदत करण्यासाठी नेमलेले सरकारी अधिकारी, लोक सेवक आहेत (कलम 30). न्यायदंडाधिकाऱ्यांनी निर्देश केलेल्या सर्व बाबींमध्ये त्यांना साहाय्य करणे हे संरक्षण अधिकाऱ्यांचे कर्तव्यच आहे (नियम 10 (2)).

### ५.१०.३ संरक्षण अधिकाऱ्यांच्या मदतीचा जास्तीत जास्त उपयोग

कलम 12 खालील अर्जाची सुनावणी सुरू झाल्यानंतर न्यायालयीन प्रक्रियेमध्ये न्यायदंडाधिकाऱ्यांनी स्वतःला योग्य वाटेल त्या सर्व कामामध्ये संरक्षण अधिकाऱ्यांना सहभागी करून घ्यायला हवे, (नियम 10 (2)). सदर नियमांखालील नियम 10 (1) मध्ये संरक्षण अधिकाऱ्यांची काही कर्तव्ये सांगितली आहेत. न्यायदंडाधिकाऱ्यांनी कलम 12 खालचा अर्ज चालवताना संरक्षण अधिकाऱ्यांकडून लेखी आदेशान्वये कोणती कामे करून घेता येतील ते ह्या नियमामध्ये सांगितले आहे. ते पुढीलप्रमाणे:

---

[14] *Aniket Tupe* Vs. *Piyusha Tupe* https://indiankanoon.org/doc/26774800/ decided by Bom HC on 22nd March 2018

**नियम 10 (1)**

अ. **गृहभेट देणेः** एकतर्फी अंतरिम आदेश देण्यासंबंधी विचार करण्यासाठी, सामाईक घराला भेट देऊन प्राथमिक चौकशी करणे

आ. **आर्थिक स्थितीचा अहवाल**: प्रतिवादीची योग्य ती चौकशी करून त्याच्या आर्थिक स्थितीचा अहवाल देणे उदा. वेतन, मिळकत, बँक खाते किंवा इतर कोणतीही कागदपत्रे

इ. **वैयक्तिक मालकीच्या वस्तू:** पीडितेस तिचे दागदागिने यांसह तिच्या वैयक्तिक मालकीच्या वस्तू परत मिळवून देणे आणि सामाईक घराचा ताबा मिळवून देणे.

ई. **मुलांचा ताबा:** पीडितेस मुलांचा ताबा परत मिळवून देणे किंवा त्यांना भेटण्याचा हक्क मिळवून देणे.

उ. **शस्त्रे जप्त करणे:** गरज भासल्यास, आरोपीने कौटुंबिक हिंसेत वापरलेली शस्त्रे पोलिसांच्या साहाय्याने जप्त करणे.

ऊ. **आदेशांची अंमलबजावणी**: कलम 12, 18, 19, 20, 21, 23 खालील आदेशांची अंमलबजावणी करण्यास साहाय्य करणे.

**अ. गृहभेट देणेः**

न्यायालयास प्रथम दर्शनी हिंसेसंदर्भातील सत्य परिस्थिती समजण्याच्या दृष्टीने, अर्जदाराने अर्जात केलेल्या आरोपांबद्‌दल, विधानांबद्‌दल निष्पक्ष मूल्यमापन होण्यासाठी संरक्षण अधिकाऱ्यांनी गृहभेट करावी असा आदेश देण्याची तरतूद कायद्‌यात करण्यात आली आहे.

न्यायदंडाधिकारी संरक्षण अधिकाऱ्यांना पुढील परिस्थितीत सामाईक घराला भेट देण्यास सांगू शकतील:

१. <u>खालील बाबतीत नमूद केलेली माहिती पडताळून आणि सत्य परिस्थिती पाहण्यासाठी</u>

अ. सदर कायद्‌याच्या कलम 12 खालील अर्जात नमूद केलेल्या किंवा एकतर्फी अंतरिम आदेश दिला जावा म्हणून फॉर्म ३ मधील शपथपत्रात नमूद केलेली माहिती तपासून पाहण्यासाठी

आ. ज्याबाबत वादी आणि प्रतिवादींचा वाद आहे किंवा आरोप-प्रत्यारोप आहेत ते पडताळून पाहण्यासाठी

इ. ज्या अर्जामध्ये निवासाचा आदेश मागितला जातो अशा परिस्थितीत पीडिता सध्या कुठे राहत आहे ते तपासून पाहण्यासाठी

ई. राहण्याच्या व्यवस्थेबाबत - उदा. सामाईक घराचे स्वरूप (एकत्र कुटुंब) इ. ज्या निवासाच्या आदेशानुसार महिलेस सामाईक घरात, वेगळी व्यवस्था करून राहता येईल, यासाठी सामाईक घराच्या जागेचा आराखडा तयार करण्यासाठी

उ. पीडितेचे दागदागिने, इतर कागदपत्रे, वस्तू बाबत माहिती मिळविण्यासाठी

२. <u>घरातील परिस्थिती, तसेच घरातील व्यक्तींची माहिती मिळविण्यासाठी चौकशी करणे:</u>

अ. प्रतिवादींच्या राहणीमानाच्या दर्जाविषयी तपासणी करण्यासाठी

आ. मुलाचा ताबा देण्यासाठी, मुलाचे 'सर्वोत्तम हित' ठरविण्यासाठी

गृहभेटीचा आदेश देताना न्यायदंडाधिकाऱ्यांनी संरक्षण अधिकारी हे 'न्यायालयाचे अधिकारी' आहेत हे घरातील लोकांना समजेल असा स्पष्ट उल्लेख आदेशामध्ये करावा. त्याचप्रमाणे भेटीचा विशिष्ट हेतू; कोणाची, कोणती, कशाबद्दलची चौकशी करायची, कोणाशी बोलावे ह्याची नोंद असावी. तसेच संरक्षण अधिकाऱ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलिस त्यांच्या बरोबर जाणे गरजेचे असेल तर तसे वेगळे आदेश पोलिसांसाठीही द्यावे. पोलिसांनी कोणती मदत करावी ह्याचा उल्लेख असावा. गृहभेटीचा अहवाल कोणत्या तारखेपर्यंत सादर करावा ह्याचाही स्पष्ट उल्लेख असावा.

गृहभेटीचा अहवाल न्यायालयात सादर झाल्यावर तो पीडितेस आणि प्रतिवादीस पाहायला मिळतो. तथापि, न्यायदंडाधिकारी तो अहवाल असाधारण परिस्थितीत गुप्त ठेऊ शकतात. उदाः अहवालात मुलावरील लैंगिक अत्याचार प्रतिवादीने केल्याचे उघड झाले असल्यास.

**आ. आर्थिक परिस्थितीचा अहवाल:**

आर्थिक परिस्थितीचा अहवाल दाखल करण्यासाठी न्यायदंडाधिकारी संरक्षण अधिकाऱ्यांना प्रतिवादीची मिळकत, बँकखाती, मालमत्ता आणि अन्य कागदपत्रे याबाबत चौकशी करण्याचा निर्देश देऊ शकतात आणि त्याचा अहवाल सादर करण्यास सांगू शकतात. ही चौकशी दोन्ही पक्षांच्या मालमत्तेची पडताळणी करण्यासाठी तसेच त्यांच्या आर्थिक स्थितीचा अंदाज घेण्यास उपयोगी पडते. प्रतिवादीने आपली मालमत्ता विकून किंवा देऊन टाकू नये यासाठी त्याला प्रतिबंध करणे किंवा जर एकत्रित घरात राहण्याची विनंती केली असेल तर त्या दृष्टीने ही चौकशी विशेषतः महत्त्वाची आहे.

ही चौकशी करण्याबद्दल संरक्षण अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना दिल्यास त्यांना काम करण्याच्या दृष्टीने, पर्यायाने न्यायदंडाधिकाऱ्यांना अर्जदारास योग्य ते आदेश देण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरू शकते. एका न्यायदंडाधिकाऱ्यांनी प्रतिवादीच्या आर्थिक स्थितीचा अहवाल तयार करण्यासाठी संरक्षण अधिकाऱ्यांना खालील तक्त्याप्रमाणे माहिती गोळा करावी असा आदेश दिला:

**प्रतिवादीच्या आर्थिक स्थितीचा अहवाल**

प्रतिवादीचे नाव - दिनांक

पत्ता - केस क्र.

मोबईल नंबर -

| **अक्र.** | **आर्थिक पाहणी व जबाबदारी** | **तपशील** |
|---|---|---|
| १. | नोकरी व्यवसाय ठिकाण | |
| २. | नोकरीत मिळणारे मासिक उत्पन्न | |
| ३. | व्यवसायातून मिळणारे मासिक उत्पन्न | |
| ४. | शेती किती आहे | |
| ५. | शेतीचा प्रकार - बागायती, जिरायती | |
| ६. | शेतीपासून मिळणारे मासिक उत्पन्न | |
| ७. | संपत्तीतून मिळणारे एकूण उत्पन्न | |
| ८. | घरातील एकूण सदस्य | |
| ९. | घरातील एकूण कमावत्या व्यक्ती | |
| १०. | प्रतिवादीवर अवलंबून असलेल्या व्यक्ती | |
| ११. | घराचा प्रकार | |
| १२. | घरातील एकूण खोल्या व अंदाजे क्षेत्रफळ | |
| १३. | घर भाड्याने दिले आहे काय, असल्यास त्याचे उत्पन्न किती | |

मात्र वरील महिती मिळवणे अतिशय अवघड काम आहे. म्हणून न्यायदंडाधिकाऱ्यांनी प्रतिवादीच्या नोकरीच्या ठिकाणी मालकाने, बँक अधिकाऱ्यांनी, रेव्हेन्यू अधिकाऱ्यांनी संरक्षण अधिकाऱ्यांस आवश्यक तो तपशील द्यावा असा लेखी निर्देश आल्यास माहिती घेणे सुलभ होऊ शकते.

**इ. पीडितेच्या वैयक्तिक मालकीच्या वस्तूंचा ताबा परत मिळवणेबाबत:**

न्यायदंडाधिकारी संरक्षण अधिकाऱ्यांना स्त्रीधन, आणि/किंवा प्रमाणपत्रे, वस्तू, विम्याचे कागदपत्र, मुदत ठेवी आणि अशीच अन्य मालमत्ता, त्याची कागदपत्रे परत मिळवण्यासाठी निर्देश देऊ शकतात. संरक्षण अधिकाऱ्यांना अर्जदारास बरोबर घेऊन जाण्यास सांगावे.

न्यायदंडाधिकाऱ्यांनी ज्या वस्तूंचा ताबा मिळवायचा आहे त्या सर्व वस्तुंची यादी संरक्षण अधिकाऱ्यांना द्यावी. यादीत नसलेल्या वस्तू जर महिलेला प्रत्यक्ष पाहिल्यावर आठवल्यास आणि त्याबाबत जर काही मतभेद नसेल तर त्या यादीत घालाव्यात. त्या यादीची प्रत संरक्षण अधिकाऱ्यांना न्यायकक्षेत येणाऱ्या पोलिस चौकीत सादर करण्यास आणि त्याची पोचपावती घेण्यास सांगावे. जेणेकरून संरक्षण अधिकाऱ्यांवर, अर्जदारावर अतिक्रमण किंवा चोरी केल्याचा आरोप प्रतिवादी करू शकणार नाही व त्यांना संरक्षण मिळेल. यादीतील वस्तुंबद्दल वाद असल्यास तसा अहवाल न्यायालयात देण्यास सांगावे. संरक्षण अधिकाऱ्यांवर हिंसा होण्याच्या शक्यतेची शंका असल्यास पोलिसांनी त्यांच्याबरोबर जावे असा निर्देशही पोलिसांना द्यावा.

**ई. ताब्याच्या बाबतीत पीडितेस साहाय्य करण्याचे निर्देश:**

पीडितेस तिच्या मुलांचा ताबा परत मिळवण्यासाठी न्यायदंडाधिकारी संरक्षण अधिकाऱ्यांना निर्देश देऊ शकतात. अशा वेळेससुध्दा मुलांना प्रतिवादीच्या ताब्यातून हलवण्याचा प्रयत्न करताना पोलिसांनी संरक्षण अधिकाऱ्यांना मदत करावी, त्यांच्याबरोबर जावे असे आदेश द्यावे. मुलाचा ताबा अर्जदारास मिळाल्यावर तसा अहवाल सादर करण्यास संरक्षण अधिकाऱ्यांना सांगावे.

## ५.११ संरक्षण अधिकाऱ्यांची तपासणी:

एखाद्या पक्षास संपूर्ण संरक्षण अधिकाऱ्यांचा अहवाल किंवा त्यातील काही भाग न पटल्यास तो त्या अहवालास आव्हान देऊ शकतो. अशा परिस्थितीत न्यायदंडाधिकारी संरक्षण अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या गृहभेटीच्या, आर्थिक स्थितीच्या अहवालासंदर्भात त्यांची तपासणी करण्याची परवानगी देऊ शकतात.

## ५.१२ इतर मुद्दे:

अर्जाची सुनावणी सुरू व्हायच्या वेळेस इतरही अनेक मुद्दे लक्षात घेणे हे महिलांना न्याय मिळवून देण्याच्या दृष्टीने खूप महत्त्वाचे आहेत.

पीडिता जेव्हा न्यायालयात प्रथम येते तेव्हा ती घाबरलेली, दडपणाखाली असण्याची खूप शक्यता असू शकते. न्यायालयाचे वातावरण तिला अपरिचित असते. न्यायदंडाधिकाऱ्यांच्या कोर्टात बसावे का, कुठे बसावे, तेथील कामकाज कसे चालते, तिथे काय आणि कसे बोलावे ह्याची काहीच कल्पना तिला नसते. अशा पार्श्वभूमीवर तिला न्यायालयासमोर आपले

म्हणणे मांडता येण्यात अडचणी येऊ शकतात. म्हणून न्यायदंडाधिकाऱ्यांनी तिचा तणाव दूर करण्यासाठी, तिला मोकळेपणाने बोलते करण्यासाठी थोडे प्रोत्साहन द्यायला हवे. त्यांनी न्यायालयातील वातावरण मोकळे आणि स्पष्टपणे बोलण्याचे राहण्यासाठी प्रयत्न करायले हवे. कौटुंबिक हिंसेचे स्वरूप लक्षात घेता कडक शिस्तीने प्रक्रियेचे नियम लावणे हा उत्तम उपाय होऊ शकणार नाही.

| |
|---|
| सामाजिक संस्थेच्या कार्यकर्तीने सुनावणीच्या वेळेस अर्जदाराच्या शेजारी उभे राहण्याची न्यायदंडाधिकाऱ्यांकडे परवानगी मागितली. ती तिला देण्यात आली. अशा साध्या उपायांमुळेही पीडिता आपले म्हणणे नीट मांडू शकली. |

| |
|---|
| अर्जदाराला न्यायदंडाधिकाऱ्यांसमोर बोलण्याची फारच भीती वाटत होती. सामाजिक संस्थेच्या कार्यकर्तीने सुनावणीच्या वेळेस ती परिस्थिती सांगितली, आणि त्या महिलेची केस संस्थेमध्ये मी स्वतःच बघितली आहे, तेव्हा तिच्या वतीने मी बोलले तर चालेल का अशी परवानगी मागितली.  न्यायदंडाधिकाऱ्यांनी ती तिला दिली. |

वरील दोन्ही उदाहरणे ही प्रत्यक्षात घडलेली आहेत. म्हणूनच सदर कायद्याच्या कलम 28 (2) संदर्भातील वर केलेल्या चर्चेच्या अनुषंगाने ज्यामध्ये न्यायदंडाधिकाऱ्यांना स्वतःची प्रक्रिया राबवण्याचा अधिकार दिला आहे तो लक्षात घेऊन प्रक्रिया कोणती आणि कशी राबवायची ते न्यायदंडाधिकाऱ्यांनी ठरवायला हवे.

## ५.१३ न्यायालयास स्वतःची प्रक्रिया राबवण्याचे अधिकार कलम 28 (2):

### ५.१३.१ कलम 28. प्रक्रिया :

१. ह्या कायद्याच्या ज्या कलमांखाली विशिष्ट प्रक्रिया वापरायची आहे अशी तरतूद केली आहे  ती कलमे  सोडून, कलम 12, 18, 19, 20, 21, 22, आणि 23 खालील सुनावणी आणि कलम 31 मधील गुन्ह्याची सुनावणीसाठी सीआरपीसीतील तरतुदी लागू होतील.
२. उप-कलम (1) मधील तरतुदी कलम 12 किंवा कलम 23 (2) खालील अर्जाची सुनावणी करताना न्यायालयाला स्वतःची प्रक्रिया राबविण्यास प्रतिबंध करणार नाहीत.

कलम 28 (2) प्रमाणे न्यायालयावर सीआरपीसीच्या कलम 125 खालील किंवा इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदींखालील प्रक्रिया राबवण्याचे बंधन नाही तर न्याय्य अशी स्वतःची प्रक्रिया राबविण्याचा अधिकार आहे.[15] त्यामागचे मूळ तत्त्व हे प्रक्रियेच्या कडक औपचारिकतेत अडकून न पडता, जलद पद्धतीने कौटुंबिक प्रश्न कसे सोडवले जातील हे बघणे हेच आहे.

अणीबाणीची वेळ असेल आणि पीडितेला तातडीने आदेश देणे जरुरीचे असेल तेव्हा दोन्ही पक्षांना आपले म्हणणे शपथ पत्रातून मांडण्यास सांगणे, नोटीस बजावण्यासाठी संरक्षण अधिकाऱ्यांशिवाय इतरांचा उपयोग, तसेच इतर मार्गांचाही उपयोग करणे, पिडीतेला वळोवेळी तिच्या हक्कांची माहिती देणे, अर्जाची सुनावणी सुरु असताना, सामाजिक संघटनाच्या सेवेची जरूर तिथे मदत घेणे इत्यादी वेळेस आणि जिथे जिथे इतर ठिकाणी योग्य वाटेल तिथे तिथे कलम 28 (2) चा उपयोग न्यायदंडाधिकाऱ्यांनी जरूर करायला हवा.

## ५.१४ गोपनीय (इन कॅमेरा) सुनावणी:

सदर कायद्याच्या कलम 16 प्रमाणे न्यायदंडाधिकाऱ्यांना एखाद्या अर्जातील परिस्थिती पाहता आणि एखाद्या पक्षकाराने विनंती केल्यास ते अर्जाची सुनावणी गोपनीय पद्धतीने (इन कॅमेरा) घेऊ शकतात. तशी सुनावणी काही वेळेस किंवा पूर्ण वेळेस घेता येऊ शकेल. कुटुंबांतर्गत घडलेल्या काही प्रसंगांचे तपशील मुक्त न्यायालयासमोर सांगणे कठीण असू शकते. उदा. लैंगिक छळ, घरातील लहान मुलावरील लैंगिक अत्याचार, एखादा साक्षीदार खुल्या न्यायालयात बोलायला कचरत असेल इत्यादी.

मात्र  गोपनीय सुनावणी ही शक्यतो अपवाद म्हणूनच वापरली जावी. कारण मुक्त, खुल्या आणि पारदर्शक वातावरणात न्यायदान व्हावे ह्या तत्त्वाला ती मारक आहे. अर्थातच गोपनीय सुनावणीमुळे फायदा जास्त होणार असेल तर त्याचा विचार नक्कीच प्राधान्याने व्हायला हवा.

---

[15] *Sagar Shendge* Vs. *Naina Shendge* MANU/MH/0295/2013 decided on 4th March 2013

## ५.१५ पुराव्याची जबाबदारी:

सदर कायद्याच्या कलम 3 च्या स्प्ष्टीकरण II मध्ये पुढील तरतूद आहे:

> 'प्रतिवादीने कोणतीही केलेली किंवा न केलेली कृती ही कौटुंबिक हिंसा आहे का हे ठरविण्यासाठी एकूणच परिस्थिती आणि तपशील ह्यांचा विचार लक्षात घ्यायला हवा.'

त्यामुळे दोन्ही पक्षांवर आपापले म्हणणे सिध्द करण्याची जबाबदारी असते. सदर कायदा हा दिवाणी कायदा असल्यामुळे 'संभवनीयतेचे संतुलन' (बॅलन्स ऑफ प्रॉबॅबिलीटी) हे तत्त्व लागू होते. वर्णन केलेली परिस्थिती असण्याची शक्यता निर्माण करणे हे आपले म्हणणे सिद्ध करण्याच्या दृष्टीने पुरेसे असते. पुराव्याचा दर्जा दिवाणी दाव्यामध्ये कमी दर्जाचा असतो. फौजदारी खटल्याप्रमाणे 'शंकेपलीकडे' सिद्ध करणे जरूरीचे नसते.[16] समंजस माणसाला पटेल असे दाखवता आले की पुरेसे असते. एखाद्याच्या सदसद्विवेक बुध्दिचे समाधान झाले आणि पटले की तो पुरावा योग्य आहे असे म्हणता येते. महिलांवरील कौटुंबिक हिंसेच्या संदर्भात समंजस माणसाने तिची वास्तवता, लिंगभावाच्या नजरेतून पाहायला हवी. म्हणूनच न्यायदंडाधिकाऱ्यांनी सामाजिक वास्तव काय आहे, स्त्रियांना घरात मिळणारी भेदभावाची वागणूक, त्यांना सत्तेत नसलेले स्थान, त्यांच्यावर सतत असणारा दबाव ह्या साऱ्याचा विचार करून कौटुंबिक हिंसा झाली का ते ठरवायला हवे. पीडितेचा हिंसेकडे बघण्याचा दृष्टिकोन आणि इतक्या हिंसक परिस्थितीतही ती का राहत असेल हे समजून घ्यायला हवे. एकतर तिच्याजवळ पर्याय नसेल किंवा तिला सासरच्या घरी राहणे जास्त योग्य वाटत असेल. एकदा लग्न झाल्यावर माहेरी तिचे कायमचे परत येणे स्वागतार्ह नसते हेही समजून घ्यायला हवे.

## ५.१६. न्यायालयीन आदेश:

दोन्ही पक्षांचे म्हणणे न्यायालयासमोर मांडून झाले, पुरावा देऊन झाला, विवाद (आर्ग्युमेंटस) करून झाला की अर्जाची सुनावणी संपते. समोर आलेल्या पुराव्यानुसार निर्णय देताना पीडितेने आपले म्हणणे सिद्ध केले आहे असे न्यायदंडाधिकाऱ्यांचे मत झाल्यास तिने कोणते आदेश मागितले आहेत हे पाहून त्याप्रमाणे निर्णय द्यायला हवा. सदर कायद्याच्या

---

[16] *XXX* Vs. *ABC* MANU/MH/0882/2016 decided by Bom HC 2nd March 2016

कलम 18 ते 22 मध्ये पाच आदेश - संरक्षणाचा, राहण्याचा, आर्थिक, नुकसान भरपाईचा आणि मुलांच्या ताब्याचा आदेश सांगितले आहेत, ते बघावे. त्यासंबंधीची माहिती आधी लिहिलेल्या 'न्यायालयीन कारवाई चालू असतानाचा टप्पा' इथे दिली आहे. इथे प्रत्येक आदेशाबद्दल विस्ताराने जाणून घेऊ या. आदेश लिहिताना पुढे वर्णन केल्याप्रमाणे प्रत्येक आदेश अत्यंत काळजीपूर्वक, स्पष्ट, निःसंदिग्ध असा द्यावा. आदेशाची प्रत दोन्ही पक्षांना मोफत द्यावी. दोघांनाही आदेश समजावून सांगावा. प्रतिवादीस 'आदेशाची अंमलबजावणीची तुझ्यावर जबाबदारी आहे, आदेशाप्रमाणे न वागल्यास फौजदारी कारवाई होऊ शकते', अशी समज द्यावी. तसेच अर्जदारासही आदेशाची अंमलबजावणी प्रतिवादीने न केल्यास किंवा विरोध केल्यास त्याच्यावर संरक्षण अधिकाऱ्यांच्या मदतीने फौजदारी कारवाई करता येऊ शकते हे सांगावे.

अंमलबजावणीची जबाबदारी संरक्षण अधिकाऱ्यांना किंवा पोलिसांना दिली असेल तर त्यांच्याकडे आदेशाची प्रत देऊन त्यांनी काय, कोणती आणि कशी कामे करावीत ह्याचा स्पष्ट उल्लेख आदेशात असावा. पुढील प्रत्येक आदेशाबद्दल आणि पुन्हा आदेशांची अंमलबजावणी करतानाही कोणते आदेश द्यावे हे लिहिले आहे, ते काळजीपूर्वक बघावे. अन्यथा आदेश संदिग्ध किंवा अपुरे असतील तर संरक्षण अधिकाऱ्यांना पुन्हा न्यायालयाला वेगळे आदेश देण्याची विनंती करण्याशिवाय पर्याय राहणार नाही. त्यामुळे आदेशाची अंमलबजावणी होण्यास दिरंगाई होईल, पर्यायाने पीडितेला अजून त्रास सहन करावा लागेल. हे टाळण्यासाठी आदेश लिहिताना जास्तीत जास्त खबरदारी घ्यावी.

## ५.१६.१ सदर कायद्याचे कलम 18 - संरक्षणाचा आदेश

- संरक्षणाचा आदेश म्हणजे 'हिंसा थांबवा' आदेश, म्हणजेच शारीरिक, भावनिक, आर्थिक किंवा लैंगिक अशी कोणत्याही प्रकारची हिंसा थांबवा असा आदेश.
- त्याचा फक्त चालू असलेली हिंसा थांबवण्याशी संबंध नसून कोणत्याही प्रकारची हिंसा पुन्हा होऊ नये, किंवा होऊच नये याच्याशी असतो.
- कलम 18 मध्ये विशेषत्वाने लिहिलेले उदाः प्रतिवादीने कौटुंबिक हिंसा थांबवावी 18 (a), कौटुंबिक हिंसा करणाऱ्याला मदत किंवा प्रोत्साहन देऊ नये 18 (b), पीडितेच्या कामाच्या ठिकाणी जाऊ नये 18 (c), कोणत्याही प्रकारे पीडितेशी संवाद साधण्याचा प्रयत्न करू नये 18 (d), न्यायदंडाधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकारच्या संपत्तीचे हस्तांतरण करू नये, बँकेतील खाते वापरू नये 18 (e), पीडितेच्या नातेवाईकावर किंवा तिला मदत करणाऱ्यावर हिंसा करू नये 18 (f) असे कोणतेही

आदेश न्यायदंडाधिकारी देऊ शकतात. त्यापैकी काही फॉर्म २ च्या अनुक्रमांक ३(१) मध्ये दिले आहेत, ते बघावे. परिशिष्ट ३

- हिंसेच्या कृतीविषयीचे विशेष आदेश जे फॉर्म २ च्या अनुक्रमांक ३ (१) मध्ये दिलेले नाहीत त्यांचीसुध्दा 'अन्य इतर आदेशात' गणना होऊ शकते.

सदर कायद्याच्या कलम 3 चा कौटुंबिक हिंसेच्या व्याख्येचा संदर्भ घ्यावा. त्यामुळे **सर्व प्रकारच्या - शारीरिक, मानसिक, भावनिक, आर्थिक, लैंगिक हिंसेसाठी संरक्षणाचा आदेश** देणे जरूरीचे आहे हे लक्षात येईल. **विशेषतः आर्थिक हिंसा होत असल्यासही संरक्षणाचा आदेश, तसेच मुलांच्या ताब्याचा आदेश देतानाही संरक्षणाचा आदेश दिलाच पाहिजे.** (त्याची कारणे आधी दिली आहेत ती बघावी.)

आदेश देण्याअगोदर दोन्ही बाजूंना आणखीन काही सांगायचे असल्यास बोलण्याची संधी द्यावी. त्यामुळे नैसर्गिक न्यायाचे तत्त्व पाळले असे होईल. अर्थात एकतर्फी निर्णय देताना हा प्रश्न येत नाही. एकदा संरक्षणाचा आदेश दिल्यानंतर पीडिता तो मागे घ्यावा अशी विनंती करत नाही तोपर्यंत तो लागू राहील (कलम 28(2)) ह्याचा उल्लेख आदेशात करावा.

**संरक्षण आदेशाची काही उदाहरणे:**

१. अर्जदारास शारीरिक मारहाण करू नये. टोमणे मारू नयेत
२. अर्जदारास नोकरीच्या ठिकाणी जाण्यापासून प्रतिवादीने रोखण्यास बंदी
३. प्रतिवादीने कोणत्याही प्रकारे अर्जदाराशी संपर्क साधण्यास बंदी - फोन, पत्र, इ-मेल किंवा प्रत्यक्ष भेटून
४. प्रतिवादीने अर्जदाराचे स्त्रीधन, कपडे, दागिने, कागदपत्रे तिला परत देणे

## ५.१६.२ सदर कायद्याचे कलम 19 - निवासाचा आदेश

सदर कायद्याच्या कलम 19 अन्वये कौटुंबिक नातेसंबंधातील प्रत्येक महिलेस ती ज्या घरात राहते त्या घरावर तिचा हक्क, तिचे नाव, किंवा मिळणारा लाभ असेल किंवा नसेल तरीही तिथे राहण्याचा हक्क तिला आहे.

अशा एकत्रित घरात तिला प्रवेशास मनाई केली किंवा त्या घरातून तिला बाहेर काढले असेल तर ती आर्थिक हिंसा होते, म्हणजेच कौटुंबिक हिंसा होते. कलम 3(iv)(c).

ही तरतूद करण्यामागचे कारण आपल्याला समाजात असलेल्या पुरुषप्रधानतेत, पितृसत्तेत दिसते. स्वतःचे किंवा भाड्याचे घर सहसा घरातील मुख्य व्यक्तीच्या - म्हणजेच पुरुषाच्या

नावे असते. एखाद्या व्यक्तीस कुटुंबात राहू द्यायचे की नाही हे तो पुरुष ठरवतो. ह्या परिस्थितीत स्त्रिया सर्वात जास्त असहाय असतात. लग्नाअगोदर वडील, ते नसल्यास भाऊ ह्यांच्या दृष्टीने मुलीने काही चुकीचे वर्तन केल्यास (उदा. मनपसंत व्यक्तीशी लग्न ठरवल्यास) तिला घरातून बाहेर काढतात; तर तिचा विवाह झाल्यावर सासरचे घर तिचे नाही असे समजून तिला सासरच्यांकडून - पतीकडून, त्याच्या इतर नातेवाईकांकडून, ती चुकीची वागली आहे (उदाः तिने हुंड्याची मागणी पुरी केली नाही, इतर पुरुषांशी बोलली वगैरे) म्हणून घरातून हाकलले जाते. ह्याचा विचार करून हिंसा झाल्यावर ज्या सामाईक घरात ती राहत होती आणि जरी ते तिच्या किंवा तिच्या नवऱ्याच्या नावे नसले तरी तिथे तिला राहण्याचा हक्क आहे अशी तरतूद **सदर कायद्यात** करण्यात आली आहे.[17]

अर्थात कौटुंबिक नातेसंबंधातील **कुठल्याही** स्त्रीस सामाईक घरातून काढता येणार नाही ही तरतूदही आहे. म्हणजेच जर प्रतिवादी स्त्री असली तर तिलाही घरातून काढता येणार नाही. ही तरतूद महत्त्वाची आहे कारण पुरुषप्रधान, पितृसत्ताक समाजरचनेतील स्त्रीची असहायता लक्षात घेऊन ती केली आहे हे स्पष्ट होते. त्यामुळे प्रत्येक स्त्रीला सामाईक घरात राहण्याचा अधिकार आहे यास पुष्टी मिळते.

हा निवासी हक्क अर्थपूर्ण रीतीने बजावला जावा यासाठी पीडिता संरक्षण आदेशाची मागणी करू शकते.

**सदर कायद्याच्या कलम 19 मध्ये खालील बाबींचा समावेश होतोः**

19(1) न्यायदंडाधिकारी अर्जदारास निवासाचा आदेश देऊ शकतात आणि प्रतिवादीस किंवा त्याच्या नातेवाईकांसाठी खालील आदेश देऊ शकतात:

19(1)(a): प्रतिवादी कायदेशीररित्या घराचा मालक / भाडेकरू किंवा अन्य काही असला किंवा नसला तरी पीडितेला सामाईक घरातून हाकलायचे नाही.

19(1)(b): प्रतिवादीने सामाईक घरात न राहता दुसरीकडे राहायला जायचे.

19(1)(c): पीडिता राहात असलेल्या सामाईक घराच्या कुठल्याही भागात प्रवेश करायचा नाही

19(1)(d): सामाईक घरातून वेगळे काढणे, किंवा ते विकून टाकणे किंवा ते गहाण टाकणे हे करायचे नाही

19(1)(e): स्वतःचा सामाईक घरावरील अधिकार सोडून द्यायचा नाही

---

[17] *Rajkumar Pandey* Vs. *Housewife* (https://indiankanoon.org/doc/1625010/) decided by Bob HC on 26th August 2008

19(1)(f): पीडितेसाठी राहण्याची सामाईक घरासारखीच पर्यायी व्यवस्था करावी किंवा परिस्थितीप्रमाणे भाड्याचे घर घेण्यासाठी भाडे द्यावे

19(2): ह्याशिवाय न्यायदंडाधिकारी कौटुंबिक हिंसेपासून पीडितेचे, तिच्या मुलांचे संरक्षण व्हावे म्हणून इतरही आदेश देऊ शकतात.

19(3): कौटुंबिक हिंसेस प्रतिबंध व्हावा म्हणून प्रतिवादीने तारणासहीत किंवा तारणाशिवाय हमीपत्र लिहून द्यावे.

19(5) (7): त्याचमाणे न्यायदंडाधिकारी त्यांच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी आणि अर्जदारास संरक्षण द्यावे यासाठी पोलिस अधिकाऱ्यांना आदेश देऊ शकतात.

19(6): आर्थिक गरजा आणि साधनांची परिपूर्ती करण्यासाठी प्रतिवादीस भाड्याबरोबरच पैसे देण्याचा आदेशही न्यायदंडाधिकारी देऊ शकतात.

19(8): प्रतिवादीने अर्जदाराचे स्त्रीधन, तिची संपत्ती तिला परत करावी असा आदेश न्यायदंडाधिकारी देऊ शकतात.

कलम 19 खूपच विस्ताराने सर्व बाजूंनी विचार करून लिहिले आहे असे आपल्या लक्षात येते. त्यातील सर्व उप-कलमांमधील तरतुदी लक्षात घेऊन निवासाचा आदेश दिल्यास पीडितेला तिच्या घरात जाऊन राहण्याचा हक्क प्रस्थापित होण्यास नक्कीच मदत होईल. वास्तवातील अनुभव लक्षात घेता, पोलिसांना दिल्या जाणाऱ्या निर्देशांमध्ये गरज असल्यास, घराला कुलूप असल्यास ते तोडून पीडितेला घरात प्रवेश करण्यास साहाय्य करा असा उल्लेख असावा.

पोलिसांबरोबरच संरक्षण अधिकाऱ्यांनाही निवासी आदेशाच्या अंमलबजावणीचे आदेश द्यावे. ह्याबद्दल पुढे विस्ताराने लिहिले आहे.

### ५.१६.३ सदर कायद्याचे कलम 20 - आर्थिक आदेश

**आर्थिक आदेशासंदर्भात नोंद घेण्यासारखे महत्त्वाचे मुद्दे**

- कौटुंबिक हिंसेमुळे होणाऱ्या आर्थिक नुकसानीविषयी सदर कायदा संवेदनशील आहे.
- कौटुंबिक हिंसेच्या व्याख्येनुसार (कलम 3), आर्थिक नुकसान किंवा वंचितता ही आर्थिक हिंसा आहे आणि म्हणूनच कौटुंबिक हिंसाही आहे.
- पीडितेस आणि तिच्या मुलांना आर्थिक हिंसेपासून म्हणजेच कौटुंबिक हिंसेपासून संरक्षण देण्यासाठी आर्थिक साहाय्याचे आदेश दिले जातात.

सदर कायद्याच्या कलम 20 (1) नुसार न्यायदंडाधिकारी अर्जदारावर प्रतिवादीने केलेल्या कौटुंबिक हिंसेमुळे खालील बाबींसाठी त्यास आर्थिक साहाय्य देण्याचे आदेश देऊ शकतात, मात्र ते तेवढ्याच मुद्द्यापर्यंत मर्यादित नाहीत. -

20(1)(a): हिंसेच्या परिणामांमुळे पीडिता नोकरीवर जाण्यास असमर्थ असल्यामुळे रोजगार गेल्यास

20(1)(b): हिंसेच्या परिणामांमुळे पीडितेवर वैद्यकीय उपचार घेण्याची वेळ आल्यास त्या उपचारासाठी

20(1)(c): हिंसेच्या परिणामांमुळे तिच्या मालमत्तेचे नुकसान, तोटा झाल्यास तो भरून काढण्यासाठी पीडितेकडून कोणतीही मालमत्ता काढून घेतल्यामुळे आर्थिक नुकसान झाल्यास[18] किंवा सुरक्षेचे उपाय योजण्यामुळे आलेला खर्च – उदाः सुरक्षित जागी प्रवास करून जाणे, हॉटेलात राहणे, आणि फोन करणे यावरील खर्च झाले असल्यास

20(1)(d): वैयक्तिक कायद्यासह अन्य कुठल्याही कायद्याखाली, किंवा फौजदारी प्रक्रिया संहितेच्या (सीआरपीसी) कलम 125 खाली पीडितेस[19] आणि तिच्या मुलांस पोटगी मिळत असली किंवा तसा आदेश मिळाला असला, तरी देखील ह्या कायद्याखाली पोटगीसाठी

20(2): आर्थिक आदेशातील रक्कम ही पुरेशी, वाजवी आणि पीडितेच्या राहणीमानानुसार असायला पाहिजे.

20(3): प्रतिवादीच्या परिस्थितीनुसार पोटगी एकरकमी की दरमहा द्यायला हवी ते ठरवण्याचा अधिकार न्यायदंडाधिकाऱ्यांना आहे.

20(4): न्यायदंडाधिकाऱ्यांनी आर्थिक आदेशाची एक प्रत ज्या क्षेत्रात प्रतिवादी राहत असेल तिथल्या पोलिस अधिकाऱ्यांना पाठवावी.

20(5): न्यायदंडाधिकाऱ्यांनी आदेशामध्ये पोटगी कोणत्या विशिष्ट वेळेत भरायला पाहिजे त्याचा उल्लेख केला पाहिजे आणि प्रतिवादीने ती त्याप्रमाणे द्यायला हवी.

20(6): प्रतिवादीने जर पोटगीची रक्कम आदेशप्रमाणे भरली नाही तर न्यायदंडाधिकारी प्रतिवादीस ज्याने नोकरीस ठेवले आहे त्या मालकाला प्रतिवादीच्या पगारातून परस्पर पैसे कापून अर्जदारास देण्याचा किंवा न्यायालयात भरण्याचा आदेश देऊ शकतात किंवा प्रतिवादीला कोणाकडून पैसे येणे असल्यास त्या व्यक्तीस त्याच्या देय रकमेतून परस्पर पैसे कापून अर्जदारास देण्याचा किंवा न्यायालयात भरण्याचा आदेश देऊ शकतात.

---

[18] *Manda Tahore* Vs. *Ramji Tahore* MANU/MH/0427/2010

[19] *Chandmuniya* Vs. *Virendrakumar Singh Kushvah* (2011) 1 SCC 141; *Pratibha Andhare* Vs. *Bapusaheb Andhare* I (2013) DMC 530

वरील तरतुदीप्रमाणे न्यायदंडाधिकाऱ्यांनी आर्थिक आदेश सर्व बारकाव्यासकट दिल्यास - विशेषतः किती रक्कम, पैसे देण्याची पध्दत, कोणत्या तारखेला इत्यादी तपशील नमूद केल्यास आदेशाची अंमलबजावणी आणि पीडितेच्या हातात प्रत्यक्षात पोटगी पडणे शक्य होईल. पोटगीच्या इतर कायद्यातील तरतुदींपेक्षा ही तरतूद जास्त न्याय्य असल्यामुळे पोटगीची वसूली करणे शक्य होईल.

## ५.१६.४ सदर कायद्याचे कलम 21 - ताबा आदेश

सदर कायद्याच्या कलम 2(b) अन्वये कोणतीही अठरापेक्षा कमी वयाची व्यक्ती बालक आहे. पीडितेच्या दत्तक, सावत्र, किंवा मानलेल्या बालकांचा त्यात समावेश होतो.

सदर कायद्यामधील कलम 21 अन्वये खालील इतर कोणत्याही कायद्यातील तरतुदी काहीही असल्यातरी कलम 12 खालील अर्जाच्या सुनावणीच्या कोणत्याही टप्प्यावर मुलांचा तात्पुरता ताबा अर्जदारास देण्याचा आणि प्रतिवादीस मुलांना भेटू देण्याचा आदेश न्यायदंडाधिकारी देऊ शकतात. मात्र जर न्यायदंडाधिकाऱ्यांना असे वाटले की प्रतिवादीने मुलांना भेटणे मुलांच्या हिताच्या दृष्टीने अपायकारक आहे तर न्यायदंडाधिकारी भेटींची परवानगी नाकारू शकतात.

कलम 21 मागील उद्देश मुलांचे कौटुंबिक हिंसेपासून संरक्षण करणे, पीडितेने कुटुंबाच्या हिंसक नातेसंबंधात राहून छळ सहन करावा यासाठी विशेषतः मूल तान्हे असल्यास किंवा त्याच्या सुरक्षिततेबद्दल खात्री वाटत नसल्यास मुलांच्या ताब्याचा आदेश एकतर्फी देण्याचे प्रसंग येऊ शकतात. समोर आलेल्या मुलांचा एखाद्या साधनासारखा वापर केला जाऊ नये, त्यांना वेठीस धरता येऊ नये हा आहे. मूल प्रतिवादीच्या ताब्यात असल्यास किंवा त्याने जबरदस्तीने पळवून नेलेले असल्यास,परिस्थितीनुसार आणि माहितीनुसार तातडीने असा निर्णय द्यावा लागल्याचा अनेक वेळेस अनुभव येतो.

पीडितेस मुलांचा तात्पुरता ताबा कलम 21 अन्वये दिला जातो. कायमस्वरूपी ताबा मिळवण्याकरता ह्या कायद्यात तरतूद नाही. त्यासाठी पीडितेस 'पालकत्व आणि पाल्य कायदा' (गार्डियनशिप अ‍ॅड वॉर्डस अ‍ॅक्ट) किंवा व्यक्तिगत कायद्याची मदत घ्यावी लागते.

तात्पुरत्या ताब्याचा निर्णय ठरवताना न्यायदंडाधिकाऱ्यांनी मुलांचे 'सर्वोत्तम हित' कशात आहे त्याचा विचार करावा. 'सर्वोत्तम हिताचे' निकष विचारात घेताना मुलांच्या मनो-शारीरिक निरोगी वाढीसाठी आणि निगेसाठी जे घटक आवश्यक आहेत त्यांचा अधिक विचार केला जावा, मात्र आईच्या आर्थिक आणि भौतिक बाबींचा विचार करू नये.

‘लॉयर्स कलेक्टिव’ (नवी दिल्ली) संस्थेने संरक्षण अधिकाऱ्यांसाठी तयार करून प्रकाशित केलेल्या हस्तपुस्तिकेतील मुलाच्या ‘सर्वोत्तम हिताचे’ मूल्यमापन करणाऱ्या प्रश्नांची यादी खाली दिली आहे. त्याचा उपयोग करून ‘सर्वोत्तम हित’ चांगल्या पद्धतीने ठरवता येईल.

- मुलाच्या कल्याणाची अधिक चांगली काळजी आणि विचार कोण करेल?
- मूल अधिक आनंदात कुठे असणे शक्य आहे?
- मुलाच्या मानसिक आणि शारीरिक विकासाची आणि सुखाची काळजी अधिक चांगली कोण घेऊ शकतो?
- अधिक चांगले शिक्षण देण्याची आणि अहोरात्र मुलाची जोपासना करण्याची इच्छा, निश्चय, कल्पना आणि क्षमता कोणात आहे?
- मुलास प्रेम, माया, काळजी, समुपदेशन, आणि संरक्षण हवे असते तेव्हा त्याला कोण जवळ असावे असे वाटते?

हा आदेश दिल्यानंतर त्याची प्रत संरक्षण अधिकाऱ्यांना देऊन अंमलबजावणी करण्यास सांगावे. मुलांचा ताबा घेण्यासाठी प्रतिवादीच्या घरी गेल्यावर घरातल्यांच्याकडून विरोध होण्याची शक्यता असल्यास पीडितेच्या, मुलाच्या आणि संरक्षण अधिकाऱ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलिसांनाही बरोबर जाण्याचा आदेश द्यावा आणि लागेल ती मदत करण्यास सांगावे.

## ५.१६.५ सदर कायद्याचे कलम 22 - भरपाईचा आदेश

पीडितेस शारीरिक इजा, मानसिक छळ, आणि अन्य भावनिक त्रासांमुळे जी वेदना सहन करावी लागते त्याची भरपाई करून घेण्याच्या पीडितेच्या हक्काची दखल सदर कायद्याच्या कलम 22 अन्वये घेतली आहे. कौटुंबिक हिंसेमुळे पीडितेचे आर्थिक नुकसानाशिवाय जे इतर नुकसान होते ते काही प्रमाणात तरी भरून निघावे म्हणून आर्थिक आदेशाबरोबरच नुकसान भरपाईचाही आदेश देता येतो. आर्थिक आदेश (कलम 20) आणि नुकसान भरपाईचा आदेश (कलम 22) ह्या दोन वेगवेगळ्या तरतुदी आहेत. पीडितेने अन्य कोणत्याही दिवाणी, किंवा इतर कोणत्याही कायद्याखाली केलेल्या दाव्याव्यतिरिक्त ह्या दाव्यासाठी तिला अर्ज करता येतो. समोर आलेल्या पुराव्यावरून पीडितेला किती प्रमाणात इजा झाली आहे, तसेच परिस्थितीचे मूल्यमापन करून, पीडितेला अन्य दिवाणी किंवा इतर कोणत्याही कायद्याखाली पोटगी, नुकसान भरपाई मिळाली आहे का, असल्यास किती ह्याची फॉर्म २ च्या अनुक्रमांक ४ मध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे खात्री करून किंवा तशी माहिती दिली नसल्यास त्याबाबतची चौकशी करून नंतरच न्यायदंडाधिकाऱ्यांनी कलम 20 आणि/किंवा कलम 22 खालील रक्कम ठरवावी. ती कोणत्या तारखेला, कुठे, कशी जमा करावी ह्याबद्दलही स्पष्ट उल्लेख आदेशामध्ये करावा.

### ५.१६.६ सदर कायद्याचे कलम 23 - अंतरिम आणि एकतर्फी आदेश:

सदर कायद्याचे कलम 23 न्यायदंडाधिकाऱ्यांना अंतरिम आणि एकतर्फी आदेश देण्याचे अधिकार देते.

(१) न्यायदंडाधिकाऱ्यांसमोर चालत असलेल्या कोणत्याही दाव्यात ते त्यांना न्याय्य आणि योग्य वाटेल ते अंतरिम आदेश देऊ शकतात.

(२) न्यायदंडाधिकाऱ्यांना सकृद्दर्शनी प्रतिवादी एकतर्फी कौटुंबिक हिंसा करत आहे, केली आहे किंवा करण्याची शक्यता आहे असे पटल्यास, आणि अर्जदाराने कलम 18 ते 22 संदर्भात तसे शपथपत्र दाखल केले असल्यास, ते एकतर्फी आदेश देऊ शकतात.

सदर कायदा हा दिवाणी स्वरूपाचा कायदा आहे. त्यातील अनेक आदेश प्रतिवादीला भविष्यात हिंसेची कृती करण्यास मनाई किंवा प्रतिबंध करण्याच्या स्वरूपाचे आहेत. पीडितेस आणि तिच्या मुलांना दाव्याच्या काळात कौटुंबिक हिंसेपासून अपाय होऊ नये म्हणून त्याचा प्रतिबंध करण्यासाठी अंतरिम आदेशाची तरतूद आहे. अंतरिम आदेश म्हणजे अर्जाची सुनावणी चालू असतानाच्या काळात दिलेला आदेश. ह्या आदेशामुळे पीडितेस न्यायालयीन कारवाई सुरू असताना हिंसामुक्त परिस्थितीत कारवाईला सामोरे जाण्यास साहाय्य होऊ शकते. अंतरिम, एकतर्फी आदेश तातडीने आणि अणीबाणीच्या काळात मनाई करणारे असल्यामुळे सदर कायद्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत.

(अंतरिम आदेश, एकतर्फी आदेश, अंतरिम एकतर्फी आदेश ह्याबद्दल आधीही चर्चा केली आहे, ती जरूर बघावी. ह्या आदेशांचे अनन्यसाधारण महत्त्व लक्षात घेऊन थोड्या पुनरुक्तीचा धोका पत्करून पण वाचण्याच्या दृष्टीने सोयीचे व्हावे म्हणून पुढील लिखाण केले आहे).

पीडितेने कलम 12 खालच्या अर्जाबरोबर अंतरिम / एकतर्फी अंतरिम आदेशाची मागणी/विनंती केली असल्यास, आणि अर्जाबरोबर सदर नियमांखालील नियम 6(4) आणि नियम 7 अंतर्गत विहित केलेल्या फॉर्म ३ प्रमाणे शपथपत्र जोडले असल्यास त्यावर तातडीने निर्णय देणे हे तिच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे हे समजून घेणे फार फार जरूरीचे आहे. त्यासाठी स्वतंत्र अर्जाची आवश्यकता नाही,[20] हेही लक्षात ठेवायला हवे. मात्र अंतरिम/ एकतर्फी अंतरिम आदेश देण्याअगोदर न्यायालयाला काही खुलासा हवा असेल तर सदर नियमांखालील नियम 10(1)(a) प्रमाणे न्यायदंडाधिकारी संरक्षण अधिकाऱ्यांस पीडिता ज्या सामाईक घरात प्रतिवादी बरोबर राहत असेल त्या घराला भेट

[20] *Vishal Damodar Patil* Vs. *Vishakha Vishal Patil* 2009 CrLJ 107

देऊन प्राथमिक चौकशी करण्याचे लेखी आदेश देऊ शकतात. चौकशीचा अहवाल सादर झाल्यानंतर अहवालातील मुद्द्यांना धरून न्यायदंडाधिकारी कोणते एकतर्फी अंतरिम आदेश द्यायचे किंवा नाही त्याबाबतचा निर्णय घेऊ शकतात. अंतरिम किंवा एकतर्फी अंतरिम आदेश दिल्यानंतर न्यायदंडाधिकारी संरक्षण अधिकाऱ्यांस तो अंमलात आणावा यासाठी निर्देश देऊ शकतात. (आदेश अंमलात कसे आणता येतील त्याची चर्चा पुढे केली आहे.)

मात्र असे एकतर्फी आदेश प्रत्यक्षात दिले जात नाहीत असे पुष्कळदा अनुभवास येते. त्यामुळे ह्या मुद्द्याकडे न्यायदंडाधिकाऱ्यांनी विशेष लक्ष द्यायला हवे हे अधोरेखित करावे असे वाटते. अर्ज वाचल्यावर सकृद्दर्शनी असे दिसून आले की प्रतिवादी कौटुंबिक हिंसा करत आहे किंवा तसे करण्याची शक्यता आहे, तसेच कौटुंबिक हिंसेची तीव्रता, न भरून येण्यासारखी इजा होण्याची शक्यता आणि इतर परिस्थिती लक्षात घेऊन, तातडीने एकतर्फी आदेश करण्याने अर्जदार पीडितेला नक्की मदत होईल असे आपल्या लक्षात आल्यास सर्वात प्रथम तसा आदेश करावा. अंतरिम आदेशामुळे पीडितेस (आणि तिच्या मुलांना) अर्जाच्या सुनावणीच्या काळात कौटुंबिक हिंसेपासून कोणताही अपाय होऊ नये म्हणून त्याचा प्रतिबंध करण्यासाठी अंतरिम आदेशाचा उपयोग होऊ शकतो. तसेच अंतरिम आदेशानंतर अर्जाची सुनावणी झाल्यावर गरजेप्रमाणे अंतरिम आदेशात बदल करता येऊ शकतो किंवा तो रद्दही करता येतो.

सदर कायदा हा दिवाणी कायदा असल्यामुळे प्रतिवादीला तुरुंगवासाची शिक्षा होण्याचा प्रश्न उद्भवत नाही. 'हिंसा थांबवा' ह्या आदेशामुळे प्रतिवादीचे नुकसान तर होत नाहीच पण अर्जदार पीडितेच्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण होऊ शकते, आपल्यावरील अन्यायाचे निराकरण होऊ शकते, न्यायालयीन यंत्रणेकडून तिला दिलासा मिळतो आहे असे वाटू शकते. ह्या साऱ्यामुळे तिचा कायदा आणि न्यायावरचा विश्वासही वाढू शकतो. पर्यायाने सदर कायद्याची उद्दिष्टेही साध्य होण्यास मदत होऊ शकते.

# ६.० न्यायालयाने आदेश दिल्यानंतरचा अंतिम टप्पा

## ६.१ आदेशांची अंमलबाजावणी

न्यायालयांनी आदेश दिल्यानंतर त्या आदेशांची अंमलबजावणी हे अतिशय महत्त्वाचे आहे आणि सर्वात आव्हानात्मक काम आहे. न्यायदंडाधिकाऱ्यांनी ह्या प्रक्रियेत संरक्षण अधिकाऱ्यांना जास्तीत जास्त सहभागी करून घेतले पाहिजे आणि त्यांच्यावर अंमलबजावणीची जबाबदारी दिली पाहिजे.

सदर नियमांखालील नियम 10(1)(d) अन्वये न्यायदंडाधिकारी संरक्षण आदेश, निवासाचा आदेश, आर्थिक साहाय्याचा आदेश, ताबा आदेश आणि भरपाईचा आदेश, ह्या आदेशांच्या अंमलबजावणीत साहाय्य करण्यासाठी संरक्षण अधिकाऱ्यांना लेखी आदेश देऊ शकतात. हे आदेश **एकतर्फी अंतरिम आणि/किंवा अंतरिम** म्हणून दिले जाऊ शकतात आणि सुनावणी पूर्ण झाल्यानंतर **अंतिम आदेश** दिले जातात.

या प्रत्येक आदेशाचे महत्त्व आधीच्या भागात स्पष्ट केलेच आहे.

ह्या टप्प्यात वरील प्रत्येक आदेशाची अंमलबजावणी कशी करता येईल हे बघू या. प्रत्येक अंतरिम किंवा अंतिम आदेश देताना त्यात संरक्षणाचा आदेशही द्यावा. आधी चर्चा केल्याप्रमाणे संरक्षणाचा आदेश कौटुंबिक हिंसा थांबवण्यासाठी दिला जातो आणि सर्व हिंसा ह्या कौटुंबिक हिंसेचाच भाग असल्यामुळे इतर कोणत्याही आदेशाबरोबर संरक्षणाचा आदेशही द्यायला हवा. प्रतिवादीने आदेशाची अंमलबजावणी न केल्यास त्याच्याविरुद्ध कलम 31 खालील कारवाई फक्त संरक्षणाचा आदेश असेल तरच करता येते. म्हणून संरक्षणाचा आदेश देणे महत्त्वाचे आहे.

न्यायदंडाधिकाऱ्यांनी आदेशाची प्रत अर्जदाराला, प्रतिवादीला, संरक्षण अधिकाऱ्यांना आणि पोलिसांना द्यावी. अर्जदारास आदेशाच्या अंमल बजावणीत काही अडचण आल्यास संरक्षण अधिकाऱ्यांना भेटून त्यांची मदत घेण्यास सांगावे. संरक्षण अधिकाऱ्यांना (आणि जरूर असेल तिथे पोलिसांना) आदेशाची प्रत देताना त्यांच्यावर आदेशाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी दिली आहे हे सांगावे. अंमलबजावणी केल्यानंतर त्याचा अहवाल न्यायालयात सादर करण्यासही सांगावे.

## ६.१.१ संरक्षण आदेशाची अंमलबजावणी:

न्यायदंडाधिकाऱ्यांनी संरक्षणाच्या आदेशाची - त्याबरोबरच दिलेल्या इतर प्रत्येक आदेशाची प्रत प्रतिवादीला देताना त्याला आदेश पाळणे का महत्त्वाचे आहे ते सांगावे. जर तो आदेशाविरुद्ध हिंसा करत राहिला तर त्याला तुरुंगवासाची आणि दंड अशी शिक्षा होऊ शकते हे सांगावे. अर्जदारास प्रत देताना प्रतिवादीने हिंसा केल्यास तिला संरक्षण अधिकाऱ्यांकडे किंवा पोलिसांकडे जाऊन मदत मागायला सांगावी आणि न्यायालयाच्या आदेशाचा भंग केल्यामुळे त्याच्यावर कलम 31 प्रमाणे फौजदारी खटला तिला दाखल करता येईल हेही सांगावे. संरक्षणाच्या आदेशाची प्रत संरक्षण अधिकाऱ्यांना आणि पोलिसांनाही द्यावी आणि आदेशानंतरही हिंसा झाल्यामुळे पीडिता पुन्हा त्यांच्याकडे आल्यास तिला योग्य ती मदत करावी असे आदेशात लिहावे. संरक्षण अधिकाऱ्यांना आदेशाची अंमलबजावणी करण्याचा आदेशही द्यावा. अंमलबजावणी केल्यानंतर त्याचा अहवाल संरक्षण अधिकाऱ्यांना न्यायालयात सादर करण्यास सांगावे.

## ६.१.२ निवासाच्या आदेशाची अंमलबजावणी:

न्यायदंडाधिकाऱ्यांनी निवासाच्या आदेशाची प्रत संरक्षण अधिकाऱ्यांकडे देताना त्यांनी पीडितेबरोबर तिला घरी सोडण्यास जावे, गरज असल्यास पोलिसांनाही बरोबर न्यावे असे सांगावे. तसे आदेशातही नमूद करावे. महिला प्रत्यक्ष घरात जाईपर्यंत संरक्षण अधिकाऱ्यांनी आणि पोलिसांनी तिथे थांबावे आणि घरातल्या लोकांनाही तिला शांतपणे घरात राहू देण्यास सांगायला सांगावे. अन्यथा पुढची फौजदारी कारवाई होऊ शकते ह्याची कल्पना द्यायला सांगावे. प्रतिवादीकडून किंवा घरात त्यावेळी उपस्थित असलेल्यांकडून महिलेस त्या निवासाचा/खोलीचा ताबा दिलेला आहे असे लिहून घ्यायला सांगावे. तसेच महिलेकडूनही तिला निवासाचा प्रत्यक्ष ताबा मिळालेला आहे असे लिहून घेण्यास संरक्षण अधिकाऱ्यांना सांगावे. घरास कुलुप असेल तर पोलिसांची मदत घेऊन ते तोडण्यास सांगावे आणि वर लिहिल्याप्रमाणे पुढील कारवाई करण्यास सांगावे. आदेशामध्ये स्पष्टपणे ह्या साऱ्या मुद्द्यांची नोंद करावी. महिलेसही वेळ आल्यास संरक्षण अधिकाऱ्यांची आणि पोलिसांची मदत घेण्यास सांगावे.

वरील सर्व काळजी घेऊनही प्रत्यक्षात तिथे राहणाऱ्या व्यक्तींनी महिलेस घरात येऊ देण्यास विरोध केला तर निवासाच्या आणि संरक्षण आदेशाचा भंग केल्याबद्दल संरक्षण अधिकाऱ्यांना कलम 31 आणि नियम 15 (7) खालील कारवाई करण्यास सांगावे. अंमलबजावणी केल्यानंतर त्याचा अहवाल संरक्षण अधिकाऱ्यांना न्यायालयात सादर करण्यास सांगावे.

## ६.१.३ आर्थिक साहाय्याच्या आणि नुकसान भरपाईच्या आदेशाची अंमलबजावणी:

आर्थिक साहाय्याचा आदेश देताना संरक्षणाचा आदेशही देणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे प्रतिवादीने आदेशाची अंमलबजावणी न केल्यास त्याच्याविरुद्ध कलम 31 आणि नियम 15 (7) खाली कारवाई करता येऊ शकेल.

सर्वसाधारणपणे आर्थिक साहाय्याच्या आदेशाचे पालन प्रतिवादी करत नाही असे अनुभवास येते. त्यामुळे अर्जदारास वसुलीसाठी पुन्हा न्यायालयात यावे लागते. त्यावेळेस न्यायदंडाधिकाऱ्यांनी संरक्षण अधिकाऱ्यांना खालीलपैकी कोणत्याही मार्गाने रक्कम वसूल करण्याचे निर्देश द्यावेत.

- प्रतिवादी जर नोकरी करत असेल आणि नोकरीच्या ठिकाणाचा पत्ता माहीत असेल तर प्रतिवादीच्या मालकास प्रतिवादीच्या पगाराच्या रकमेतून आदेशात लिहिल्याप्रमाणे पैसे कापून ते परस्पर पीडितेच्या बँक खात्यात जमा करण्याचा आदेश तयार करावा. त्यामध्ये त्या आदेशाची अंमलबजावणी करणे सक्तीचे आहे आणि न केल्यास कलम 31, आणि नियम 15 (7) खाली गुन्हा ठरतो हेही लिहावे. तो आदेश संरक्षण अधिकाऱ्यांना द्यावा आणि तो मालकांवर किंवा जबाबदार अधिकाऱ्यांवर बजवावा असा निर्देश द्यावा.
- प्रतिवादी नोकरी करत नसेल पण प्रतिवादीकडे जंगम मालमत्ता किंवा स्थावर संपत्ती असेल तर ती ताब्यात घ्यावी, तिची विक्री (लिलाव) करून आदेशात लिहिल्याप्रमाणे पैसे वसूल करावे, असा आदेश द्यावा. लिलाव करण्यासाठी दिवाणी प्रक्रिया संहिते प्रमाणे (ऑर्डर 21 (43), (54)) किंवा फौजदारी प्रक्रिया संहितेप्रमाणे दंड वसुलीची प्रक्रिया (कलम 421, 431 नुसार) करायला सांगावी.[21] ती प्रक्रिया कायद्यात कशी दिली आहे ते संरक्षण अधिकाऱ्यांना समजावून सांगावे किंवा मोफत कायदा केंद्रात काम करणाऱ्या वकिलांना समजावून सांगण्याची विनंती करावी.

अंमलबजावणी केल्यानंतर तसा अहवाल संरक्षण अधिकाऱ्यांना न्यायालयात सादर करण्यास सांगावे.

---

[21] *Nandkishor Vyavahare* Vs. *Mangala* (https://indiankanoon.org/doc/98162887/ ) decided by Bom HC on 3rd May 2018 OR MANU/MH/2659/2017. Two issues addressed - 1. proceedings under PWDVA are of civil nature and 2. The High Court can exercise its power under Section 482 of the Code of Criminal Procedure,1973 in respect of the proceedings under PWDVA

## ६.१.४ ताबा आदेशाची अंमलबजावणी:

न्यायदंडाधिकाऱ्यांनी ताबा आदेश देताना संरक्षणाचा आदेशही देणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे प्रतिवादीने आदेशाची अंमलबजावणी न केल्यास त्याच्याविरुद्ध कलम 31 खाली कारवाई करता येऊ शकेल.

न्यायदंडाधिकाऱ्यांनी ताबा आदेशाची प्रत संरक्षण अधिकाऱ्यांकडे देताना पीडितेबरोबर ज्या घरी मूल असेल तिथे तिच्याबरोबर जाण्यास सांगावे, गरज असल्यास पोलिसांनाही बरोबर न्यायला सांगावे. तसे आदेशातही नमूद करावे. महिला प्रत्यक्ष घरात जाऊन मुलाला घेईपर्यंत संरक्षण अधिकाऱ्यांनी आणि पोलिसांनी तिथे थांबावे आणि घरातल्या लोकांनाही तिला शांतपणे मुलाला नेऊ द्यावे असे सांगायला सांगावे. अन्यथा कलम 31 आणि नियम 15(7) खाली पुढची फौजदारी कारवाई होऊ शकते ह्याची कल्पना द्यायला सांगावी.

प्रतिवादीकडून किंवा घरात त्यावेळी उपस्थित असलेल्यांकडून महिलेस मुलाचा ताबा दिलेला आहे असे लिहून घ्यायला सांगावे. तसेच महिलेकडूनही तिला मुलाचा प्रत्यक्ष ताबा मिळालेला आहे असे लिहून घ्यायला सांगावे. न्यायदंडाधिकाऱ्यांनी आदेशामध्ये स्पष्टपणे ह्या साऱ्या मुद्द्यांची नोंद करावी. आदेशाची अंमलबजावणी झाल्यावर तसा अहवाल संरक्षण अधिकाऱ्यांना न्यायालयात सादर करण्यास सांगावे.

ज्या ठिकाणाहून मुलाचा ताबा घेतला जाणार होता त्या ठिकाणी मूल सापडले नाही तर तसा अहवाल संरक्षण अधिकाऱ्यांना न्यायदंडाधिकाऱ्यांकडे सादर करण्यास सांगावे.

काही वेळेस, विशेषतः जर मूल मोठे असेल तर प्रतिवादीस मुलाला ठरावीक तारखेला आणि वेळेला न्यायालयात घेऊन येण्याची नोटीस बजावू शकतात, आणि ही नोटीस संरक्षण अधिकाऱ्यांस देऊन ती प्रतिवादीवर बजावण्याचा निर्देशही देऊ शकतात.

## ६.१.५ विशिष्ट परिस्थितीत घ्यायची काळजी:

काही वेळेला परिस्थितीप्रमाणे आदेशांची अंमलबजावणी करण्यासाठी वेगळे आदेश द्यावे लागू शकतात. उदाः प्रतिवादी आदेश देणाऱ्या न्यायालयाच्या कक्षेबाहेर राहत असेल किंवा नोकरी करत असेल तर संरक्षण अधिकारी आणि पोलिसही न्यायालयीन कक्षेच्या बाहेरचे असतील. अशा वेळेस ज्या न्यायदंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयीन कक्षेत प्रतिवादी राहत आहे ते न्यायदंडाधिकारीही आदेश लागू करू शकतात. मात्र त्यांना अशा परिस्थितीमध्ये आदेश देणाऱ्या न्यायदंडाधिकाऱ्यांनी विनंती करणारे पत्र द्यावे लागेल.

## ६.२ संरक्षण आदेशाचा भंग:

संरक्षण आदेशाचा प्रतिवादीने भंग केल्यास सदर कायद्याच्या कलम 31(1) आणि नियम 15(5) प्रमाणे तो गुन्हा असून त्यासाठी एक वर्षांपर्यंत कैद आणि किंवा रु.२०,००० पर्यंत दंड होऊ शकतो. तो कलम 32(1) प्रमाणे दखलपात्र आणि अजामीनपात्र गुन्हा आहे. संरक्षण आदेश दिलेल्या न्यायदंडाधिकाऱ्यांपुढेच असा खटला शक्यतो चालवला जावा अशी तरतूद कलम 31(2) मध्ये आहे.[22]

संरक्षण आदेशाचा भंग केल्याचा दोषारोप करताना खटल्याशी संबंधित भारतीय दंड विधानाच्या कलम 498ए किंवा इतर कलमाखाली किंवा हुंडा प्रतिबंधक कायद्याखाली, जे लागू असेल त्याप्रमाणे न्यायदंडाधिकाऱ्यांनी दोषारोपपत्र तयार करावे - कलम 31(3). आणि संक्षिप्त प्रक्रिया राबवून निकाल द्यावा. पीडितेच्या एकटीच्या शपथपूर्वक केलेल्या विधानावर प्रतिवादीने कलम 31 खालील गुन्हा केला आहे असा निष्कर्ष न्यायदंडाधिकारी काढू शकतात - कलम 32(2).

संरक्षण आदेशाचा भंग झाल्यास पीडिता संरक्षण अधिकारी किंवा पोलिसांच्या मदतीने न्यायदंडाधिकाऱ्यांपर्यंत पोचू शकेल. तिला शक्य नसल्यास तिच्यावतीने दुसरी कोणीही व्यक्ती न्यायालयासमोर येऊ शकेल. न्यायदंडाधिकाऱ्यांनी पूर्वी दिलेल्या संरक्षण आदेशाची प्रत तपासून बघावी. पीडितेचे/ त्या व्यक्तीचे काय म्हणणे आहे ते ऐकून, समजून घ्यावे आणि त्यातील धोक्याचा अंदाज घ्यावा. (जर व्यक्तीने दिलेल्या माहितीप्रमाणे पीडिता संकटात असेल, किंवा तिचा जीव धोक्यात असेल तर प्रथम त्वरेने स्थानिक पोलिसांना तिची सुटका करायला सांगावी.) प्रतिवादीने जामिनासाठी अर्ज केल्यास, तो पीडितेला आणि तिच्या मुलांना किती धोका पोहोचवू शकतो हे समजून घ्यावे आणि त्याप्रमाणे प्रतिवादीला जामीन द्यायचा किंवा नाही हे ठरवावे. त्यानंतर प्रतिवादीला कलम 31 खाली शिक्षा द्यायची का? किती? ह्याबद्दलचा निकाल लवकरात लवकर द्यावा.

---

[22] कुटुंब न्यायालयाला कलम 31 खाली निर्णय देता येतो - Pramodini Fernandes Vs. Vijay Fernandes MANU/MH/0135/2010

## ६.३ आदेशात बदल करणे:

पीडितेने 'स्वतःवर परत हिंसा होणार नाही' असे जाहीर करेपर्यंत तिला हिंसेचा धोका आहे असे कलम 25 अन्वये गृहीत धरले जाते आणि ते फार महत्त्वाचे आहे. कलम 25(1) अन्वये, पीडिता जोपर्यंत संरक्षण आदेश काढून घ्यावा असा अर्ज करत नाही तोपर्यंत तो कलम 18 खालील संरक्षणाचा आदेश लागू असतो.

संरक्षण आदेश काढून घेणे, त्यात बदल करणे किंवा त्यात सुधारणा करणे यासाठी पीडितेने अर्ज केल्यास न्यायदंडाधिकाऱ्यांनी परिस्थितीची चौकशी करावी आणि संरक्षणाचा आदेश दिला तेव्हापेक्षा आता परिस्थिती बदलली आहे अशी त्यांची खात्री झाली, समाधान झाले तरच  अर्जाप्रमाणे आदेश द्यावा. असा आदेश देण्यापूर्वी पीडितेला विश्वासात घेऊन तिच्याकडून सत्य परिस्थिती जाणून घ्यावी. तिने अर्ज कोणाच्या, विशेषतः प्रतिवादी किंवा प्रतिवादीच्या नातेवाईकांच्या दबावाखाली केला नाही ना ह्याची खात्री करून घ्यावी. त्यानंतर योग्य तो निर्णय घ्यावा. निर्णय लेखी स्वरूपात द्यावा. निर्णयात कारणांची स्पष्टपणे नोंद असावी.

## ६.४ अपील

दोन्हीपैकी कोणताही पक्ष जर न्यायदंडाधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाबाबत समाधानी नसेल तर त्या पक्षाला अपील करता येते. अपील अंतरिम अथवा अंतिम आदेशानंतर करता येते[23]. असे अपील न्यायदंडाधिकाऱ्यांनी निर्णय दिलेल्या तारखेपासून ३० च्या दिवसांच्या आत सत्र न्यायालयाकडे करता येते. अपिलाचा निकाल किती दिवसांच्या आत दिला पाहिजे त्याबाबत सदर कायद्यामध्ये तरतूद केलेली नाही. पण शक्यतो लवकरात लवकर निकाल लागल्यास पीडितेला त्याची नक्कीच मदत होईल.

---

[23] *Abhijit Auti* Vs. *State of Maharashtra* MANU/MH/1432/2008 decided by Bom HC on 16th Sept 2008 OR 2009 CrLJ 889 - No appeal against purely procedural orders

## ७.० समारोप

या लेखनासाठी अनके शिबिरांमधून, तसेच प्रत्यक्षात व दूरध्वनीद्वारे अनेक व्यक्तींशी झालेल्या चर्चा उपयोगी पडल्या आहेत. इंटरनेटवरूनही काही संदर्भ घेतले आहेत.

**या कायद्याच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी मन:पूर्वक सदिच्छा!**

# संदर्भ सूची


१. "Handbook on Law of Domestic Violence" by Indira Jaisingh, Asmita Basu, Brototi Datta from Lawers Collective चा संदर्भ घेतला आहे.

२. Civil Procedure - Alternative Dispute Resolution and Mediation Rules, 2006 - Bombay High Court

३. Manual on best Practices, Protection of Women from Domestic Violence Act, 2005, by Lawyers Collective

४. Protection of Women from Domestic Violence Act, 2005 - Handbook on Protocols, Best Practices and Reporting Formats - by MOHIM (2014)

५. Staying Alive - Evaluating Court Orders, Lawyers Collective (2013)

६. Quest For Justice - A Study Of The Implementation Of The Protection Of Women From Domestic Violence Act,2005, by Tata Institute of Social Sciences (2014)

# परिशिष्टे

परिशिष्ट १

फॉर्म क्र. ४

[नियम 8(1)(ii)]

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ नुसार हिंसाग्रस्त व्यक्तिंच्या अधिकारांची माहिती

१. तुमच्याबरोबर राहत असलेल्या व्यक्तिकडून तुम्हाला मारहाण होत असेल तुमचा छळ होत असेल किंवा तशी धमकी दिली जात असेल तर ती तुमच्यावर होणारी हिंसाच आहे. सदर कायद्यापासून तुम्हाला सर्व प्रकारच्या हिंसेपासून संरक्षण मिळणे व त्याची सर्व माहिती, मार्गदर्शन, मदत व सहकार्य मिळणे हा तुमचा अधिकार आहे.

२. तुमच्याशी किंवा तुमच्यावर अवलंबून व तुमच्या ताब्यात असलेल्या मुलांशी तुमच्याबरोबर राहणारी व्यक्ती पुढील कोणत्याही प्रकारचे वर्तन करत असेल तर तुम्हाला या कायद्याअंतर्गत संरक्षण व मदत मिळवण्याचा अधिकार आहे.

अ. शारीरिक छळ

- मारहाण,
- चापट्या मारणे
- झोडपणे
- चावणे
- ठोसे, बुक्क्या मारणे
- लाथा मारणे, ढकलणे
- भिंतीवर किंवा जमिनीवर धरून आदळणे
- किंवा याव्यतिरिक्त शरीराला वेदना व दुखापत होईल असे कोणतेही वर्तन

ब. लैंगिक छळ

- उदाः जबरदस्तीने लैंगिक संभोग
- अश्लील साहित्य पाहण्याची जबरदस्ती करणे
- तिच्या सन्मानास धक्का पोचेल
- तिला नकोसे होईल असे कोणतेही वर्तन
- लहान मुलांचा लैंगिक छळ

क. शाब्दिक किंवा भावनिक छळ

- उदाः अपमान करणे
- नावे ठेवणे
- वागणूक व चारित्र्यावर शिंतोडे उडवणे
- वाईट चालीची आहे असे ठरवणे
- हुंडा आणला नाही म्हणून अपमान करणे
- तुम्हाला किंवा तुमच्या ताब्यातील मुलांना शाळा, कॉलेज किंवा इतर कोणत्याही ठिकाणी जाण्यास मनाई करणे
- नोकरी / व्यवसाय करू न देणे
- असलेली नोकरी / काम सोडण्याची जबरदस्ती करणे,
- दररोजच्या संपर्कातील व्यक्तिंना भेटू न देणे,
- तुम्हाला नको असताना, तुम्हाला नको असलेल्या मुलाशी लग्न करण्याची तुमच्यावर जबरदस्ती करणे,
- तुमच्या पसंतीच्या जोडीदाराबरोबर लग्न करण्याची परवानगी न देणे,
- घरातील लोकांनी किंवा नातेवाईकांनीच ठरवलेल्या मुलाशी, त्यांनी सांगितलेल्या पध्दतीनेच लग्न करण्याची जबरदस्ती करणे,
- त्यांच्या मनाप्रमाणे न वागल्यास आत्महत्या करेन अशी धमकी देणे,
- किंवा इतर कोणत्याही पध्दतीचा भावनिक व शाब्दिक छळ .

ड. आर्थिक छळ

- उदाः तुमच्या व तुमच्या मुलांच्या दैनंदिन खर्चासाठी तुम्हाला पैसे न देणे
- तुमच्या व तुमच्या मुलांच्या अन्न, वस्त्र, व निवारा, औषधपाणी अशा साध्या गरजाही न पुरवणे.
- तुम्हाला नोकरी व्यवसाय करू न देणे
- तुमच्या नोकरी व्यवसायामध्ये अडथळे आणणे,
- कोणताही नवीन व्यवसाय सुरू करू न देणे,
- तुमचा पगार मजुरी तुमच्याकडून हिसकावून घेणे,
- तुमचा पगार , मजुरीचे पैसे वापरण्याची तुम्हाला परवानगी न देणे,

- घराच्या काही भागात प्रवेश करू न देणे, किंवा तो भाग वापरण्याची परवानगी न देणे
- कपडे भांडी किंवा इतर दैनंदिन गरजेच्या वस्तु वापरण्याची परवानगी न देणे
- भाड्याच्या घरात राहत असताना घरभाडे न भरणे,
- याप्रकारचे इतर कोणतेही वर्तन

३. क्र.२ मधील वर्णनानुसार तुमच्याबरोबर राहत असलेल्या किंवा राहत होत्या अशा कोणत्याही व्यक्तिने तुमचा छळ केल्यास त्याच्या विरुध्द तुम्हाला पुढीलपैकी एक अथवा सर्व प्रकारचे आदेश मिळवता येतील.

(अ) कलम १८ नुसार

१. तुमचा व तुमच्या मुलांचा होणारा छळ ताबडतोब थांबवणे.

२. स्त्री–धन, दागिने, कपडे इ. तुमच्या वस्तु तुम्हाला परत करणे,

३. तुमच्या परवानगीशिवाय तुमचे बँकेचे खाते किंवा लॉकर न वापरणे,

(ब) कलम १९ नुसार

१. तुम्ही राहत असलेल्या घरात राहण्यास तुम्हाला मनाई न करणे

२. शांतपणे घरात राहण्यास तुम्हाला कोणतेही अडथळे न आणणे,

३. तुम्ही राहत असलेल्या घराची कोणत्याही प्रकारे तोडफोड न करणे, किंवा त्या घराची विक्री व तत्सम व्यवहार न करणे,

४. भाडे तत्त्वावर घरात राहत असल्यास वेळेवर भाडे भरणे, किंवा तुमच्या राहण्यासाठी तुम्हाला सोईची असेल व पूर्वीच्या घरातील सर्व सुविधा उपलब्ध असतील अशी राहण्याची पर्यायी व्यवस्था करणे,

५. कोर्टाच्या परवानगीशिवाय राहत्या घराचे कोणतेही हक्क हस्तांतरित न करणे,

६. राहत्या घरावर कोणतेही कर्ज न काढणे, किंवा कोणत्याही प्रकारचा आर्थिक बोजा त्या घरावर न चढवणे,

७. तुमच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक असे खालीलपैकी आदेश

(क) कलम १९ नुसार सर्वसाधारण आदेश

१. तक्रार केल्यानुसार कौटुंबिक हिंसेचे प्रकार ताबडतोब थांबवणे.

(ड) कलम १९ नुसार विशेष आदेश

१. तुमच्या राहत्या ठिकाणापासून व कामाच्या ठिकाणापासून त्याने दूर राहणे
२. तुम्हाला भेटण्याचा कोणताही प्रयत्न न करणे
३. तुमच्याशी इ-मेल, पत्र, फोन अशा कोणत्याही माध्यमातून संपर्क साधण्याचा प्रयत्न न करणे,
४. तुमच्या लग्नाची बोलणी न करणे, त्यांच्या पसंतीच्या स्थळाला भेटण्याची लग्नसंदर्भात भेटण्याची जबरदस्ती न करणे,
५. मुलांच्या शाळेपासून किंवा तुम्ही मुले जिथे नेहमी वावरतात अशा ठिकाणांपासून त्याने स्वतःला दूर ठेवणे,
६. त्याच्याजवळ असलेली शस्त्रे, बंदूक, पिस्तूल, किंवा इतर धोकादायक वस्तू त्याने ताबडतोब जमा करणे,
७. बंदूक, पिस्तूल, शस्त्रे किंवा कोणत्याही धोकादायक वस्तू स्वतःजवळ बाळगणे
८. दारू, ड्रग्ज, किंवा कौटुंबिक छळाला खतपाणी मिळेल असे कोणतेही व्यसन न करणे
९. तुमच्या व तुमच्या मुलांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक असे इतर आदेश

(इ) कलम २० आणि २१ नुसार आर्थिक तरतुदींसाठी अंतरिम आदेश

१. तुमच्या व तुमच्या मुलांच्या उदरनिर्वाहासाठी खर्च
२. तुम्हाला कौटुंबिक हिंसेमुळे झालेल्या दुखापतीसाठी औषधपाण्याचा खर्च व दुखापतीची नुकसान भरपाई,
३. मानसिक छळ व भावनिक ओढाताणीची नुकसान भरपाई
४. हिंसेच्या काळात नोकरी, व्यवसाय, मजुरीतील बुडालेल्या उत्पन्नाची भरपाई
५. हिंसेच्या प्रकारात घराची, घरातील वस्तुंची झालेली तोडफोड, तुमच्या हिसकावून घेतलेल्या वस्तू या सर्वांचा मोबदला.

टीपः १. वरीलपैकी आदेश हे तुम्ही न्यायालयात तक्रार दाखल केल्यावर तात्पुरत्या, अंतरिम स्वरूपाचे मिळू शकतात.

२. या फॉर्म क्र. १ मध्ये उल्लेख केलेल्या तक्रारीला कायद्यामध्ये कौटुंबिक घटना अहवाल असे म्हटले आहे.

४. तुमच्यावर जर कौटुंबिक हिंसा होत असेल, तर या कायद्यानुसार तुमचे हक्क पुढीलप्रमाणे आहेत

१. कलम ५ नुसार सर्व सुविधा तसेच सुरक्षा अधिकारी व सेवादायी संस्थांकडून सर्व प्रकारच्या सेवा सुविधा मिळणे.

२. कलम ९ व १० नुसार तक्रार दाखल करताना व न्यायालयामध्ये अर्ज दाखल करताना सुरक्षा अधिकारी, जवळच्या पोलीस चौकीतील अधिकारी व सेवादायी संस्थांकडून मदत व मार्गदर्शन मिळणे.

३. कलम १८नुसार तुमच्या व तुमच्या मुलांच्या सुरक्षिततेची हमी घेतली जाणे,

४. तुम्हाला व तुमच्या मुलांना जर काही असुरक्षितता जाणवत असेल तर त्यापासून सुरक्षितता मिळणे.

५. ज्या ठिकाणी तुमच्यावर हिंसा झाली त्या ठिकाणी तुमच्या राहत्या घरात सुरक्षित राहता येणे, कलम १९ नुसार त्या घरात तुम्ही शांततेने राहण्यात अडथळे न आणले जाणे, अडथळे आणणाऱ्या पुरुषाने त्या घरापासून दूर राहावे असा त्याच्या विरुध्द आदेश मिळणे,

६. कलम १८नुसार तुमचे स्त्री धन, दागिने, कपडे इतर दैनंदिन गरजेच्या वस्तू व घरातील आवश्यक सामान इत्यादींचा ताबा तुम्हाला परत मिळणे.

७. कलम ६,७,९,१४ नुसार तुमच्या गरजेनुसार वैद्यकीय सुविधा, आधारगृह,समुपदेशन,कायदेविषयक मोफत सेवा उपलब्ध होणे.

८. कलम १८मध्ये सांगितल्याप्रमाणे, तुमचा छळ करणाऱ्या व्यक्तीस त्याने तुमच्याशी कोणताही संपर्क साधू नये असा आदेश मिळणे,

९. कलम २२नुसार कोणत्याही शारीरिक ,मानसिक, दुखापतीची किंवा आर्थिक नुकसानीची भरपाई मिळणे,

१०. कलम १२, १८, १९, २०,२१, २२, २३ नुसार सेवा मिळण्यासाठी थेट न्यायालयात अर्ज दाखल करणे.

११. तुम्ही अथवा तुमचे मूल यांनी काही वैद्यकीय मदत घेतली असल्यास त्याचा दाखला,कोर्टामध्ये अर्ज दाखल केला असल्यास किंवा कोणतीही तक्रार दाखल केली असल्यास त्याची निःशुल्क प्रत मिळणे.

१२. कौटुंबिक हिंसेसंदर्भात कोणत्याही अधिकाऱ्यानी एखादी नोंद घेतली असेल तर त्याची प्रत मिळणे.

१३. तुमचा जीव धोक्यात असेल तेव्हा त्या परिस्थितीतून तुमची सुटका करण्यासाठी सुरक्षा अधिकारी व पोलीस यांची मदत व मार्गदर्शन मिळणे.

५. हा फॉर्म तुम्हाला देणाऱ्या व्यक्तीने तो तुम्हाला देण्यापूर्वी त्यामध्ये खालील माहिती भरून द्यायची आहे.

| संस्थेचे नाव | सेवादायी संस्था | संपर्कासाठी तपशील |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

--------------------------------------------------------------------------------

कौटुंबिक हिंसाचारापासुन स्त्रियांचे संरक्षण नियम २००६

परिशिष्ट २

# Form 1

# अर्ज १

(नियम ५ (१) आणि १७ (३) पहा)

कौटुंबिक हिंसाचारापासुन स्त्रियांचे संरक्षण अधिनियम २००५ अन्वये

कलम ९ (ब) आणि ३७८ (२) (क) नुसार

## कौटुंबिक घटना अहवाल

१) **पीडित व्यक्ती बाबतचा तपशील:**

१. पीडित व्यक्तीचे नाव -

२. वय -

३. लग्नानंतरचा सामायिक घराचा पत्ता -

४. सध्याचा पत्ता -

५. दुरध्वनी क्रमांक

**२) प्रतिवादीची सविस्तर माहिती:**

| अ क्र | नाव | प्रतिवादी पीडीत व्यक्ती बरोबर नाते संबंध | पत्ता | दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

**३)पीडीत व्यक्तीच्या मुलांविषयी सविस्तर माहिती:**

अ) मुलांची संख्या :

ब) मुलांविषयी सविस्तर माहिती :

| अ.क्र | नाव | वय | लिंग | मुलाचे सध्याचे वास्तव्य |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

**४) कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना :**

**१) शारीरीक हिंसाचार:-**

| **अ. क्र.** | **दिनांक व ठिकाण हिंसाचार झाल्याची वेळ** | **कौटुंबिक हिंसाचाराला कारणीभुत व्यक्ती** | **कुठल्याही प्रकारची दुखापत झाली असल्यास कृपया स्पष्टीकरण देणे** | **तपशील** |
|---|---|---|---|---|
| | | | | |

## २)लैगिंक हिंसाचार

चौकोनात ( ✓) योग्य खुन करावी.

| अ. क्र. | दिनांक व ठिकाण हिंसाचार झाल्याची वेळ | कौटुंबिक हिंसाचाराला कारणीभुत व्यक्ती | हिंसाचाराचा प्रकार | तपशील |
|---|---|---|---|---|
| १. | | | ▪ सक्तीने लैंगिक संबंध ठेवणे<br>▪ अश्लिल चित्र बघण्यास सक्ती करणे<br>▪ दुसऱ्याच्या मनोरंजनासाठी तुमचा वापर केला असल्यास<br>▪ लैंगिक संबंधावद्दल इतर काही कृती अश्लिल शब्द वापरणे.<br>▪ अपमाणित करणे किंवा | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | इतर काही तुमच्या स्वाभिमानाला ठेच पोहचविणे (कृपया खाली दिलेल्याजागेवर या बाबतची सविस्तर माहिती देणे) | |

## ३)शाब्दिक आणि भावनिक हिंसाचार

चौकोनात ( ✓ ) योग्य खुन करावी.

| अ. क्र. | दिनांक व ठिकाण हिंसाचार झाल्याची वेळ | कौटुंबिक हिंसाचाराला कारणीभुत व्यक्ती | हिंसेचा प्रकार | तपशील |
|---|---|---|---|---|
| | | | ▪ चारित्रयावर संशय घेणे/ वागणुकीबद्दल दोषी धरणे<br><br>▪ हुंडा न आणल्याबद्दल अपमाणास्पद वागणुक देणे, इत्यादी<br><br>▪ मुलगा होत नाही म्हणुन अपमान करणे<br><br>▪ मुल होत नाही म्हणुन अपमान करणे<br><br>▪ घालुन पाडुन बोलणे, अपमानकारक, उपहासणात्मक किंवा अपशब्द वापरणे, मानहानी करणे | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | ▪ थट्टा करणे<br><br>▪ नावे ठेवणे<br><br>▪ शाळा कॉलेज किंवा इतर शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेण्यास प्रतिबंध करणे<br><br>▪ नोकरी करु देण्यास प्रतिबंध करणे<br><br>▪ घराबाहेर पडण्यास प्रतिबंध करणे<br><br>▪ दुसऱ्या विशिष्ट व्यक्तीस भेटण्यास प्रतिबंध करणे<br><br>▪ तुमच्या इच्छेविरुद्ध लग्न करण्याची सक्ती करणे | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | ▪ तुम्ही निवडलेल्या व्यक्तीबरोबर लग्न करण्यास प्रतिबंध करणे<br><br>▪ इतर मानसिक किंवा शाब्दिक छळ असल्यास (कृपया त्याचे स्पष्टीकरण खालील दिलेल्या जागेवर लिहिणे | |

## ४) आर्थिक हिंसाचार

चौकोनात ( ✓ ) योग्य खुन करावी.

| अ. क्र. | दिनांक व ठिकाण हिंसाचार झाल्याची वेळ | कौटुंबिक हिंसाचाराला कारणीभुत व्यक्ती | हिंसेचा प्रकार | तपशील |
|---|---|---|---|---|
| | | | ▪ तुमच्या व मुलाच्या पालन पोषणासाठी घरखर्च न देणे<br><br>▪ तुम्हाला व तुमच्या मुलांना जेवण व औषध इत्यादी उपलब्ध करुन न देणे<br><br>▪ तुम्हाला जबरदस्तीने घराबाहेर काढणे<br><br>▪ घराचा कुठलाही भाग वापरण्यास प्रतिबंध करणे<br><br>▪ तुम्ही करत असलेली नोकरी /काम सोडण्यास भाग | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | पाडणे /प्रतिबंध करणे<br><br>▪ नोकरी करण्यास परवानगी न देणे<br><br>▪ भाड्याच्या घरात राहत असल्यास भाडे न भरणे<br><br>▪ तूम्हाला कपडे किंवा इतर घरगुती वस्तु वापरु न देणे<br><br>▪ तुमच्या परवाणगीशिवाय तुमचे स्त्रीधन किंवा इतर मौल्यवान वस्तु विकणे किंवा गहाण ठेवणे<br><br>▪ बळजबरीने तुमचा पगार,कमाई किंवा मजुरी घेणे<br><br>▪ बिल न भरणे उदा. लाईट बिल इत्यादी | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | ▪ इतर आर्थिके छळ(कृपया त्याचे स्पष्टीकरण खाली दिलेल्या जागेवर लिहिणे | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | |

## (४) हुंडयासंबंधी देण्यात येणारा त्रास-

| अ.क्र. | दिनांक व ठिकाण हिंसाचार झाल्याची वेळ | कौटुंबिक हिंसाचाराला कारणीभुत व्यक्ती | हिंसेचा प्रकार | तपशील |
|---|---|---|---|---|
| १. | | | ▪ हुंडयाची मागणी करणे (कृपया याबाबत विवरण दयावे) | |
| २. | | | ▪ हुंडयाबाबत इतर काही माहिती असल्यास कृपया सविस्तर माहिती दयावी | |
| ३ | | | ▪ हुंडयाचे साहित्य, स्त्रीधन, इ. बाबतची सविस्तर माहिती या अर्जासोबत जोडलेली आहे का?<br>होय<br>नाही | |

**५) कौटुंबिक हिंसाचाराबाबत तुमच्या व मुलांविषयी इतर काही माहिती असल्यास:-**

| | |
|---|---|
| १. | |

**६) सोबत जोडलेल्या कागदपत्रांची यादी**

| कागदपत्रांची नावे | दिनांक | इतर सविस्तर माहिती |
|---|---|---|
| कायदेशीर वैदयकीय प्रमाणपत्र | | |
| डॉक्टरांचे प्रमाणपत्र किंवा इतर कोणतीही डॉक्टरांनी सांगितलेली औषधे | | |
| इतर काही कागदपत्रे असल्यास | | |
| | | |
| | | |

**७) कौटुंबिक हिंसाचारापासुन स्त्रियांचे संरक्षण अधिनियम २००५ तुम्हाला गरज असलेले आदेश**

| अ.क्र | आदेश | होय/नाही | इतर काही |
|---|---|---|---|
| १. | कलम 14 अन्वये | | |
| 2 | कलम 17 अन्वये | | |
| ३. | कलम 18 अन्वये | | |
| ४. | कलम 19 अन्वये | | |
| ५. | कलम 20 अन्वये | | |
| ६. | कलम 21 अन्वये | | |
| ७. | कलम 22 अन्वये | | |
| 8 | कलम 23 अन्वये | | |

## ८) तुम्हाला पाहिजे असलेली मदत

| अ.क्र. | उपलब्ध सहाय्य मदत | होय/नाही | मदतीचा प्रकार |
|---|---|---|---|
| १. | समुपदेशन | | |
| २. | पोलिस मदत | | |
| ३. | फौजदारी कारवाईसाठी मदत | | |
| ४. | आधार गृह | | |
| ५. | वैदयकिय मदत | | |
| ६. | कायदयाची मदत | | |

## ९)कौटुंबिक घटना अहवाल नोंद करण्यास मदत करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्याला सूचना:-

या नमुन्यातील माहितीमधुन पोलिसांच्या असे लक्षात आले की, भारतीय दंड विधान संहिता किंवा इतर कोणत्याही कायदयाने सांगितलेला गुन्हा घडला आहे तर पोलिस अधिकाऱ्याने-

(अ) हिंसाग्रस्त व्यक्तीला माहिती दिली पाहिजे की, अशा गुन्हयाबद्दल आरोपी व्यक्तीविरुद्ध फौजदारी प्रक्रिया , १९७३ (१९७४ च्या २ ) अन्वये करु शकते.

(ब)तिला फौजदारी कार्यवाही करायची नसेल तर तशी नोंद रोजनिशीमध्ये केली पाहिजे.त्यामध्ये या बाबीचा आवर्जुन उल्लेख करावा की हिंसाग्रस्त व्यक्तीचा आरोपीवर अत्यंत सलगीचा संबंध असल्यामुळे कौटुंबिक हिंसाचारापासुन संरक्षण व्हावे म्हणुन दिवाणी उपाय करण्याची तिची इच्छा आहे आणि तिने अशी विनंती केली आहे की तिला मिळालेल्या माहितीनुसार प्रथमदर्शनी माहिती अहवाल नोंदणी करण्याअगोदर सदर बाब अनिर्णित ठेवावी.

(क) हिंसाग्रस्त व्यक्तीने शारिरिक दुखापत किंवा त्रास याबाबत सांगितले असेल तर तिला त्वरीत वैदयकीय अधिकाऱ्यापासुन तिची वैदयकीय तपासणी करुन घेतली पाहिजे.

ठिकाण -

दिनांक -

पीडीत व्यक्तीची सही / अंगठा

नाव-

संरक्षण अधिकारी/ सेवादायी संस्था

सही व शिक्का

नाव-

पत्ता-

**प्रत रवाना-**

१.स्थानिक पोलिस ठाणे
२.सेवादायी संस्था / संरक्षण अधिकारी
३.पीडीत व्यक्ती
४.न्यायदंडाधिकारी

Form 2

परिशिष्ट ३

# अर्ज 2

(नियम ६ (१))

........................... येथील मे. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात

**कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण अधिनियम २००५ (२००५ चा ४३ वा)**
**कलम-१२ खाली अर्ज**

किरकोळ अर्ज क्र.            /२०१

नाव-..............................................................................................................

वय-    .........    वर्षे,            व्यवसाय-         ...........................................
**अर्जदार**

पत्ता-..................................................................................................................................................

कौटुंबिक हिंसाचारापासुन स्त्रियांचे संरक्षण अधिनियम (२००५ चा ४३ वा ) चे कलम नुसार संरक्षण आदेश मिळणेकामी अर्ज.

**१)** कौटुंबिक हिंसाचारापासुन स्त्रियांचे संरक्षण करणारा कायदा २००५ च्या कलम खालील अर्ज कौटुंबिक घटना अहवालाच्या प्रतीसह पुढील व्यक्तींनी दाखल केला आहे.

अ)पीडीत व्यक्ती
ब)संरक्षण अधिकारी
क)पीडीत व्यक्तीच्या वतीने इतर कोणीही व्यक्ती

**२)** मे. न्यायलयास विनंती करण्यात येते की, कौटुंबिक हिंसा घटना अहवाल याची दखल घ्यावी व सदर प्रकरणातील परिस्थितीनुसार योग्य ते सर्व आदेश किंवा इतर कोणतेही योग्य आदेश पारित करावेत.

अ. कलम १८ खालील संरक्षण आदेश पारित करावेत आणि / किंवा

ब. कलम १९ खाली निवासी आदेश पारित करावेत आणि / किंवा

क. प्रतिवादीस कलम २० खाली आर्थिक मदत देण्याचे निर्देश दयावेत आणि / किंवा

ङ अधिनियमातील कलम २३ नुसार आदेश पारित करावेत आणि / किंवा

इ. प्रतिवादीला नुकसान भरपाई देण्याबाबत किंवा इजेचे नुकसान भरपाई देण्याबाबत कलम २२ नुसार निर्देश दयावेत आणि / किंवा

फ. न्यायालयाला योग्य वाटेल असे कोणतेही अंतरिम आदेश पारित करावेत

ग. सदर प्रकरणातील परिस्थितीनुसार योग्य वाटतील असे अदेश देण्यात यावेत.

**3) आवश्यक आदेश-**

**[अ] कलम १८ नुसार संरक्षण आदेश मिळणे गरजेचे आहेत-**

- कौटुंबिक हिंसेला प्रतिबंध व्हावा म्हणुन प्रतिवादी विरुध्द अर्जातील स्तंभ [अ]/[ब]/[क]/[ड]/[इ]/[फ]/[ग] यातील अटी नुसार अशा घटना पुन्हा घडु नयेत म्हणुन आदेश.
- शाळा , महाविदयालय / कामाचे ठिकाण येथे प्रतिवादीला प्रवेश करण्यास प्रतिबंध करण्यात यावा.
- कामाच्या जागी जाण्यासाठी शिरकाव करण्यास प्रतिवादीला प्रतिबंध करण्यात यावा
- मुलांच्या शाळा / महाविदयालय / इतर ठिकाणे या जागी प्रतिवादीला प्रवेश करण्यास प्रतिबंध करण्यात यावा
- स्वत:च्या शाळेत जाण्यासाठी मनाई करण्यास प्रतिबंधकरण्यात यावा
- प्रतिवादीने कोणत्याही प्रकारे पीडीत व्यक्तीला संपर्क साधण्यास प्रतिबंध करण्यात यावा.
- प्रतिवादीची मिळकत तबदील करण्यास प्रतिबंध करण्यात यावा.
- प्रतिवादीने जॉईंट बॅंक लॉकर/ अकौंट वापरण्यास संमती देण्यात यावी व तसा आदेश देण्यात यावा
- पीडीत व्यक्तीचे नातेवाईक / तिच्यावर अवलंबुन असणाऱ्या व्यक्ती यांच्यापासुन प्रतिवादीने दुर राहण्याचे आदेश निर्देश देण्यात यावेत.
- इतर कोणताही आदेश

**[ब] कलम १९ नुसार निवासाबाबतचे आदेश-**

खालील कृत्ये करण्यापासुन प्रतिवादीस प्रतिबंध करण्यात यावा व तसा आदेश देण्यात यावा.

- पीडीत व्यक्तीला सामाईक घरातुन हाकलुन देण्यास प्रतिबंध करण्यात यावा व तसा आदेश देण्यात यावा.
- पीडीत व्यक्ती घराच्या ज्या भागात राहते त्या भागात घरात प्रतिवादीस प्रवेश करण्यास प्रतिबंध करण्यात यावा व तसा आदेश देण्यात यावा.
- सामाईक घर तबदील करण्यास / विल्हेवाट लावण्यास / सहज हालचालींच्या आड येण्यास प्रतिवादीला प्रतिबंध करण्याबाबत आदेश देण्यात यावे.
- प्रतिवादी सामाईक घरातील अधिकाराचा त्याग करण्यास प्रतिबंध करण्याबाबत आदेश करण्यात यावा.
- पीडीत व्यक्तीच्या खाजगी चीजवस्तू वापरणच्या अधिकारास बाधा येवु नये याबाबत आदेश देण्यात यावेत.
- प्रतिवादीला पुढील अदेश मिळण्यासाठी-
  -सामाईक घरातुन प्रतिवादीने स्वत:हुन निघुन जाण्याबाबत आदेश देण्यात यावेत.
  -पीडीत व्यक्तीची सामाईक घरासारखीच इतर ठिकाणी रहाण्याची सोय करावी किंवा त्यासाठी भाडे देण्याची व्यवस्था करावी याबाबत आदेश देण्यात यावेत
- इतर कोणताही आदेश.

**[क] कलम २० खाली आर्थिक मदतीचे आदेश-**

- उत्पन्नाचे झालेले नुकसान रक्कम रु. /-
- वैदयकीय खर्च रक्कम रु /-
- पीडीत व्यक्तीच्या ताब्यात असलेली मिळकतीची झालेली हानी / तिच्या ताब्यातील असलेली मिळकत काढुन घेतल्यामुळे झालेला तोटा. रक्कम रु /-
- खंड १० [ड] मध्ये दिलेल्या तपशिलाप्रमाणे इतर कोणतेही नुकसान किंवा शारिरिक , मानसिक धक्का यामुळे नुकसान रक्कम रु /-

---

- **एकुण रकमेची मागणी रक्कम रु /-**

- इतर कोणताही आदेश.

**[ड] कलम २० खाली आर्थिक मदतीचे आदेश-**

- प्रतिवादीला खालील खर्च आर्थिक मदत म्हणुन देण्यास निर्देश देणे

- अन्न, वस्त्र, औषधे किंवा
  दरमहा रु /-
  मुलभुत गोष्टींचा खर्च

- शालेय शुल्क किंवा इतर खर्च
  दरमहा रु /-

- घर खर्च
  दरमहा रु /-

- इतर खर्च
  दरमहा रु /-

- इतर कोणताही आदेश

**[ढ] कलम २१ खाली ताबा आदेश-**

मुलाचा किंवा मुलीचा ताबा हस्तांतरीत करणे बाबत प्रतिवादीस निर्देश देणे.

- पीडीत व्यक्ती
- पीडीत व्यक्तीच्या वतीने इतर व्यक्ती सदर व्यक्ती बाबत तपशील

  ..............................................................................................................................................

**[फ़] कलम २२ प्रमाणे नुकसान भरपाई आदेश.**

**[ग] इतर कोणताही आदेश, कृपया तपशील दया.**

..................................................................................................................................................................

**४) पुर्वी केलेल्या दाव्या संबंधी तपशील ,जर केले असतील तर..**

[अ] इतर कोणतेही आदेश,कृपया तपशील दया भारतीय दंडसंहिता कलम..........प्रमाणे जेप्रकरण प्रलंबित न्यायलयात आहे त्याचा तपशील देणे,लागूनाही.

..............................................................................................................................................

- प्रकरण निकाली असेल तर त्याचा तपशील देणे व त्यामध्ये मान्य केलेला तपशील लागू नाही

..............................................................................................................................................

[ब] फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम................प्रमाणे जे प्रकरण न्यायलयात प्रलंबित आहे त्याचा तपशील देणे लागु नाही

..............................................................................................................................................

- प्रकरण निकाली असेल तर त्याचा तपशील देणे व त्यामध्ये मान्य केलेल्या मदतीचा तपशील लागू नाही

..............................................................................................................................................

[क] हिंदु विवाह कायदा १९५६ च्या कलम......... प्रमाणे जे प्रकरण न्यायलयात प्रलंबित आहे त्याचा तपशील देणे लागू नाही.

..............................................................................................................................................

- प्रकरण निकाली असेल तर त्याचा तपशील देणे व त्यामध्ये मान्य केलेल्या मदतीचा तपशील

..............................................................................................................................................

[ड] हिंदु दत्तक विधान आणि पोटगी कायदा १९५६ खाली कलम ........ प्रमाणे जे प्रकरण

न्यायालयात प्रलंबित आहे त्याचा तपशील देणे-

.......................................................................................................................................

- प्रकरण निकाली असेल तर त्याचा तपशील देणे व त्यामध्ये मान्य केलेल्या मदतीचा तपशील

.......................................................................................................................................

[फ] ..........................................................................कायदा कलम............ खाली पोटगीचा अर्ज केला असेल तरतो तपशील देणे

अंतरीम पोटगी - रक्कम रु ......................दरमहा

मंजूर पोटगी - रक्कम रु ....................दरमहा

जर प्रतिवादीस न्यायालयीन कोठडीत पाठवले असेल तर त्याचा अवधी नमूद करणे

- एका अठवडयापेक्षा कमी
- एका महिण्यापेक्षा कमी
- एका महिन्यापेक्षा जास्त
- निश्चित कालावधी

[ग] इतर आदेश

.......................................................................................................................................

**विनंती**

तरी या मेहेरबान न्यायालयास नम्रता पुर्वक विनंती करण्यात येते की, सदर प्रकरणातील परिस्थितीजन्य पुरावे पाहुन पीडीत व्यक्तीचा कौटुंबिक हिंसाचारापासुन बचाव होण्याकरीता न्यायाच्या भुमिकेत योग्य ते आदेश पारित करावेत. ही विनंती तसेच मे. न्यायालयाने सदर अर्जदाराने मागितलेली मदत मंजुर करावी त्याबाबतचे आदेश पारित करावेत. तसेच मे. न्यायालयास योग्य वाटतील असे आदेश पारित करावेत, ही विनंती.

ठिकाण : पीडीत व्यक्ती / पीडीत व्यक्तीतर्फे वकील

दिनांक :

## सत्यता

सत्यता पटवुन घेतली ..................…… ठिकाणी ................................ तारखेस परिच्छेद ………. मधील कथन केलेला सर्व मजकुर हा माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर असुन कोणत्याही गोष्टी लपवुन ठेवलेल्या नाहीत. सबब हे प्रतिज्ञापत्र केले आहे.

पीडीत व्यक्तीची सही | संरक्षण अधिकाऱ्याची सही व शिक्का

परिशिष्ट ४

**फॉर्म - ३**

# कौटुंबिक हिंसाचारापासुन स्त्रियांचे संरक्षण अधिनियम २००५ कलम २३(२) चे प्रतिज्ञापत्र (२००५ चा ४३ )

मे. न्यायदंडाधिकारी .......................... ................................................ यांचे न्यायालयात

**किरकोळ अर्ज क्र.**

सौ. ........................................................................................

वय- ................. वर्षे. व्यवसाय-

**अर्जदार**

पत्ता- रा द्‌वारा.........................................................................

.........................................................................................................

**विरुद्‌ध**

श्री ..........................................................................................................

वय- ...................वर्षे. व्यवसाय-नोकरी

**जाबदेणार**

पत्ता - रा द्‌वारा ......................................................................

.........................................................................................................

## <u>प्रतिज्ञापत्र</u>

मी ......................................................................श्री...................................................................................................यांची

पत्नी/ मुलगी/विधवा/ राहणार ......................................................................................................................

सत्यप्रतिज्ञेवर कथन करते की,

१. की माझ्या करीता किंवा माझ्या मुलाच्या / मुलीच्या वतीने ......................................................... याकरीता केलेल्या अर्जातील मी अर्जदार आहे.

२. की मी ..........................................................................................................याची नैसर्गिक पालक आहे.

३. की मला या प्रकरणातील सर्व तथ्ये व परिस्थिती माहित आहे आणि म्हणुन हे प्रतिज्ञापत्र करण्यास मी समर्थ आहे.

४. की अभिसाक्षी प्रतिवादी सोबत.......................... ........................................................येथे गेली .................दिवस राहत होती.

५. सदर अर्जामधील सर्व तपशील लाभ कलम / कलमे .....................................................................अन्वये मान्य करावा यासाठी माझ्या संमतीने दाखला केला आहे.

६. की अर्जातील सर्व मजकुर हा मला वाचुन दाखविण्यात आला आहे आणि त्याचा आर्थ इंग्रजी/हिंदी स्थानिक भाषेत(स्थानिक भाषा.......................)मला समजावुन सांगण्यात आला आहे.

७. की अर्जातील सर्व मजकुर सोयी करीता व पुरावृत्ती टाळण्याकरीता या प्रतिज्ञापत्राचा एक भाग म्हणुन वाचण्यात यावा.

८. की अर्जदारास असे वाटते कि प्रतिवादीकडुन कौटुंबिक हिंसाचार न होण्यासाठी जी मदत अर्जात मागितली आहे तो कौटुंबिक हिंसाचार प्रतिवादी कडुन पुन्हा होईल.

९. की अर्जदारास प्रतिवादीने असे धमकाविले आहे की.

..................................................................................................................................................

..................................................................................................................................................

..................................................................................................................................................

..................................................................................................................................................

१०.	की प्रतिज्ञापत्रा सोबत केलेला विनंती अर्ज तातडीचा असुन तो मंजुर करण्यात यावा जर अंतरिम एकतर्फी विनंती अर्ज अमान्य केला तर अर्जदारास खुपच आर्थिक त्रासास तोंड दयावे लागेल आणि अर्जात कथन केल्यानुसार प्रतिवादीकडुन अर्जदारास पुन्हा कौटुंबिक हिंसाचार जबरदस्तीने पुन्हा सहन करावा लागेल.

११.	की सदर अर्जात नमुद केलेली सर्व तथ्ये ही माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे खरी व बरोबर आहेत तसेच कोणत्याही गोष्टी लपवून ठेवलेल्या नाहीत यातील कोणतेही भागातील कथने खोटी नाहीत.

अभिसाक्षी-

## सत्यता

सत्यता तपासुन घेतली.............................................ठिकाणी......................................................................या तारखेला सदर प्रतिज्ञापत्रात कथन केलेला सर्व मजकूर हा माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर असुन कोणत्याही गोष्टी लपवुन ठेवलेल्या नाहीत तेव्हाच हे प्रतिज्ञापत्र केले आहे.

संरक्षण अधिकाऱ्याची सही व शिक्का

पीडीत व्यक्तीची सही

परिशिष्ट ५

फॉर्म ७

FORM VII

[See rule 12(1)]

IN THE COURT OF ……………………………………………….

P / S: …………………..

*In matter of:*

Ms………………………………….. …..……………….COMPLAINANT

*Versus*

Mr………………………………….. …………………….RESPONDENT

To,

Mr………………………………

S/o………………………………

R/o………………………………

………………………………….

………………………………….

Whereas the petitioner has file an application(s) under section…………….of the Protection of Women from Domestic Violence Act, 2005 (43 of 2005).

You are hereby directed to appear before this Court on the …………….day of …………….20………….at……..O'clock in the ……………noon personally or through a duly authorized counsel of this Court to show cause why the reliefs claimed by the Applicant against you should not be granted, failing which the Court shall proceed *ex parte* against you.

Given under my hand and seal of the Court of ………………on the ………….. day of 20………..

…………………

Signature

Seal of the Court

परिशिष्ट ६

**फॉर्म नं.५**

**सुरक्षा नियोजन तक्ता.**

See rule 8(1)(iv)

| अ.क्र | स्त्रीवर झालेली हिंसा | 'अ' रकान्यामध्ये दिलेल्या हिंसेचा तिच्यावर झालेला परिणाम | हिंसेच्या संदर्भात स्त्रीला जाणवणार धोका | सुरक्षीततेसाठी घेण्याची खबरदारी | न्यायालया कडून मिळविण्याचे आदेश |
|---|---|---|---|---|---|
| | अ | ब | क | ड | इ |
| १. | शारीरिक हिंसा | असा हिंसक प्रकार परत घडण्याची भीती | १. पुन्हा हिंसक प्रकार घडेल<br>२. जास्त गंभीर स्वरूपात होईल,<br>३. जास्त दुखापत होईल,<br>४. इतर काही | | |
| २. | लैंगिक छळ व शिव्या तिला अपमानास्पद वाटेल असे इतर वर्तन | १. नैराश्य येईल,<br>२. अशी हिंसा परत होण्याची भिती<br>३. लैंगिक छळाच्या प्रयत्नांनाही तोंड द्यावे लागेल. | १. पुन्हा हिंसक प्रकार घडेल<br>२. जास्त गंभीर स्वरूपात होईल,<br>३. जास्त दुखापत होईल,<br>४. इतर काही | | |
| ३. | तिच्यावर हत्याराने वार करण्याचा प्रयत्न करणे | १. शारीरिक दुखापत<br>२.मानसिक दडपण आणि अस्वास्थ्य<br>३. इतर काही, | १. पुन्हा हिंसक प्रकार घडेल<br>२. जास्त गंभीर स्वरूपात होईल,<br>३. जास्त दुखापत होईल,<br>४. इतर काही | | |
| ४. | मुलांना मारहाण करणे | १. मुलांना दुखापत होईल.<br>२. त्यांच्या मनावर वाईट परिणाम होईल,<br>३. इतर काही. | १. पुन्हा मारहाण होऊ शकते<br>२. त्यांच्या हिंसक वागणूकीमूळे घरातील वातावरण बिघडेल त्यांचा मुलांवर वाईट परिणाम होतो<br>३. इतर काही | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५. | आत्महत्या करण्याची धमकी हिंसाग्रस्त स्त्रीला दिली जाणे. | १. घरातील वातावरण तणावाचे होते<br>२. सुरक्षीततेला धोका निर्माण होतो<br>३. इतर काही | १. आत्महत्येचा प्रयत्नं करेल<br>२. पुन्हा पुन्हा प्रयत्नं करेल<br>३. इतर काही. | | |
| ६. | आत्महत्येचा हिंसक व्यक्तीने प्रयत्नं करणे | १. घरामध्ये हिंसक वातावरण होते<br>२. असुरक्षीतता भिती,नैराश्य, वैफल्य आणि मानसिक धक्का स्त्ीला बसू शकतो.<br>३. इतर काही. | १. पुन्हा पुन्हा प्रयत्नं करेल,<br>२. मानसिक ताण,दुःख.<br>३. इतर काही. | | |
| ७. | मानसिक आणि भावनिक छळ उदा.अपमान खिल्ली उडवणे,नावे ठेवणे, मुलगा होत नाही म्हणून अपमान करणे वाईट चालीची असल्याचे खोटे आरोप करणे | १. वैफल्य,नैराश्य येऊ शकते,<br>२. मानसिक ताण,तीव्र,दुःख होईल<br>३. मुलांच्या विकासासाठी हे वातावरण योग्य नसेल<br>४. इतर काही. | १. पुन्हा पुन्हा छळ,होईल<br>२. मानसिक ताण दुःख<br>३. इतर काही. | | |
| ८. | हिंसाग्रस्त स्त्री,तिची मुले किंवा तिचे नातेवाईक यांना इजा पोहोचवण्याच्या घमक्या देणे | १. सतत काळजी वाटत राहील<br>२. मानसिक ताण दुःख<br>३. इतर काही | १. धमकी दिल्याप्रमाणे खरंच काही इजा पोहोचवेल<br>२. मानसिक ताण,दुःख<br>३. इतर काही | | |
| ९. | शाळा,महाविद्यालय किंवा इतर कोणत्याही शैक्षणीक उपक्रमात सहभागी होऊ न देणे | १. वैफल्य,नैराश्य येऊ शकते,<br>२. मानसिक ताण,तीव्र,दुःख होईल<br>३. इतर काही. | १. पुन्हा पुन्हा असा त्रास दिला जाईल.<br>२. मानसिक ताण,दुःख<br>३. इतर काही | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १० | तिच्या मनाविरुध्द लग्न करण्यास भाग पाडणे,तिच्या पसंतीच्या जोडीदाराबरोबर लग्न करू न देणे,घरातील लोकांच्या पसंतीच्या मुलाशी लग्न करण्याची जबरदस्ती करणे | १. वैफल्य,नैराश्य येऊ शकते,<br>२. मानसिक ताण,दुःख<br>३. इतर काही. | १. पुन्हा पुन्हा असा त्रास दिला जोईल.<br>२. मानसिक ताण दुःख<br>३. इतर काही. | | |
| ११ | मुलांना किडनॅप करण्याची,पळवून नेण्याची धमकी देणे | १. मुलांची सतत काळजी लागुन राहील.<br>२. मुलांच्या सुरक्षीततेला धोका निर्माण होईल.<br>३. इतर काही | १. मुलांना पळवून नेले जाईल.<br>२. इतर काही | | |
| १२ | हिंसाग्रस्त स्त्रीला, तिच्या मुलांना किंवा तिच्या नातेवाईकांना मारहाण,दुखापत करणे | १. पुन्हा मारहाण होईल अशा दडपणाखाली सतत रहावे लागू शकते.<br>२. इतर काही. | १. पुन्हा हिंसक प्रकार घडेल<br>२. जास्त गंभीर स्वरूपात होईल<br>३. जास्त दुखापत होईल<br>३. इतर काही. | | |
| १३ | हिंसक व्यक्तीच्या व्यसनांमूळे होणारा त्रास | १. तो त्यांच्या व्यसनामूळे मारहाण किंवा<br>२. इतर काही त्रास देईल याची सतत भिती आणि दडपण येते<br>३. दैंनंदिन आयुष्य सुरळीत राहू शकत नाही.<br>३. इतर काही | १. व्यसन केल्याचे निमित्त सांगून हिंसक वर्तन सहन करावे लागू शकते.<br>२. व्यसन केल्यावर अधिक त्रासदायक वर्तन करेल<br>३. घरखर्चासाठी तिला तो पैसे देणार नाही.<br>२. इतर काही | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १४ | त्याची वृत्ती गुन्हेगारी असेल यापूर्वी गुन्हेगारी रेकॉर्ड असेल | १. हिंसा होईल अशी सततची भिती काळजी वाटत राहील.<br>२. सुडवृत्तीने तो वागेल अशी भिती | १. कायदे नियमांच्या विरोधात वागण्याची वृत्तीच असल्याने न्यायालयाने हिंसा थांबवा असा दिलेला आदेश पाळेल याची खात्री देता येत नाही.<br>२. हिंसाग्रस्त स्त्री,तिची मुले त्याच्या पासून घोका होऊ शकतो<br>२. इतर काही. | | |
| १५ | अन्न,वस्त्र,निवारा औषधे,अशा दैनंदिन खर्चासाठी तो पैसे देणार नाही | | १. मुलाच्या आणि स्वतःच्या गरजा भागवताना खूप ओढाताण होऊ शकते<br>२. इतर काही. | | |
| १६ | तिला नोकरी व्यवसाय करू दिला जाणार नाही,रस असलेल्या कामात अडथळे आणले जातील | १. स्वतःच्या आणि मुलांच्या किमान गरजा पुर्ण करू शकणार नाही<br>२. इतर काही. | १. मुलांच्या आणि स्वतःच्या गरजा भागवताना खूप ओंढाताण होऊ शकते<br>२. इतर काही. | | |
| १७ | घरातून घालवून देणे घराचा ठरावीक भाग वापरण्यास परवानगी न देणे | १. स्त्री व मुले बेघर होण्याची भिती<br>२. घराच्या ठरावीकच भागात कोंडल्यासारखे वावरावे लागू शकते | १. स्त्रीची आणि तिच्या मुलांची सुरक्षीतता धोक्यात येते,<br>२. मुलांसाठी आणि स्वतःसाठी किमान निवऱ्याची सोय करताना खूप प्रयत्नं करावे लागतील.<br>२. इतर काही | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १८ | कपडे,भांडी व इतर दैनंदिन गरजेच्या वस्तू वापरण्याची परवानगी न देणे | १. तिच्या वस्तुंवर तिचा ताबा राहणार नाही.<br>२. त्या सर्व वस्तु परत आणण्याची ऐपतही नसेल. | १. तो त्या वस्तु विकुनही टाकू शकेल<br>२. इतर काही. | | |
| १९ | भाडेतत्वावर घरात रहात असेल तर घरभाडे न भरणे | १. घरभाडे न भरल्यामूळे घर सोडावे लागू शकते<br>२. राहण्याची पर्यायी व्यवस्था न होणे<br>३. पुन्हा स्वतः भाडयाने घर घेण्यासाठी पैसे नसणे | १. निवारा गमवेल<br>२. इतर काही | | |
| २० | तिचे स्त्रीधन व इतर मौल्यवान वस्तू तिच्या परवानगी शिवाय विकल्या जाऊ शकतील | १. तिच्या मौल्यवान वस्तू तिच्याकडे राहणार नाही.<br>२. इतर काही. | १.तिच्या वस्तू तिच्यापासून कायमच्या हिरावून घेतल्या जाऊ शकतील.<br>२. इतर काही. | | |
| २१ | तिचे स्त्रीधन तिच्याकडून काढून घेणे | १. ती तिच्या मौल्यवान वस्तूपासून वंचित राहील.<br>२. इतर काही | १. तो तिच्या सर्व वस्तु विकून टाकील किंवा त्यांची नासधूसही करेल.<br>२. त्या तिला कधीच मिळणार नाहीत अशी तिला भीती काळजी वाटू शकते.<br>३. इतर काही. | | |
| २२ | दिवाणी किंवा फौजदारी न्यायालयाने दिलेला आदेश तो डावलून टाकेल | १. इतर काही | १. इतर काही | | |

**हिंसाग्रस्त स्त्रीची सही** **संरक्षण अधिकारी / सेवादायी संस्था**